इचलकरंजी ICHALKARANJI ▶ वर्ष - ४१ ▶ अंक - २०७ ▶ रविवार,ता.३० नोव्हेंबर २०२५ ▶ पाने १२+४=१६ इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 ▪ पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

### पुण्यातील बँका, शाळा मंगळवारी बंद

पुणे,ता.२९ -

नगरपरिषद तसेच नगरपंचायतीच्या निवडणुकांचे मतदान २ डिसेंबरला होणार आहे. उमेदवारांना १ डिसेंबरला रात्री दहा वाजेपर्यंत प्रचार करता येणार आहे. ज्या भागात मतदान होणार आहे. तेथील शाळा,बँका, सरकारी कार्यालये यांच्यासह निमसरकारी कार्यालयांना २ डिसेंबरला सार्वजनिक सुटी जाहीर केली आहे. मतदानासाठी अवघे तीन दिवस शिल्लक राहिले असून मतदारांपर्यंत पोहण्यासाठी सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यांनी ताकद लावली आहे. कामानिमित्त दुसऱ्या भागात जाणाऱ्या नागरिकांना मतदानाचा हक्क बजाविता यावा यासाठी मंगळवारी सुट्टी जाहीर केली आहे. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाने काढले आहेत.

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

GAYATRI LODGE
रहाणेचा एक सुंदर अनुभव
* फ्रि वाय फाय * नियमित स्वच्छता
* एसी-नॉन एसी रुम * पॉवर बॅकअप
* २४/७ हॉट/कोल्ड वॉटर * पार्कींग सुविधा
साखरपे हॉस्पिटल रोड, शाहू कॉर्नर, इचलकरंजी.
फोन : ८३०८२०८८९९, ९८५०५५५९८०

www.emahasatta.com e-mail : mahasatta@gmail.com mahasattaadvt@gmail.com किंमत ₹ ५.००

# आमच्यात कोणतेही मतभेद नाहीत

## सिध्दरामय्या व शिवकुमार यांचे पत्रकार परिषदेत वक्तव्य

■ बंगळूरु,ता.२९-

**कर्नाटकातील सत्ताधारी काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या नेतृत्ववादाच्या दरम्यान, मुख्यमंत्री सिध्दरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार शनिवारी एकत्र नाष्टा करताना**

**● हायकमांडचा निर्णय स्विकारणार**
**● नेतृत्व बदलाच्या चर्चा फेटाळल्या**

**दिसले.नाष्ट्यानंतर, दोन्ही नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली आणि त्यांच्यातील मतभेदाचे वृत्त फेटाळून लावले.**

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिध्दरामय्या म्हणाले,आमच्यात कोणतेही मतभेद नाहीत



पत्रकार परिषदेत बोलताना कर्नाटकचे मुख्यमंत्री सिध्दरामय्या शेजारी उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार.

आणि भविष्यातही होणार नाहीत. आमचा अजेंडा २०२८ च्या निवडणुका आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महत्त्वाच्या आहेत. आम्ही त्यांच्यावर चर्चा केली. २०२८ च्या निवडणुकीत काँग्रेसला पुन्हा सत्तेत आणण्यावरही आम्ही चर्चा केली. आम्ही एकत्र निवडणुका लढवण्यावर चर्चा केली. सिध्दरामय्या पुढे म्हणाले,आम्ही ठरवले आहे की,हायकमांड जे काही सांगेल ते आम्ही स्विकारू. उद्यापासून कोणताही गोंधळ होणार नाही.अद्याप कोणताही गोंधळ नाही.भाजप आणि जेडीएसला खोटे आरोप करण्याची सवय आहे. भाजप आणि जेडीएसने अविश्वास प्रस्ताव आणण्याची (पान २ वर)

# भारत-अमेरिका यांच्यात ७९९५ कोटींचा संरक्षण करार

■ नवी दिल्ली,ता.२९-

**भारत आणि अमेरिका यांच्यात ७,९९५ कोटी रुपयांच्या एका महत्त्वाच्या संरक्षण करारावर स्वाक्षरी झाली आहे. या कराराअंतर्गत अमेरिका भारतीय नौदलाच्या २४ एमएच-६०-आर सी-हॉक रोमियो हेलिकॉप्टरच्या देखभाल, दुरुस्ती आणि ऑपरेशनल सहाय्याची जबाबदारी पार पाडेल. हा करार २०२५ ते २०३० या कालावधीत लागू राहणार असून त्यामुळे भारतीय नौदलाची क्षमता आणखी मजबूत होणार आहे. तसेच, हेलिकॉप्टरचे सर्व्हिसिंग आता भारतातच करता येणार आहे.**

यापूर्वी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के टॅरिफ लावले होते.ज्यामुळे दोन्ही देशांच्या संबंधांमध्ये तणाव निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र, आता भारत-अमेरिका संबंधांबाबत सकारात्मक बातमी समोर आली आहे. भारताने



## सी-हॉक हेलिकॉप्टरची देखभाल,दुरूस्ती देशातच होणार

अमेरिकेसोबत ७,९९५ कोटी रुपयांचा करार अधिकृतपणे केला आहे. संरक्षण मंत्रालयाने अमेरिकेशी केलेला हा पाच वर्षांचा करार आहे. यानुसार अमेरिका भारतीय नौदलाच्या २४ एमएच-६०-आर सी-हॉक रोमियो हेलिकॉप्टरच्या तयारीपासून ते ऑपरेशनल स्थिती कायम राखण्यापर्यंत सर्वतोपरी मदत करणार आहे.दोन्ही देशांनी लेटर ऑफ ऑफर अँड ॲक्सेप्टन्स (एलओए) वर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. हा करार २०२५ ते २०३० दरम्यान लागू असेल. हा करार 'फॉलो-ऑन सपोर्ट' या स्वरूपाचा आहे. (पान २ वर)

**अमेरिकन कंपनी लॉकहीड मार्टिन कॉर्पोरेशनने एमएच-६०-आर सी-हॉक रोमियो हेलिकॉप्टरची निर्मिती केली आहे. हे हेलिकॉप्टर सर्व हवामानात उड्डाण करण्यास सक्षम आहे.रात्रीच्या अंधारातही सहज टेक-ऑफ आणि लँडिंग करू शकते. हे हेलिकॉप्टर हेलफायर क्षेपणास्त्र, टॉरपीडो, सोनोबॉय आणि रडारसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज आहे.भारत आणि अमेरिकेतील नवीन करारानंतर, यापुढे या हेलिकॉप्टरचे सर्व्हिसिंग करण्यासाठी ते अमेरिकेला पाठवावे लागणार नाही ते भारतातच होऊ शकेल.**

# सावरकर मानहानी प्रकरणात पुराव्यांची सीडी निघाली रिकामी

## राहुल गांधीविरोधातील खटल्यातील प्रकार

■ पुणे,ता.२९-

**स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा कथित अवमान केल्याप्रकरणी लोकसभेतील विरोधी पक्षनेते तथा काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्याविरोधात सादर करण्यात आलेली पुराव्यांची सीडी रिकामी निघाल्यामुळे एकच खळबळ माजली.**

हा प्रकार गुरुवारच्या सुनावणीत घडला.पण तो शनिवारी समोर आला.या घटनेमुळे राहुल गांधी यांना कोर्टात खेचण्याच्या प्रयत्नांना मोठी खिळ बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



राहुल गांधी यांनी २०१९ मध्ये लंडनमध्ये दिलेल्या एका मुलाखतीत विनायक दामोदर सावरकर यांच्याविषयी एक कथित वादग्रस्त विधान केले होते. या प्रकरणी सावरकरांचे पणतू सत्यकी सावरकर यांनी त्यांच्या विरोधात मानहानीचा खटला दाखल केला होता.त्यांनी राहुल यांच्या भाषणाचे रेकॉर्डिंग असलेली एक सीडी सीलबंद लिफाफ्यात कोर्टात सादर केली होती. (पान २ वर)

# सर्वोच्च न्यायालय सरकारच्या दबावाखाली काम करत आहे

## जमीयत उलेमाचे मदनी यांचा आरोप

■ भोपाळ,ता.२९-

**जमीयत उलेमा-ए-हिंदचे अध्यक्ष मौलाना महमूद मदनी यांनी देशात भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे सांगत सर्वोच्च न्यायालयावर सरकारच्या दबावाखाली काम करण्याचा आरोप केला. एका समुदायाला निशाणा बनवले जात आहे तर दुसऱ्याला खुली मुभा दिली जात आहे.त्यांनी देशातील परिस्थितीवर चिंता व्यक्त करत सर्वोच्च न्यायालयाला संविधानाचे पालन करण्याचे आवाहन केले.**



जमीयत उलेमा-ए-हिंदचे अध्यक्ष मौलाना महमूद मदनी यांनी सर्वोच्च न्यायालयावर अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. बाबरी मशिद, तीन तलाक (पान २ वर)

# नक्षलग्रस्त जिल्ह्यांची संख्या दहा वर्षांत १२६ वरून केवळ अकरावर

## शहा:पोलीस महासंचालक,पोलीस महानिरीक्षक परिषदेस प्रारंभ

■ रायपूर,ता.२९-

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पोलीस महासंचालक-पोलीस महानिरीक्षक परिषद, समस्या आणि आव्हाने ओळखण्यापासून ते धोरणे आणि रणनिती तयार करण्यापर्यंत देशांतर्गत सुरक्षा आव्हाने सोडवण्यासाठी एक प्रमुख मंच म्हणून उदयाला आला आहे.**



नक्षलवादाचे पूर्णपणे उच्चाटन (पान २ वर)

**नक्षलवाद,ईशान्य भारत आणि जम्मू-काश्मिर या तीन हॉटस्पॉट्सवर मोदी सरकारने कायमस्वरूपी उपाययोजना केल्या आहेत.दहशतवाद आणि कट्टरवादाविरोधात केलेल्या कारवाईचा संदर्भ देत, शहा म्हणाले की, पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडियावर बंदी घातल्यानंतर, त्यांच्या अड्ड्यांवर देशभरात छापे टाकण्यात आले हे केंद्र-राज्य समन्वयाचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे.**

### पश्चिम बंगालमध्ये राजभवनचे नाव बदलून 'लोक भवन' ठेवले

■ कोलकाता,ता.२९-

**पश्चिम बंगालचे राज्यपाल डॉ.सी.व्ही.आनंद बोस यांनी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यांनी राजधानी कोलकात्यातील राज्यपाल निवासस्थानाचे नाव बदलण्याची घोषणा केली. आतापर्यंत हे 'राज भवन' म्हणून ओळखले जात होते पण आता त्याचे नाव 'लोक भवन' ठेवण्यात आले आहे.**

राज्यपाल डॉ.सी.व्ही. आनंद यांचा हा निर्णय सध्या चर्चेत आहे.अलीकडेच त्यांनी पश्चिम बंगालजवळील बांगलादेश सीमेचा दौराही केला होता. (पान २ वर)

# 'नेशन' ही संकल्पना भारतीय 'राष्ट्र'पेक्षा भिन्न

## -डॉ.मोहन भागवत

■ नागपूर,ता.२९-

**पाश्चिमात्यांची 'नेशन' संकल्पना संघर्ष, वर्चस्व आणि आक्रमकतेच्या इतिहासातून निर्माण झालेली आहे. तर भारतीय राष्ट्रभाव हा प्राचीन, आत्मीयतापूर्ण आणि एकतेवर आधारित असून दोन्ही संकल्पना भिन्न असल्याचे प्रतिपादन सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले.**



**नागपूरच्या रेशीमबाग मैदानावर आयोजित पुस्तक महोत्सवात ते बोलत होते.**

सरसंघचाक भागवत म्हणाले की, समाजात संघाच्या स्वयंसेवकांना 'राष्ट्रवादी' म्हणून संबोधले जाते. परंतु, आम्ही वाद निर्माण करणारे नाही. संघर्ष हा भारताचा स्वभावच नाही. आपली परंपरा, परस्पर सहकार्य, मैत्री आणि एकत्रित प्रवासाची आहे. भारताचे 'राष्ट्र' हे सत्ता, सीमारेषा किंवा राजकीय संरचनेवर उभे नाही; ते संस्कार, परोपकार, विविधतेतील (पान २ वर)

# महेश गायकवाडच्या पोलीस कोठडीत वाढ

## १६ जणांचा जामीन फेटाळला

■ कोल्हापूर, ता.२९(प्रतिनिधी)-

**टीईटी पेपर फोडण्याचा प्रयत्न केल्याबद्दल मुरगूड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या गुन्ह्यातील मुख्य सुत्रधार महेश गायकवाड याच्या पोलीस कोठडीत तीन दिवसांनी वाढ केली आहे तर उर्वरीत १६ जणांचा जामीन फेटाळला आहे. संशयितांना शनिवारी दुपारी कागल प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी यांच्या न्यायालयात हजर केले होते.**

परीक्षार्थी विद्यार्थ्याकडून ३ लाख रुपये घेऊन मुख्य सुत्रधार महेश गायकवाड व त्याच्या टीमने पेपर फोडण्याचा प्रयत्न केला होता.मात्र पोलिसांना याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून यातील ११ जणांना अटक केली. आतापर्यंत २५ जणांना अटक केली आहे. या घोटाळ्याचा म्होरक्या रितेशकुमार असून त्याचा पोलीस शोध घेत आहेत.

दरम्यान, अटकेतील दत्तात्रय आनंदा चव्हाण (वय ३२ रा. कासारपुतळे),रघुनाथ गणपती चौगले (वय ३८,सोन्याची शिरोली),अक्षय आनंदा कुंभार (वय २७, सोनगे),किरण साताप्पा बरकाळे (वय ३०, ढगेवाडी), नागेश दिलीप शेंडगे (वय ३०, सावर्डे पाटण), दयानंद भैरु साळवी (वय ४१, तमनाकवाडा),रोहित पांडूरंग सावंत (वय ३५, कासार पुतळे),अभिजीत विष्णू पाटील (वय ४०, बोरवडे), संदीप भगवान गायकवाड (वय ४६ रा. कराड), अमोल पांडुरंग जरग (वय ३८,सरवडे), स्वप्नील शंकर पोवार (वय ३५, कासारपुतळे), रणधीर तुकाराम शेवाळे (४६, सैदापूर), तेजस दीपक मुळीक (वय २२ निमसोड, सांगली), प्रणय नवनाथ सुतार (वय ३२ हवेली,पुणे), संदीप शिवाजी चव्हाण (वय ४०, कोपर्डे हवेली, कराड), श्रीकांत नथूराम चव्हाण (वय ४३, कराड) या १६ जणांचा जामीन न्यायालयाने फेटाळला आहे.

# २२ तोळे सोने लंपास

■ मिरज,ता.२९ (प्रतिनिधी)-


**गांधीधाम - बेंगलोर एक्सप्रेस रेल्वेतून प्रवास करणाऱ्या प्रवासी महिलेच्या बॅगेतील सुमारे २२ तोळे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे प्रवासी वर्गामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.गांधीधाम-बेंगलोर एक्सप्रेस रेल्वे मिरज रेल्वे स्थानकात आली असता ही घटना घडली आहे.**

फिर्यादी रेखा मनोज कुमार मालपाणी (वय ५५, रा. सुरत) यांच्या ट्रॉली बॅग मधून दागिने चोरीस गेले आहेत. मालपाणी या त्यांच्या मुलगी व बहिणीसोबत गांधीधाम बेंगलोर एक्सप्रेस मधून सुरत ते मिरज असा प्रवास करीत होत्या. रेल्वे मिरज रेल्वे स्थानकाजवळ आल्यानंतर उतरण्यासाठी त्यांनी त्यांची ट्रॉली बॅग व आणि बॅग दरवाज्याजवळ आणून ठेवल्या. काही बॅग मागे राहिल्याने त्या आणण्यासाठी परत गेल्या. यावेळी पाच अनोळखी व्यक्ती (पान २ वर)

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १२८००० रु. | १७३००० रु. |

अंडी ६९६ रुपये शेकडा

### हास्यतुषार - सुरेंद्र दास



दोघा भावात आज जरी भांडण दिसत आहे,निकालानंतर पुन्हा ते एकत्र येतीलही कदाचित !

# पुसेगांवजवळ अकरा किलो गांजा जप्त

■ सातारा, ता,२९(प्रतिनिधी)-

**स्थानिक गुन्हे शाखा व पुसेगांव पोलीस ठाणे यांनी २ लाख ७८ हजार ९०० रूपये किमतीचा ११ किलो गांजा जप्त केला. संशयित सचिन बापू मदने (वय ३५, रा. रामोशीवाडी, पोस्ट जाखणगांव ता.खटाव जि. सातारा) याच्या मुसक्या आवळल्या.**

पुसेगांव पोलीस ठाणे हद्दीतील मौजे रामोशीवाडी पोस्ट जाखणगांव येथील सगु वहिणीच्या वस्तीत एक जण त्याच्या झोपडीच्या आडोशाला गांजाची विक्री करण्याच्या उद्देशाने गांजाच्या झाडांची लागवड केली असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर याना मिळाली. त्यानुसार देवकर यांनी पोलीस उपनिरीक्षक परितोष दातीर व पोलीस अंमलदार यांचे एक पथक तयार केले. स.पो.नि. संदीप पोमण व त्यांचेकडील पोलीस अंमलदार यांच्या सोबत संयुक्तपणे करवाई केली.झोपडीलगत आडोशास अवैधपणे गांजाची विक्री करण्याच्या उद्देशाने ९ गांजाच्या झाडांची लागवड केली असल्याचे निदर्शनास आले. घटनास्थळी २,७८,९०० किंमतीचा ११ किलो १५६ ग्रॅम वजनाचा गांजा हस्तगत करण्यात आला आहे.



जप्त केलेल्या गांजा तसेच संशयितासोबत पोलीस कर्मचारी

### सौंदलग्याजवळ अपघातात महिला ठार

■ निपाणी,ता.२९(प्रतिनिधी)-



**पुणे-बंगळूरू राष्ट्रीय महामार्गावर सौंदलगा हद्दीत वेदगंगा नदी पुलावर अज्ञात वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात अमीना अकबर कडगावकर (वय ४८, रा.तळंदगे रोड,नवीन वसाहत इंगळी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर ) ही महिला जागीच ठार झाली.**

तर दुचाकीस्वार मुलगा राज अकबर कडगावकर (वय २६) जखमी झाला.सदर घटनेची नोंद ग्रामीण पोलिसात (पान २ वर)

# शेट्टींसह ८० जणांची निर्दोष मुक्तता

■ कोल्हापूर,ता.२९-

**कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोली येथे २०११ साली ऊस आंदोलनातून झालेल्या दंगलीत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांच्यासह ८० जणांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. कोल्हापूर सत्र न्यायालयात न्यायाधीश कश्यप यांच्या कोर्टात झालेल्या सुनावणीनंतर सर्वांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. सोळा वर्षानंतर हा निकाल लागल्याने आंदोलनातील शेतकऱ्यांनी न्यायालयाच्या आवारातच एकमेकाला गळाभेट घेत आनंद व्यक्त केला.**

यावेळी राजू शेट्टी म्हणाले की,शेतकरी आंदोलने करत असताना आंदोलन दडपण्यासाठी तत्कालीन राज्य सरकारने पोलीस प्रशासनास हाताशी धरून जाणीवपूर्वक हा गुन्हा दाखल केलेला होता.या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता झाल्याने चळवळीमध्ये लढण्यासाठी कार्यकर्त्यांना पुन्हा बारा हत्तीचे बळ आले आहे. शेतकरी हा न्याय हक्कासाठी व घामाच्या दामासाठी संघर्ष करत होता आणि तो यापुढेही लढतच राहणार असल्याची भावना राजू शेट्टी यांनी व्यक्त केली. शिरोलीत झालेल्या घटनेनंतर सुरवातीस वडगाव (पान २ वर)



## (पान १ वरून)

## १२६ वरून केवळ अकरावर

करण्यासाठी सरकारकडून अनेक उपाययोजना केल्या जात आहेत. गेल्या सात वर्षांत केंद्र सरकारने संरक्षक भिंतीच्या संरक्षणातील ५८६ पोलीस ठाणी बांधून सुरक्षा जाळे मजबूत केले आहे. परिणामी, नक्षलग्रस्त जिल्ह्यांची संख्या २०१४ मधील १२६ वरून आज केवळ अकरावर आली आहे.पुढील पोलीस महासंचालक/पोलीस महानिरीक्षक परिषदेपूर्वी देश नक्षलवादाच्या समस्येतून पूर्णपणे मुक्त होईल असा विश्वास केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला.छत्तीसगडमधील रायपूर येथे तीन दिवसीय ६० व्या पोलीस महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षकांच्या परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.गेल्या ४० वर्षांपासून देशाला नक्षलवादाच्या समस्येचा सामना करावा लागत आहे, असे अमित शहा यांनी सांगितले. गुप्तचर माहितीची अचूकता, उद्दीष्टांची स्पष्टता आणि कारवाईतील समन्वय या तीन प्रमुख बाबींवर लक्ष केंद्रीत करून कट्टरतावाद आणि अंमली पदार्थांची समस्या यावर सुरक्षा दल आणि पोलीस कठोर प्रहार करत आहेत, असे त्यांनी सांगितले.

## कोणतेही मतभेद नाहीत

विधाने केली आहेत.त्यांच्याकडे फक्त ६० सदस्य आहेत आणि जेडीएसकडे १८ सदस्य आहेत. ते आमच्या संख्येशी जुळवून घेऊ शकत नाहीत. आमच्याकडे १४० सदस्य आहेत. हा एक व्यर्थ प्रयत्न आहे. आम्ही त्यांच्या खोट्या आरोपांना तोंड देऊ.उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार म्हणाले, तुमच्या सर्वांच्या पाठिंब्याने आम्ही काँग्रेस सरकार सत्तेत आणले आणि आम्ही वचनानुसार काम करत आहोत. राज्यातील जनता त्यांना पूर्ण पाठिंबा देत आहे.आम्हाला त्यांच्या इच्छा पूर्ण करायच्या आहेत. आम्ही त्या दिशेने काम करत आहोत. हायकमांड जे काही म्हणेल ते आम्ही पाळू आणि कोणताही गट नाही. आम्ही अजूनही एकत्र काम करत आहोत.मी मुख्यमंत्र्यांसोबत आहे.

## ७९९५कोटींचा संरक्षण करार

त्याअंतर्गत अमेरिका सी-हॉक हेलिकॉप्टरसाठी स्पेअर पार्टस्, सपोर्ट इक्विपमेंट, पायलट व तांत्रिक कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, तसेच इतर तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देईल.

## दबावाखाली काम करत आहे

आणि अशा अन्य प्रकरणांतील निर्णयानंतर असे वाटते की,काही वर्षांपासून कोर्ट सरकारच्या दबावात काम करत आहे.आधीही अशी अनेक उदाहरणे आहेत. ज्यामुळे कोर्टच्या कॅरेक्टरवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. सर्वोच्च न्यायालय तेव्हाच 'सुप्रीम' म्हणवण्यास पात्र आहे जेव्हा ते संविधानाचे पालन करेल आणि कायद्याचे रक्षण करेल. जर तसे होत नसेल, तर ते 'सुप्रीम' म्हणून ओळखले जाण्याच्या लायक नाही असा आरोप मदनी यांनी केला.देशाच्या संविधानाने आपल्याला धर्मस्वातंत्र्याचा अधिकार दिला आहे. मात्र धर्मांतरविषयक कायद्यांच्या माध्यमातून हा मूलभूत अधिकार कमकुवत केला जात आहे. या कायद्याचा वापर अशा पध्दतीने केला जात आहे की, एका धर्माचे लोक भयभीत होत आहेत.त्यांना शिक्षा आणि छळ सहन करावा लागत आहे. दुसऱ्या बाजूला 'घरवापसी'च्या नावाखाली लोकांचे धर्मांतर करणाऱ्यांना मोकळे राज्य आहे ना चौकशी, ना कोणतीही कायदेशीर कारवाई असा आरोप मदनी यांनी केला.देशाची परिस्थिती अत्यंत संवेदनशील आणि चिंताजनक आहे.दुर्दैवाने एका विशिष्ट समुदायाला जाणीवपूर्वक लक्ष्य बनवले जात आहे तर दुसऱ्या समुदायाला कायदेशीरदृष्ट्या कमजोर, सामाजिकदृष्ट्या अलग ठेवले जात आहे आणि आर्थिकदृष्ट्या अपमानित केले जात आहे.बुलडोझर ॲक्शन,मॉब लिंचिंग, वक्फ मालमत्तांवर कब्जा,धार्मिक मदरशांबद्दल नकारात्मक मोहिम. हे सगळे त्यांच्या धर्म, ओळख आणि अस्तित्वाला कमकुवत करण्यासाठी केले जात आहे. यामुळे मुस्लिम समाजाला रस्त्यावर चालतानाही असुरक्षित वाटत असल्याचे विधान त्यांनी केले.

## भारतीय 'राष्ट्र'पेक्षा भिन्न

एकता आणि मानवतेच्या भावनेतून जन्माला आले आहे. 'नेशन' ही संकल्पना इंग्रजांनी आपल्यावर लादली; पण 'राष्ट्र' म्हणजे फक्त नॅशनलिझम नव्हे, ते 'राष्ट्रत्व' आहे. भागवत पुढे म्हणाले की, पाश्चिमात्यांच्या नॅशनलिझममध्ये असलेली आक्रमकता दोन महायुद्धांना कारणीभूत ठरली, तर भारतीय राष्ट्रभावात अहंकार नसून ''वसुधैव कुटुंबकम् आणि ''परोपकार'' यांचा संस्कार आहे. धर्म, भाषा, आहार आणि प्रांतातील भेद असूनही सर्व भारतीय भारतमातेची संतती असल्याची एकात्म भावना आपल्याला जोडून ठेवते.राज्यव्यवस्था बदलल्या, पराधीनता आणि स्वातंत्र्याचे टप्पे आले, तरी भारतीय राष्ट्रभाव अखंड राहिला. सत्ता निर्माण होण्यापूर्वीच राष्ट्र अस्तित्वात होते.ब्रिटिशांनी भारतीय वैविध्याला विभागणीचे स्वरूप दिले, परंतु भारत मूळातच एकात्म संस्कृतीचा देश आहे.जिथे स्वातंत्र्य असते तिथे समता नसते. स्वातंत्र्य आणि समता हे दोन्ही तत्त्व बंधूभावाशिवाय एकत्र राहू शकत नाही. त्यामुळे स्वातंत्र्य व समतेसोबत बंधूत्व आवश्यक असते. तसेच नेशन'चे भाषांतर 'राष्ट्र' असे केल्याने संकल्पनेचा भावार्थ बदलतो. आम्ही राष्ट्रवादी नव्हे तर राष्ट्रीय आहोत. चुकीच्या शब्दप्रयोगांमुळे समाजात संभ्रम निर्माण होऊ शकतो आणि संस्कृतीवर परिणाम होऊ शकतो. लेखकांनी मूळांचा अभ्यास करून अनुभवाधिष्ठित लेखन करावे, असे आवाहन सरसंघचालकांनी केले.

## २२ तोळे सोने लंपास

दरवाजा जवळ त्यांच्या बॅगेजवळ आले. तेथे गर्दी करून थांबल्याने मालपाणी या त्यांच्या बॅगेजवळ जाऊ शकल्या नाहीत. या वेळात सदर अनोळखी व्यक्तींनी बॅग मधील सोन्याचे दागिने लंपास केले. रेल्वे मिरज स्थानकात थांबल्यानंतर ते पाचही व्यक्ती रेल्वे बोगीतून विरुद्ध दिशेला उतरून निघून गेले. यानंतर मालपाणी यांना त्यांची बॅग खाली पडल्याचे दिसून आले.

त्यांना संशय आल्याने त्यांनी बॅग तपासली असता त्यांच्या बॅगेतील दागिने ठेवलेला प्लास्टिकचा डबा गायब झाल्याचे लक्षात आले. या प्लास्टिकच्या डब्यामध्ये त्यांचे सुमारे २२ तोळे सोन्याचे दागिने होते. यामध्ये त्यामध्ये सोन्याचे नेकलेस, कर्णफुले, हातातील कडे, डायमंड सेट, सोन्याचे पेंडंट, सोन्याची चेन, सोन्याची अंगठी असे दागिने होते. सुमारे ८ लाख १४ हजार रुपये किमतीचे दागिने चोरीस गेल्याची नोंद मिरज रेल्वे पोलिसात झाली आहे.

मिरज पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक रूपाली गोरड पुढील तपास करीत आहेत. या चोरीच्या घटनेने रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## ८० जणांची निर्दोष मुक्तता

न्यायालयात कामकाज चालले.त्यानंतर जिल्हा सत्र न्यायालयाकडे सदर प्रकरण वर्ग करण्यात आले.गेली १५ वर्षे या आंदोलनातील आरोपी असलेले सर्व शेतकरी कार्यकर्ते न्यायालयाच्या पायऱ्या झिजवत होते.प्रदीर्घ वर्षानंतर सर्व आंदोलकांची निर्दोष मुक्तता करण्यात आली.

# पुराव्याची सीडी निघाली रिकामी

(पान १ वरून)

याच सीडीच्या आधारावर कोर्टाने राहुल गांधी यांच्याविरोधात समन्स जारी केले होते.गुरुवारी न्यायदंडाधिकारी अमोल शिंदे यांच्यापुढे सत्यकी सावरकर यांची मुख्य उलटतपासणी सुरू होती. त्यात ही सीडी मुख्य पुरावा म्हणून सादर करण्यात आली.

यावेळी कोर्टाने ही सीडी चालवून पाहण्याचे आदेश दिले. त्यानुसार ती उघडून चालवण्याचा प्रयत्न झाला. पण त्यात कोणताही डेटा नसल्याचे निष्पन्न झाले. यामुळे कोर्टरूममध्ये उपस्थित सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. सीडी कोरी निघाल्याचे पाहून सत्यकी सावरकरांचे वकील संग्राम कोल्हटकर हे ही चकीत झाले. त्यांनी कोर्टाला आठवण करून दिली की, याच सीडीच्या आधारावर कोर्टाने राहुल गांधी यांच्या विरोधात कारवाई सुरू केली होती. त्यानंतर त्यांनी कोर्टाला यूट्यूबवर राहुल गांधींचे ते कथित भाषण लावण्याची परवानगी मागितली. पण कोर्टाने त्यांची विनंती साफ फेटाळून लावली.

न्यायदंडाधिकारी अमोल शिंदे म्हणाले, ही यूआरएल भारतीय पुरावा अधिनियम कलम ६५-ब अंतर्गत आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रांसह सादर करण्यात आला नाही. त्यामुळे तो पुरावा म्हणून स्विकारार्ह नाही. इलेक्ट्रॉनिक रेकॉर्ड पुरावा म्हणून कोर्टात ग्राह्य धरण्यासाठी कलम ६५ ब नुसार प्रमाणीकरण प्रमाणपत्र आवश्यक असते. त्यानतंर वकील कोल्हटकर यांनी आणखी दोन अतिरिक्त सीडी सादर करून कोर्टाला त्या तपासण्याची विनंती केली. पण राहुल गांधी यांच्या वकीलांनी त्याला कडाडून विरोध केला.त्यावर कोर्ट म्हणाले की, रेकॉर्डमध्ये अशा कोणत्याही अतिरिक्त सीडीचा उल्लेख नाही. कोल्हटकर यांचा अतिरिक्त सीडी चालवण्याचा अर्जही नामंजूर करण्यात आला.या प्रकरणात महत्त्वाचा पुरावा म्हणून सादर करण्यात आलेली सीडी ब्लँक निघाल्यामुळे तथा यूट्यूब लिंक व अतिरिक्त सीडी चालवण्याची मागणी फेटाळल्यामुळे राहुल यांना कोर्टात खेचण्याचा सत्यकी सावरकर यांचा प्रयत्न फसला आहे.

## ट्रकखाली सापडून दुचाकीस्वार ठार

■ कोल्हापूर,ता.२९(प्रतिनिधी)-

**कोल्हापूर कळंबा रोडवर तपोवन मैदानाजवळ भरधाव ट्रकखाली सापडल्याने दुचाकीस्वार जागीच ठार झाला. तानाजी श्रीपती टिपुगडे (वय ६० रा. कळंबा) असे त्यांचे नाव आहे. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन मृतदेहाचा पंचनामा करून रुग्णालयात पाठवला. त्यानंतर वाहतूक सुरळीत केली.**

छत्रपती शिवाजी उद्यमनगर येथे काम करणारे तानाजी टिपुगडे हे शनिवारी सायंकाळी कामावरून बाहेर पडल्यानंतर आपल्या लुना दुचाकीवरून कळंबा येथे घरी निघाले होते. तपोवन मैदानाजवळ रस्त्यात गर्दी असल्याने तेथून जात असताना रस्ता दुभाजकाला दुचाकी धडकून ते एका बाजुला कलंडले. यावेळी तेथून जाणाऱ्या ट्रकच्या पाठीमागील चाकाखाली सापडल्याने त्यांच्या डोक्यावरून चाक गेले. या अपघातात टिपुगडे हे जागीच ठार झाले. अपघातानंतर वाहतूक कोंडी झाली. करवीर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. वाहतूक नियंत्रण शाखेच्या पोलिसांनी वाहतूक सुरळीत केली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह सीपीआर रुग्णालयात उत्तरीय तपासाणीसाठी पाठवला. मृताच्या खिशातील कागदपत्रावरून त्याची ओळख पटली. पोलिसांनी नातेवाईकांना रुग्णालयात बोलवून घेतले. टिपूगडे यांच्या पश्चात पत्नी, विवाहित मुलगा, सून असा परिवार आहे.

## अपघातात महिला ठार

(पान १ वरून)

झाली आहे. राज कडगावकर हा गेल्या महिन्यापासून आजरा येथील मदरशामध्ये कामावर आहे.त्यामुळे तो आपल्या आई समवेत तेथे राहत होता.दरम्यान दुचाकीवरून शुक्रवारी रात्री आजरा येथे जात होते. दरम्यान, त्यांची दुचाकी सौंदलगा हद्दीत वेदगंगा नदी पुलावर आली असता राज याचा ताबा सुटल्याने अमीना या खाली कोसळल्या.दरम्यान याचवेळी मागून बेळगावच्या दिशेने जाणाऱ्या अज्ञात वाहनाने दुचाकीला ठोकर दिल्याने त्या जागीच ठार झाल्या तर राज हा जखमी झाला.घटनास्थळी डीएसपी गोपाळकृष्ण गौडर, उपनिरीक्षक शिवराज नायकवाडी यांनी भेट देऊन पाहणी केली. अमीना यांच्या पश्चात मुलगा, दोन मुली असा परिवार आहे.

## नवले पूल अपघातांची कारणे दिल्ली आयआयटी शोधणार

■ पुणे,ता.२९-

**बंगळूरू-पुणे महामार्गावरील नवले पूल येथे होणाऱ्या अपघातांचे मूळ शोधण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे. नवले पुलावर सतत अपघात होत असतात.दोन आठवड्यापूर्वी या पुलावर झालेल्या अपघातामध्ये आठ जण जळून खाक तर २० ते २२ जण जखमी झाले होते. यामुळे या अपघाताची कारणे दिल्लीतील आयआयटी संस्था शोधणार आहे.**

कात्रज येथील नवीन बोगद्याकडून नवले पुलाकडे येणाऱ्या रस्त्यावर हा अपघात झाला होता. भरधाव वेगाने उतारावरून येणाऱ्या कंटेनरचे ब्रेक निकामी झाले.कंटेनर चालकाचे नियंत्रण सुटल्याने त्याने १० ते १५ वाहनांना धडक दिली.एक ट्रॅव्हलला तसेच डिझेल टँकरला कंटेनर धडकला. यामुळे डिझेल टँकरला आग लागली. काही क्षणात येथे आगीचे लोट दिसू लागले.

नवले पुलावर यापूर्वी देखील अनेक अपघातांच्या घटना घडल्या आहेत. त्यामध्ये नागरिकांना जीव गमवावा लागला आहे. महिना - पंधरा दिवसांनी या पुलावर अपघात होतच राहतात. सातत्याने या ठिकाणी होत असलेल्या अपघातांमुळे प्रशासनाची डोकेदुखी वाढली आहे. येथील अपघात कमी करण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने विविध उपाय योजना केल्या जात आहेत. मात्र त्यानंतरही अपघात होत असल्याचे समोर आले आहे.

## हातकणंगलेचा आठवडी बाजार गुरुवारी भरणार

हातकणंगले,ता.२९(प्रतिनिधी)-

हातकणंगले नगरपंचायतीची निवडणूक मंगळवारी २ डिसेंबर व मतमोजणी बुधवारी ३ डिसेंबर रोजी असल्याने सार्वजनिक ठिकाणी गर्दी होऊन कायदा व सुव्यवस्था बिघडु नये तसेच शेतकरी, व्यापारी व ग्राहकांची गैरसोय होऊ नये यासाठी मंगळवारचा आठवडी बाजार गुरुवारी ४ डिसेंबर रोजी भरणार आहे. याची नोंद शेतकरी, भाजीपाला विक्रते ग्राहक व अन्य व्यावसायिकांनी घ्यावी.

## पोल्ट्री फार्मसाठी कर्जाचे आमिष १३ लाखांची फसवणूक

■ सांगली, ता. २९(प्रतिनिधी)-

**पोल्ट्री फार्मसाठी कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका व्यावसायिकाची १३ लाख ७१ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. २०२० ते २०२३ या दरम्यान हा प्रकार घडला. संशयीत सुनिल बाबगोंडा पाटील (रा. सरोजनी बंगला, शारदा हौसिंग सोसायटी, कुपवाड रोड, सांगली) याच्याविरुध्द सांगली शहर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.**

संशयीत सुनिल पाटील याच्या विरोधात हारुण कासीम मुल्ला (रा.म्हैसाळ, ता. मिरज) यांनी फिर्याद दिली आहे. सुनिल पाटील हा पूर्वी शहरातील वखारभागातील जुना बुधगाव रोडवरील पाटील बिल्डिंगमध्ये रहात होता.

त्यावेळी त्याने फिर्यादी हारुण मुल्ला यांना पोल्ट्री फार्मसाठी कर्ज मिळवून देतो, असे सांगून त्या बदल्यात मुल्ला यांच्याकडून १३ लाख ७१ हजार रुपये घेतले होते. पण त्याने कोणतेही कर्ज त्यांना मिळवून दिले नाही. त्यामुळे आपली फसवणूक केल्याची फिर्याद मुल्ला यांनी दिली आहे.

## मुरुमअभावी दत्तवाडमधील घरकुलाची कामे रेंगाळली

■ दत्तवाड,ता.२९ (वार्ताहर) -

**प्रशासनातील काही अधिकाऱ्यांकडून दत्तवाड (ता. शिरोळ) येथे मुरूम वाहतूक रोखण्यात आल्याने ठप्प झाली आहे. त्यामुळे येथील जवळपास १०० हून अधिक घरकुलांची कामे रेंगाळली आहेत. त्यामुळे प्रशासनाने घर बांधकामासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण घटक असलेल्या मुरुमाची वाहतूक पूर्ववत करावी, अशी मागणी घरकुलधारकातून होत आहे.**

**महसूल विभाग सध्या नगरपालिकांच्या निवडणुकीच्या कामात व्यस्त आहे. त्यामुळे कुरुंदवाड पोलिसांकडून मुरूम वाहतूक करू नये अशी चेतावणी मुरूम वाहतूकदारांना देण्यात आली आहे. त्यातूनही काही मुरूम वाहतूकदार कर्नाटकातून मुरूम वाहतूक करत असताना कुरुंदवाड पोलिसांकडून त्याची अडवणूक केली जात आहे. त्यामुळे मुरूम वाहतूकदारांनी मुरमाची वाहतूक बंदच ठेवली आहे.**

शासनाच्या वतीने घरकुलाचे मिशन ५० हजार हे लक्ष्य डिसेंबर पूर्वी पूर्ण करण्याचे ठरवले असल्याने त्या अनुषंगाने प्रत्येक ग्रामपंचायतींना याबाबत वरिष्ठांकडून दबाव येऊ लागल्याने ग्रामपंचायतीकडूनही घरकुल लाभार्थ्यांना लवकरात लवकर ठराविक अवधीत घरकुलाचे काम सुरू करावे अन्यथा ते रद्द करण्यात येईल असा ठोस इशारा देण्यात आला. त्यामुळे अनेक घरकुल लाभार्थ्यांनी आपल्या घरकुलाचे काम सुरू केले. घरकुल बांधकामासाठी अगोदर स्वतः पैशाची गुंतवणूक करावी लागत असल्याने लाभार्थ्यांनी अनेकांकडून कर्ज घेतले आहे. व ते घरकुलाचे हप्ते तसे वेळेत फेडण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र घरकुलाचे कामच पूर्ण झाले नाही तर हप्ते येणार कसे याची चिंता लाभार्थ्यांना भेडसावू लागली आहे. याशिवाय काहींनी घरकुल बांधकाम करण्यासाठी आपले राहते घर पूर्णपणे पाडले आहे व घराचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत भाड्याच्या घरात राहिले आहेत. गावातील अनेक घरांचे बांधकाम फाउंडेशन लेवल पर्यंत झाले आहे. मात्र या फाउंडेशनमध्ये भरण्यासाठी मुरूमच उपलब्ध होत नसल्याने या घरकुल लाभार्थ्यांची व इतर नागरिकांची गोची झाली आहे.एकीकडे लवकर घर बांधा तर दुसरीकडे त्यासाठी आवश्यक असणारी सामग्रीवर बंदी आणणे या दुटप्पी भूमिकेमुळे नागरिकांत नाराजी पसरली आहे.

## मुरगूडमध्ये पोलिसांचे संचलन

मुरगूड,ता.२९ (प्रतिनिधी)-

**मुरगूड नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शनिवारी एसटी बसस्थानक परिसरात दंगल काबू नियंत्रण प्रात्यक्षिक घेण्यात आले.शिवाय शहरातकायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी शहरातून पोलिसांनी संचलन केले.**

सुरुवातीला बसस्थानकात दंगल काबू प्रात्यक्षिक घेण्यात आले.त्यानंतर बसस्थानक,तुकाराम चौक, जमादार चौक,पाटील कॉलनी,शिवतीर्थ, नाका नं.१, मुख्य बाजारपेठ,कबरस्थान मशीद मार्गे पोलीस ठाणे या रस्त्यावरून पोलिसांनी संचलन केले.सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी करे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी, २५ पोलिस अंमलदार,करवीर पोलीस ठाण्याचे २ अंमलदार,राज्य राखीव दलाचे अधिकारी,७ अंमलदार आणि २० होमगार्ड असा सशस्त्र ताफा यामध्ये सहभागी झाला होता.

# कोळशिंद्यांच्या हल्ल्यात दोन शेळ्या ठार

## काळजवडे परिसरात दहशतीचे वातावरण

■ बा.भोगाव,ता.२९(वार्ताहर)-

**काळजवडे (ता. पन्हाळा) येथे सातपिता शेतात कोळशिंद्यांच्या झुंडीने केलेल्या हल्ल्यात दोन शेळ्या जागीच ठार, तर एक शेळी गंभीर जखमी झाल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकारामुळे संपूर्ण काळजवडे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**

नाथा बापू कांबळे हे चार शेळ्या व जनावरे घेऊन सातपिता शेतात चारण्यासाठी गेले होते. दरम्यान, अचानक कोळशिंद्यांची झुंड शेतात घुसली आणि दोन शेळ्यांवर थेट हल्ला चढवून त्यांना फरफटत नेत कोथळा फाडला. यात दोन्ही शेळ्या जागीच ठार झाल्या.यावेळी जनावरे चारण्यासाठी आलेले अमर पाटील यांनी शेळ्यांच्या ओरडण्याचा आवाज ऐकून तात्काळ धाव घेतली. त्यांनी घटनास्थळी पोहोचताच कोळशिंदा पळ काढत असताना तिसऱ्या शेळीवर पुन्हा हल्ला करून गंभीर जखमी केले. या घटनेत शेतकरी कांबळे यांचे अंदाजे ३० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे समजते.शनिवारी सकाळी वनरक्षक पूजा नरुटे यांनी घटनास्थळी पंचनामा करून पुढील कार्यवाही सुरू केली आहे. गावाच्या अगदी जवळ अशा प्रकारे कोळशिंद्यांनी हल्ला केल्याने स्थानिक शेतकरी वर्गात भीती व असुरक्षिततेची भावना वाढली आहे. शेतशिवारात वाढत्या वन्यप्राण्यांच्या हालचालींबाबत उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

## बडोदा -सांगली प्रवासात तीन लाखाचे दागिने चोरीस

सांगली, ता. २९(प्रतिनिधी)-

**गुजरातमधील बडोदा ते सांगली असा बेंगलोर एक्सप्रेसने प्रवास करताना एका महिलेच्या ३ लाख १० हजाराच्या दागिन्यावर चोरट्यांनी डल्ला मारला आहे. याप्रकरणी शिवानी प्रतिक जाधव (रा. बडोदा,गुजरात) यांनी संजयनगर पोलिसांत फिर्याद दिली आहे.**

शिवानी जाधव या २५ नोव्हेंबर रोजी बडोदाहून बेंगलोर एक्सप्रेसने निघाल्या. त्या २६ रोजी सांगलीत पोहोचल्या. त्यानंतर रिक्षाने त्या वारणाली येथील विकास कॉलनीतील ओम या नातेवाईकांच्या बंगल्यात पोहोचल्या. त्या ठिकाणी त्यांनी बॅग उघडली असता दागिने गायब होते. त्यांच्या चोरीस गेलेल्या दागिन्यांमध्ये सोन्याच्या बांगड्या, नेकलेस, रिंगा आणि मंगळसुत्र आदी दागिन्यांचा समावेश आहे.

## ऊसतोड मजूर महिलेचा हृदयविकाराने मृत्यू

निपाणी,ता.२९ (प्रतिनिधी)-

ऊस तोडणीसाठी कुटुंबीयांसह टोळीसमवेत आलेल्या महिलेचा हृदयविकाराने मृत्यू झाला. शांताबाई आसाराम बदरगे (वय ६१ रा. आंबा,ता. परतूर,जि. जालना) असे मृत महिलेचे नाव आहे.याबाबतची फिर्याद गणेश बदरगे यांनी ग्रामीण पोलिसात दिली. शांताबाई या टोळीसमवेत हालशुगर कारखान्याच्या ऊस तोडीसाठी आल्या होत्या.त्यांच्या टोळीची ऊसतोड हणबरवाडी येथे सुरू होती.दरम्यान शांताबाई यांना अस्वस्थ वाटून छातीत दुखू लागल्याने त्यांना तातडीने उपचारासाठी सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## नाव 'लोक भवन' ठेवले

(पान १ वरून)

त्यानंतर त्यांना सामान्य लोकांच्या सारख्या प्रवासात रेल्वेमध्ये प्रवास करताना पाहिले गेले.तसेच, डॉ. आनंद यांनी रेल्वेमध्ये भेटलेल्या एका शिक्षिकेच्या विनंतीनुसार शाळेतील विद्यार्थ्यांशी भेट घेतली होती. यानंतर आता त्यांनी आपल्या निवासस्थानाचे नाव बदलण्यावरही मोहर लावली आहे.


|| भावपूर्ण श्रद्धांजली ||



श्री. पद्माकर दत्तात्रय कुलकर्णी

आमचे परमस्नेही श्री. श्रीधर व सतिश कुलकर्णी यांचे वडिल श्री. पद्माकर दत्तात्रय कुलकर्णी यांचे शनिवार, दि. २९/११/२०२५ रोजी वयाच्या ९५ व्या वर्षी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

रामदेव साडी * उत्सव फोटो
अंजली बेंगल्स * बालाजी आयुर्वेद

अंत्ययात्रा : आज रविवार, दि. ३०/११/२०२५ रोजी सकाळी ८ वा. निवासस्थानहून निघणार.

|| भावपूर्ण श्रद्धांजली ||



श्रीमती कल्लव्वा शंकर गवळी

आमच्या संस्थेचे चेअरमन श्री. शामराव शंकर गवळी यांच्या मातोश्री श्रीमती कल्लव्वा शंकर गवळी यांचे शनिवार, दि. २९/११/२०२५ रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

स्नेहदिप नागरी सह.पतसंस्था मर्या.,इचलकरंजी.

सर्व संचालक मंडळ, सभासद, ऑफीस स्टाफ, पिग्मी एजंट

रक्षाविसर्जन : आज रविवार,दि. ३०/११/२०२५ रोजी सकाळी ठिक ९.०० वाजता पंचगंगा नदीतिरी, इचलकरंजी.

|| भावपूर्ण श्रद्धांजली ||



श्रीमती उषादेवी पांडुरंग शिंदे (शिक्षिका)

आमच्या मातोश्री श्रीमती उषादेवी पांडुरंग शिंदे यांचे शुक्रवार,दि.२८/११/२०२५ रोजी वयाच्या ६७ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

सौ. सुचेता विठ्ठल पाटील
सरिता पांडुरंग शिंदे
सौ. पल्लवी अमित नवाळे
इचलकरंजी.

रक्षाविसर्जन : आज रविवार, दि. ३०/११/२०२५ रोजी सकाळी ९ वाजता पंचगंगातिरी.

|| अकरावे पुण्यस्मरण ||



स्व. किरण मुरलीधर होगाडे

कष्टाने केली आयुष्याची सुरुवात, सुख जवळ येताच काळाने फिरवली पाठ,
साथ सुटली लाख मोलाची, छाया विसली वटवृक्षाची,
ज्योत विझली आज आशेची, वाट पाहतो तुमच्या पुनर्जन्माची
कोटी-कोटी प्रणाम तुमच्या चरणी, हिच आमची भावपूर्ण श्रद्धांजली!

प्रकाश मुरलीधर होगाडे * राजेंद्र मुरलीधर होगाडे
सुशांत किरण होगाडे * होगाडे परिवार, शाहुनगर, चंदूर.



कै. नानासो गाठ

भावपूर्ण श्रद्धांजली

आपल्या सूत गिरणीचे व्हा. चेअरमन,
कोल्हापूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष व
ज्येष्ठ सहकार नेते
श्री. नानासाहेब गाठ यांचे दुःखद निधनाबद्दल
सूत गिरणीच्यावतीने भावपूर्ण श्रद्धांजली!

चेअरमन व संचालक मंडळ,
सभासद, अधिकारी, कामगार, कर्मचारी
श्री व्यंकटेश शेतकरी
विणकरी सहकारी सूत गिरणी
लि., इचलकरंजी,हुपरी-यळगूड.

# न्यायालयाच्या निर्णयामुळे इच्छुकांत उत्साहाचे वातावरण

## प्रभागात भेटी-गाठी घेण्यास इच्छुकांचा जोर

**गेल्या काही वर्षांपासून रखडलेल्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे विविध पक्षांसह इच्छुकांमध्ये हालचालींना वेग आला आहे. भविष्यात कोणता पक्ष, आघाडी व इच्छुक मंडळी कोणती भूमिका घेतात. याकडे लक्ष लागून राहिले आहे. तेव्हा भविष्यातच कशा प्रकारे राजकीय हालचाली होतील हे पहावे लागणार आहे.**

इचलकरंजी,ता.२९-

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याच्या आक्षेपावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांना स्थगिती दिली नाही. या निर्णयामुळे गेल्या आठवडाभरात इच्छुकांमध्ये निराशा दूर होऊन पुन्हा उत्साहाचे वातावरण पसरले असून मतदारांच्या भेटी-गाठी घेण्यास जोर लावला आहे. तर विविध पक्ष, आघाड्यामध्येही राजकीय हालचालींना वेग आला आहे.**

गेल्या चार-पाच वर्षांपासून रखडलेल्या राज्यातील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींचा कार्यक्रम जाहीर झाला. त्यामध्ये नगरसेवकांचे आरक्षण, प्रारूप मतदार याद्या कार्यक्रम आदी कामाला सुरूवात झाली आहे. मात्र, राज्यातील काही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याच्या कारणावरून काहींनी न्यायालयात धाव घेतली होती. या प्रकारामुळे निवडणुका पुन्हा लांबणीवर पडतील अशी भिती इच्छुकांमध्ये होती. त्यामुळे न्यायालयाचा काय निर्णय होईल .त्यानंतर पुन्हा प्रचारासाठी सक्रिय होण्याबाबत चर्चेला ऊत येवू लागला. गेल्या आठवडाभरापासून इच्छुकांमध्ये एक प्रकारची निराशा पसरली होती. मात्र



सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांना स्थगिती दिली नसल्याने निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला. न्यायालयाच्या या निर्णयामुळे इच्छुकांमध्ये पुन्हा उत्साहाचे वातावरण पसरले आहे.प्रथमच होत असलेल्या इचलकंजी महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये खरी लढत महायुती विरूध्द महाविकास आघाडीमध्येच होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. महायुतीतील प्रमुख घटक पक्ष भाजपाकडे इच्छुकांची संख्या मोठी असल्याचे बोलले जाते. तर महायुतीतील घटक पक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) व शिवसेना (एकनाथ शिंदे गट) यांच्यात इच्छुक मंडळी आपल्याला तिकीट मिळविण्यासाठी आपापल्या परिने प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे उमेदवारी देताना महायुतीच्या नेतेमंडळींना तारेवरची कसरत करावी लागणार आहे. हे मात्र निश्चित.तर दुसरीकडे महाविकास आघाडीने इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्याची प्रक्रिया राबवत आहे. मात्र, महाविकास आघाडीचे नेते मंडळी 'वेट अॅण्ड वॉच'ची भूमिका घेतल्याचे दिसत आहे. त्यामुळे महानगरपालिकेची निवडणूक चांगलीच रंगतदार होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# मावा विक्री करणाऱ्या दोन पानटपरीवर छापा

इचलकरंजी,ता.२९-

**कबनूर आणि चंदूर येथे मावा बनविणाऱ्या व विक्री करणाऱ्या दोन पानटपरीवर शिवाजीनगर पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत सुमारे साडेतीन हजाराची सुगंधी तंबाखु, सुपारी, मावा असे साहित्य जप्त केले. याप्रकरणी दिपक रामचंद्र पाटील (वय ३२, रा. भोनेमाळ) आणि उत्तम शंकर जठारे (वय ५३, रा. कबनुर) या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत पोलिसांतून मिळालेली माहिती अशी, शुक्रवारी रात्री चंदुर येथील एस. पी. पानशॉपवर कारवाई करत शिवाजीनगर पोलिसांनी तयार मावा, कच्ची मावा पत्ती आणि कच्ची सुपारी असा १९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दिपक पाटील याच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. तर कबनुर येथील लक्ष्मी माळ भागातील गुडलक पान शॉपवर छापा टाकला असता तेथे सुगंधी तंबाखु, सुपारीसह वेगवेगळ्या मिश्रणातून अवैधपणे मावा बनवला जात असल्याचे आणि पुड्यांवर सुरक्षेबाबत कोणताही वैधानिक इशारा लिहिला नसल्याचे आढळून आले. या कारवाईत दिड हजाराचा मुद्देमाल जप्त करुन मावा विक्री करणाऱ्या उत्तम जठारे याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# विनयभंग प्रकरणी युवकास अटक

टाकवडे,ता.२९ (प्रतिनिधी) -

टाकवडे ,(ता. शिरोळ) येथील शरद कुमार शेवाळे या इसमाने घरात घुसून विनयभंग केल्याप्रकरणी शिरोळ पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे .ही घटना शुक्रवार २८ नोव्हेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास घडली. पीडित महिलेने तक्रार दिल्यानंतर सदर संशयित आरोपीस पोलिसांनी ताब्यात घेतले.

तक्रारदार महिलेने शरद शेवाळे याने मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. सदर इसमास नातेवाईकांनी बेदम मारहाण केली. सदर प्रकार समजतात नागरिकांनी गर्दी केली. गावांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी गर्दी पांगवण्याचा प्रयत्न केला. तणावाचे वातावरण निर्माण झाल्यामुळे पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. संशयित शरद शेवाळे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक शिंदे करीत आहेत.

# श्री करवीर देवाची यात्रा सोमवारपासून

**टाकवडे,ता.२९(प्रतिनिधी)-**

टाकवडे ता. शिरोळ येथील ग्रामदैवत श्री करवीर देवालयाची यात्रा सोमवार १ ते बुधवार ३ डिसेंबर या दरम्यान आयोजित केले आहे. यात्रेनिमित्त सोमवार १ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता जलाभिषेक व पेहरावा, मंगळवार २ डिसेंबर रोजी सकाळी ८ वाजता अभिषेक व महापूजा ,९ वाजता नैवेद्य अर्पण सोहळा, १२ वाजता गावातील सर्व भजनी मंडळाच्या वतीने भजनाचा कार्यक्रम तसेच बुधवार ३ डिसेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता गाथा महाराष्ट्राची हा संगीत कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.ग्रामस्थांनी यात्रेचा लाभ घ्यावा असे आवाहन ग्रामदैवत यात्रा उत्सव कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

# बावणे गल्लीतील गटारीवरील अतिक्रमण हटविले

## नागरिकांत समाधानाचे वातावरण:कारवाईत सातत्य ठेवावे

इचलकरंजी,ता.२९-

**शहरातील वॉर्ड १२ मधील बावणे गल्ली परिसरात गटारी वरील केलेले अतिक्रमण महानगरपालिका आरोग्य विभाग यांच्यामार्फत तोडण्यात आले .त्यामुळे कित्येक वर्षापासून बंद असलेल्या गटारी पुन्हा खुल्या करण्यात आल्या.सदर कारवाईमुळे नागरिकांत समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.**

वॉर्ड नंबर १२ मधील श्री हनुमान मंदिर, हत्ती चौक मुख्य रस्ता दोन-तीन ठिकाणी , बावणे गल्ली एक ते तीन गल्ल्यामध्ये नागरिकांनी त्यांच्या सोयीसाठी मोठ्या प्रमाणात गटारीवर अतिक्रमण करून गटारी बंद करून ठेवले होते. त्यामुळे गटारीतील स्वच्छता करणे अशक्य झाले होते. त्याचबरोबर दुर्गंधी आणि रोगाला सामोरे जावे लागत होते.

त्यामुळे सदरचे अतिक्रमण काढावेत अशा तक्रारी नागरिकांतून केल्या जात होत्या.सदर तक्रारीची दखल घेत आयुक्त पल्लवी पाटील, उपायुक्त विद्या कदम ,सहा.आयुक्त बेबी नदाफ यांच्या मार्गदर्शनाखाली त्या वार्डामधील स्वच्छता निरीक्षक करण लाखे, मुकादम महादेव धनवडे यांच्या मार्गदर्शनाखाली बावणे गल्लीत ठिक ठिकाणी गटारीचे अतिक्रमण हटवण्यात आले व त्यामुळे गटारी खुल्या झाल्याने नागरिकांत समाधानाचे वातावरण पसरले आहे.



शहर परिसरातील सर्वच लहान मोठ्या गल्ल्यामध्ये लहान मोठ्या गटारीवर अतिक्रमण करण्यात आले आहे.त्यामुळे गटारीची स्वच्छता करताना आरोग्य कर्मचाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागते.तेव्हा भागातील स्वच्छता निरीक्षकाकडून अहवाल मागवून शहरातील सर्वच अतिक्रमण केलेल्या गटारी खुल्या कराव्यात अशी मागणी होत आहे.



# कुरूंदवाडात दंगल काबू पथकाचे संचलन

कुरूंदवाड,ता.२९प्रतिनिधी)-

**कुरुंदवाड नगरपालिका निवडणुकीमध्ये कोणताही अनुचित प्रकार घडू नये ,शांततेत निवडणुका पार पाडाव्यात यासाठी कुरुंदवाड पोलिसांच्या वतीने शहरात पोलिसांचे रूट मार्च दंगल नियंत्रण पथकाद्वारे चौका चौकात( दंगल काबू नियंत्रण) जमाव पागंविण्याचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. यामध्ये ३ पोलीस अधिकारी ,२० पोलीस अंमलदार ,६० होमगार्ड ,एक आरसी पलटून यांचा समावेश होता.**

शहरातील नगरपालिका चौक, दर्गा चौक, नगर वाचनालय, राजवाडा ,दौलत शहा मार्गे जुने एसटी स्टँड, नवबाग रस्ता, हायस्कूल रोड, सन्मित्र चौक, या मार्गावर पोलिसांनी रूट मार्च केले, ठिक ठिकाणी दंगल काबू जमाव पांगविण्याचे प्रात्यक्षिक सादर केले. यामध्ये कुरुंदवाड पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी जीवन पाटील, दंगल नियंत्रण काबू पथकाचे अधिकारी एस.बी दामसे, पोहेकाँ निलेश साबळे, होमगार्ड कमांडर संतोष पाटील, व दंगल नियंत्रण पथकातील पोलीसाचा समावेश होता.

# शिरढोण ग्रामपंचायतीने बिल थकवल्याने ठेकेदाराने रस्ताच उकरला

शिरढोण,ता २९(प्रतिनिधी)-

**शिरढोण (ता.शिरोळ) ग्रामपंचायतीने जेसीबीच्या सहाय्याने ठेकेदाराकडून वेळोवेळी काम करून घेतले होते पण ठेकेदाराने ग्रामपंचायतीकडे वारंवार बिलाची मागणी करून देखील ग्रामपंचायतीने बिल अदा केले नसल्याने,ठेकेदाराने पिण्याच्या पाण्याची गळती काढलेल्या ठिकाणी मुख्य रस्त्यावर जेसीबीच्या सहाय्याने रस्त्यात मोठी चर मारली. त्यामुळे काही काळ त्या मार्गावरील वाहतूक टप्प झाल्याने ग्रामपंचायतीच्या कारभाराबद्दल ग्रामस्थांतून तीव्र संताप व्यक्त केला जात होता.**



शिरढोण ग्रामपंचायतीने ठेकेदाराकडून जेसीबीच्या सहाय्याने वेळोवेळी कामे करून घेतली होती. पण सदर ठेकेदाराचे बिल अदा करण्यासाठी ग्रामपंचायतीकडून टाळाटाळ केली जात होती. तसेच ग्रामपंचायत पदाधिकारी तसेच प्रशासक फोन देखील उचलत नव्हते . या रागाच्या भरात ठेकेदाराने शनिवारी सकाळी पाण्याची गळती काढलेल्या ठिकाणी मुख्य रस्त्यावर जेसीबीच्या सहाय्याने भली मोठी चर खोदून काढली. त्यामुळे मुख्य मार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली.सदरची माहिती ग्रामसेवक विराज जथे व सरपंच सागर भंडारे यांना कळताच तात्काळ त्या ठिकाणी आले.त्यानंतर दुसऱ्या जेसीबीच्या सहाय्याने चर भरून रस्ता वाहतुकीस पूर्वत करण्यात आला.

दरम्यान ठेकेदाराचे थकीत बिल देयक असल्याने ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यावर गप्प राहण्याची नामुष्की ओढवली .दरम्यान ठेकेदाराला ग्रामपंचायतीमध्ये बोलावून त्याचे काही बिल अदा करण्यात आले. या घडामोडीनंतर ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत ग्रामस्थातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.ग्रामपंचायतीला १५व्या वित्त आयोगातून वर्षाला ७० ते ८० लाख येतात. १७ सदस्य असून कोण सत्ताधारी, कोण विरोधक हेच लोकांना कळेना असे झाले आहे. गावच्या विकासकामा पेक्षा ग्रामपंचायतीच्या कामातील टक्केवारी कशी मिळेल यातच ग्रामपंचायत सदस्यांना रस आहे. ग्रामपंचायतीने २६ जानेवारी रोजी गेल्या पाच वर्षाचा लेखाजोखा जाहीर करावा. असे आवाहन माजी सरपंच बाबूराव कोईक यांनी केले आहे.

# महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीचा ५ डिसेंबरला राज्यव्यापी बंद

कोल्हापूर ,ता.२९ (प्रतिनिधी)-

**महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीचा ५ डिसेंबरला राज्यव्यापी व्यापार बंद आयोजित केला असून १ डिसेंबर रोजी कोल्हापूर जिल्हास्तरीय व्यापारी परिषदेचेही आयोजन करण्यातआले आहे, या परिषदेस व्यापाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष संजय शेटे यांनी केले आहे.**

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅन्ड अॅग्रीकल्चर (मुंबई), फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (मुंबई), चेंबर ऑफ असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्रीज अॅन्ड ट्रेड (मुंबई), दि ग्रेन, राईस अॅन्ड ऑईल सीडस् मर्चंटस् असोसिएशन (मुंबई) व दि पूना मर्चंटस चेंबर (पुणे) यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समिती यांच्या तर्फे दि पूना मर्चंटस् चेंबर, पुणे येथे महाराष्ट्रातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समिती व खाद्यान्न वस्तूंचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांसाठी राज्यव्यापी परिषदेचे आयोजन केले होते.

परिषदेत कृषी उत्पन्न बाजार समिती नियमन (सेस) रद्द करा, लीगल मेट्रॉलॉजी कायदा नियम ३ मधील प्रस्तावीत बदल करु नये, (प्रस्तावीत बदल- अन्नधान्य, कडधान्य, मिरची इ. सर्व वस्तूंवर १ ते २५ किलो पर्यंत असणारा ५ टक्के जीएसटी बदलानंतर १ ते ५० किलो पर्यंत प्रस्तावित केला आहे) तसेच जीएसटी कायदा सुटसुटीत करावा याबाबत शुक्रवार दि. ५ डिसेंबर २०२५ रोजी राज्यस्तरीय व्यापार बंद पुकारण्यास इतर ६ ठराव केले आहेत. सदर परिषदेची माहिती देणे व कोल्हापूर जिल्ह्यातील व्यापाऱ्याची बंद बाबतची दिशा ठरविणे तसेच नियोजनासाठी सोमवार दि. १ रोजी दुपारी ४ वा. दि कोल्हापूर ग्रेन मर्चंटस् असोसिएशन, १५१७, सी, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर येथे कोल्हापूर जिल्ह्यातील व्यापाऱ्यांची परिषद आयोजित केली आहे. तरी या जिल्हास्तरीय व्यापारी परिषदेस जिल्ह्यातील व्यापाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष संजय शेटे व दि कोल्हापूर ग्रेन मर्चंटस् असोसिएशनचे अध्यक्ष संजीव परीख यांनी पत्रकाव्दारे केले आहे.

# मिरज तालुक्यासाठी दहा कोटींचा निधी : समित कदम

मिरज,ता.२९ (प्रतिनिधी)-

**केंद्रीय मार्ग निधी योजना २०२५-२६ मधून मिरज तालुक्यासाठी १० कोटीचा निधी मंजूर झाला आहे, अशी माहिती जनसुराज्य शक्ती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष समित कदम यांनी दिली. ते म्हणाले, माझ्या मागणीनुसार शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यात आला होता. करोली (एम), पाटगाव, सिद्धेवाडी, गुंडेवाडी, लिंगनूर, खटाव ते राज्य हद्द रस्ता या रस्त्यासाठी १० कोटी मंजूर झाले आहेत.**



याबाबतचे आदेश सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात आले आहेत. रस्ता खराब असल्याने अपघात होत होते. काही दिवसांपूर्वी या रस्त्यावर अपघातात एका जवानाचाही मृत्यू झाला होता. हा रस्ता पूर्ण झाल्यानंतर मोठा दिलासा मिळणार आहे. रस्ता सध्या ३.७५ मीटर रुंदीचा आहे. आता तो साडेपाच मीटर रुंद केला जाणार आहे. वाढत्या वाहतुकीसाठी सध्याचा रस्ता अपुरा असल्याने रुंदीकरण करणे आवश्यक असल्याने मी प्राधान्याने हा रस्ता मंजूर होण्यासाठी प्रयत्न केले. रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे परिसरातील नागरिक व वाहनधारकांतून तीव्र संताप व्यक्त होत होता.

या कामामुळे करोली (एम), सोनी, पाटगाव ते राष्ट्रीय महामार्गास मोठ्या रुंद रस्त्याने जोडणे शक्य होणार आहे. या रस्त्याच्या कामाच्या मंजुरीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी, मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, मंत्री चंद्रकांत पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले.

# शंभरफुटी रस्त्यावरील घराला आग

सांगली,ता.२९(प्रतिनिधी)-

छ. शाहू महाराज मार्ग म्हणजेच शंभर फुटी रस्त्यालगतच्या लतिफ पठाण कॉलनी येथील घराला शनिवारी दुपारी आग लागली. महापालिका अग्निशमन दलाला आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. घरातील सिलेंडर तत्काळ सुरक्षित बाहेर काढल्याने अनर्थ टळला.

घरातील संसारोपयोगी साहित्य जखून खाक झाल्या. आगीमुळे शेजारील घराच्या भिंतीस किरकोळ झळ बसली. कोणतीही जीवितहानी झाली नाही. आगीचे प्राथमिक कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून तपास सुरू आहे.

# गोवा बनावटी दारूसह साडेअकरा लाखांचा मुद्देमाल जप्त

कोल्हापूर ता.२९(प्रतिनिधी)-

**स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने सापळा कारवाईची मोहिम आखली आहे. त्यानुसार गोव्यातून आजरा मार्गे कोल्हापुरात येणारी गोवा बनावटीची दारू जप्त केली केली. चार लाखांची दारु व कार असा ११ लाख ४४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी सुधीर खुबू राठोड (वय २७ रा.सालईवाडा, सावंतवाडी, जि. सिधुदूर्ग) यास अटक केली आहे.**

राज्य उत्पादन शुल्कच्या भरारी पथकांने निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर गोव्यातून मोठ्या प्रमाणात दारू आयात होण्याची शक्यता गृहीत धरून भरारी पथकाने सापळा रचला होता. आजरा आंबोली रोडवर पारेवाडी गावच्या हद्दीत टोल नाक्याजवळ २८ रोजी रात्री सापळा रचला होता. पथकाने कार थांबवून त्याची झडती घेतल्यानंतर त्यामध्ये ४ लाखांची गोवा बनावटीची दारू व कार असा ११.४४ लाखांचा मुद्देमाल जप्त केला.

हार्दिक शुभेच्छा!



श्री. रमेश शंकरराव इंगवले (दादा)

आमचे लाडके दादा

श्री. रमेश शंकरराव इंगवले यांना वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!

संतोष शेटके * गणेश इंगवले

जितेंद्र शेटके * राजेंद्र शेटके

दिपक भोपळे * जितू जाणवेकर

मार्केटींग ऑफिसर नेमणे आहेत

इचलकरंजीमधील मल्टिस्टेट को.ऑप. क्रेडिट सोसायटी आणि सहकारी पतसंस्थेमध्ये व्यवसाय वाढीसाठी अनुभवी फिल्ड एक्झिक्युटिव्ह ऑफिसर/मार्केटींग ऑफिसर यांची पदे तात्काळ भरणे आहेत.

संपर्क- 9270845071



महायुतीच्या सर्व अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ



मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस (साहेब)

मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

जाहीर सभा



नगराध्यक्ष पदाचे अधिकृत उमेदवार

श्री. विश्वनाथ रामचंद्र डांगे (बापू)

- स्थळ : गांधी चौक, उरुण- ईश्वरपूर
- दिनांक : 30 नोव्हेंबर 2025
- वेळ : दुपारी 4:30 वा

- प्रकाशक : मकरंद मधूकर होरड
- मुद्रक: दत्त ग्राफिक्स

# नगराध्यक्षपदाचे सर्व नऊ उमेदवार चर्चेसाठी एकाच व्यासपीठावर

## सातार्‍यातील अनोख्या उपक्रमाचा राज्यासमोर आदर्श

## विकसित सातार्‍याविषयी उमेदवारांवर प्रश्नांची सरबत्ती

सातारा,ता.२९(प्रतिनिधी)-

**पक्ष,चिन्ह,आघाडी निवडणुकीनंतर बाजूला जाईल. सातार्‍याचा शाश्वत विकास आणि विकसित सातारा हाच आमचा एकमेव अजेंडा राहील, हा दृढ विश्वास कोण्या एका पक्षाने नव्हे तर नगराध्यक्ष पदासाठी उभे राहिलेल्या सर्वच्या सर्व नऊ उमेदवारांनी एका सुरात व्यक्त केला. इतकेच नव्हे तर नगराध्यक्ष झाल्यावर दिलेल्या आश्वासनांवर कटीबद्ध राहण्याचा बॉण्ड सर्व उमेदवारांनी सर्व साक्षीने लिहून दिला.**



'विकसित सातार्‍याचा, संकल्प सार्‍यांचा' यावर एकमत झाल्यावर नगराध्यक्षपदाच्या सर्व उमेदवारांनी राजेंद्र चोरगे यांच्या समवेत हात उंचावून अभिवादन केले.

अमेरिकेतल्या निवडणुकीपूर्वी ज्या पद्धतीने ''प्रेसिडेंशियल डिबेट''होते. त्याच पद्धतीने सातार्‍यात बालाजी ट्रस्टने सर्व नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांना एकाच व्यासपीठावर घेऊन ''तुमच्या संकल्पनेतील सातारा कसा असेल?''यावर प्रश्नांची सरबत्ती केली, शेकडो बाबी त्यांच्याकडून वदवून घेतल्या. शेकडो सूचना केल्या. गेल्या महिन्यापासून एकमेकांच्या विरोधात टोकाची भूमिका आणि प्रचार करणार्‍या एकही उमेदवाराने यावेळी एकमेकांवर चकार शब्द न काढता केवळ'विकसित सातार्‍याबद्दलच' चर्चा करून महाराष्ट्रापुढे एक आदर्श निर्माण केला. या उपक्रमाला सातार्‍यातील प्रत्येक क्षेत्रातील किमान दहा नामवंत हजर होते.सातार्‍यातील भूतकाळ न बोलता संघटित विकास याबाबत चर्चा करताना बेरोजगारी, रस्ते, गटर,पाणी,झोपडपट्टी अशा मूलभूत गरजांच्या पुढे जाऊन पाच वर्षानंतरचा सातारा कसा असेल याचा 'रोड मॅप' तयार करण्यात आला.

यावेळी भाजपचे अमोल मोहिते, शरद पवार राष्ट्रवादीच्या सुवर्णाताई पाटील, अपक्ष शरद काटकर,गणेश भिसे,रविंद्र भणगे, सागर भिसे, सनी (सुनिल) काटे, सुधीर विसापुरे,अभिजीत बिचुकले हे सर्व उमेदवार उपस्थित होते. तर बालाजी ट्रस्ट कडून अध्यक्ष राजेंद्र चोरगे व संजय कदम, जगदीश खंडेलवाल, अंबाजी देसाई, उदय गुजर, नितीन माने,दीपक मेथा, संजय निकम, हरिदास साळुंखे, जयदीप शिंदे, संतोष शेंडे, श्रावण पाटील या सर्वांनी त्यांचे व उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

**■ पर्यटन आणि अजिंक्यतारा**

प्रश्नोत्तरात पर्यटन आणि अजिंक्यतारा दुर्गाचा विकास हा प्रश्न उपस्थितांमधून सुद्धा आक्रमकपणे विचारला गेला. यावर अजिंक्यतारा साठी १६० कोटी उपलब्ध झाले आहेत तसेच पर्यटन वाढीसाठी सर्व पक्षीय संघटित प्रयत्न करणे तसेच यासाठी पक्षीय किंवा आघाडी भेद होणार नाही याची काळजी घेणार असल्याचे सर्वमते मान्य करण्यात आले.

**■ डॉ.आंबेडकर यांचा सातारा**

सातार्‍याचे ऐतिहासिकपण जपताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण ज्या शाळेत झाले व त्यांचा रहिवास ज्या घरात झाला त्याला राष्ट्रीय स्मारक घोषित करण्याची मागणी स्वतः उमेदवार सागर भिसे यांनी स्वतः लावून धरत येत्या काही वर्षांत पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासन दिले.

**■मान्यवरांकडून प्रश्नांची सरबत्ती**

व्यासपीठावर सलग दोन तास प्रश्न उत्तरे पूर्ण झाल्यावर उपस्थित मान्यवर प्रश्न विचारण्यासाठी सरसावले. प्रत्येक मान्यवराने आपापल्या क्षेत्रातील समस्या सांगत मूलभूत प्रश्न विचारले. यामध्ये सुजित आंबेकर, बीना शहा यांच्या अनेक प्रश्नावर उमेदवार सुद्धा घायाळ झाले.

**■ प्रचार झाला पण दुराचार नाही**

सुमारे तीन तास झालेल्या या घमासानामध्ये नऊच्या नऊ उमेदवार यांनी आपापल्या पक्षाचा आणि चिन्हाचा प्रचार केला खरा पण एकाकडून सुद्धा दुराचार झाला नाही. कोणीही अन्य कोणावर आरोप न करता सकारात्मक विचार मांडले. यावेळी उद्योजक,डॉक्टर्स, वकील, सामाजिक संस्था, प्रतिष्ठित मान्यवर उदंड संख्येने उपस्थित होते.

**■ सोशल मीडियाचा मोठा प्रभाव**

बालाजी ट्रस्टने घेतलेल्या या राज्यातील पहिल्या उपक्रमाची जोरदार झालेली चर्चा शुक्रवारी प्रत्यक्ष परावर्तीत होताना दिसली. उपक्रमात काही शेकडो मान्यवर उपस्थित असले तरी याचे थेट प्रक्षेपण अनेक सोशल मीडियाच्या विविध हॅन्डलवरून सुरु असल्याने व्युव्हर्सची संख्या काही लाखावर गेल्याचे सांगण्यात आले. तसेच 'कमेंटचा जणू पाऊस पडत होता' असे एक जेष्ठ सोशल मिडियाग्राफर यांनी सांगितले.

**■ पक्के विरोधक बसले मांडीला मांडी लावून जेवायला**

एकूणच उपक्रम खूप उत्साहवर्धक आणि तणातणीचा झाला असला तरी शेवटपर्यंत सातारी सलोखा कायम ठेवण्यात बालाजी ट्रस्ट आणि सवयभान या आयोजक संस्थांना यश आले. उपक्रमानंतर भोजन व्यवस्था होती तिथं गेल्या काही दिवसांपासून एकमेकांवर विखारी प्रचार करण्यात मग्न असलेले विरोधी उमेदवार मांडीला मांडी लावून जेवत बसल्याचे सुखद चित्र अनेकांनी अनुभवले. त्यांनी एकमेकांच्या सुख दुःखाची चर्चा करतानाच 'प्रचार कसा चाललाय' अशाही गप्पा मारल्याचे दिसून आले.

**■ पुढील चार दिवस जरी निर्णायक असले तरी आता 'संकल्प विकसित सातार्‍याचा'**

प्रत्यक्ष मतदान होण्यासाठी अजून निर्णायकी वेळ शिल्लक असली तरी बालाजीच्या या उपक्रमामुळे पक्ष, आघाड्या, चिन्ह दोन डिसेंबरपर्यंत राहतील पण पुढील पाच वर्षांसाठी ''संकल्प विकसित सातार्‍याचा'' हे ब्रीद वाक्य सर्वपक्षीय आणि सर्व उमेदवार यांचे कायम असेल यावर नऊच्या नऊ उमेदवार यांनी सर्वांच्या समोर मान्यता दिली.या अनोख्या उपक्रमाचे वैशिष्ट्यपूर्ण सूत्रसंचालन केल्याबद्दल निवेदिका चित्रा भिसे यांचेही सार्‍यांनी अभिनंदन केले.

### खोचक प्रश्न आणि मार्मिक उत्तरे

अमोल मोहिते यांना भाजपाला मतं दिली तरच निधी येणार का? सुवर्णाताई यांना, एका दिवसात पक्ष उभारून तिकीट कसं मिळालं? शरद काटकर यांना,मराठा क्रांती मोर्चाचा किती फायदा होणार असे खोचक प्रश्न प्रश्नकर्ते दीपक प्रभावळकर यांनी विचारून भंडावून काढलं तरी उमेदवार यांनीही त्याला मार्मिक उत्तरे दिली. अनेक प्रश्नावर सर्व उमेदवारांनी एकदिलाने सहमती दिली.

### उमेदवारांना पहिलाच बॉल यॉर्कर

प्रश्नाच्या सुरुवातीलाच सर्व उमेदवार यांना वही-पेन देऊन बालाजीचे संस्थापक राजेंद्र चोरगे यांनी, सातार्‍याचे क्षेत्रफळ किती, पाण्याची नक्की गरज किती, शहरांत रोज कचरा किती जमा होतो असे सलग प्रश्न विचारत सर्वच उमेदवारांची विकेट घेतली. दहा पैकी केवळ एका प्रश्नाचे उमेदवारांना उत्तर देता आले मात्र उमेदवारांना खजिल न करता 'आता जर प्रथम नागरिक व्हायला निघाला आहात तर तुम्हाला इतक्या बारकाईने अभ्यास करावा लागेल'असे प्रोत्साहनही दिले.

### वचननाम्याच्या बॉण्डवर सर्व उमेदवारांच्या सह्या

हा उपक्रम केवळ व्यासपीठापुरता मर्यादित नव्हता तर पुढील पाच वर्षांसाठी तुम्ही काय काय वचन दिली आहेत आणि काय काय सूचना स्विकारल्या आहेत यासाठी शासकीय स्तरावरचे 'वचननाम्याचे दस्त' करून घेण्यात आले होते तर या दस्तावर सर्व उमेदवार यांनी दोन साक्षीदार यांच्या सहीनिशी हसत हसत सह्या केल्या.

### प्रश्न तेच उत्तरे वेगवेगळी

सातार्‍यातील ट्रॉफिक, अनियमित्त पाणी, खड्डेमुक्त रस्ते, अनियमित घंटागाड्या, प्रचंड अतिक्रमणे,अस्वच्छ गटारे अशा समान प्रश्नावर प्रत्येक उमेदवाराने वेगवेगळी समाधाने निसंकोच विषद केली. पार्किंग सारख्या विषयावर यावेळी अनेक सकारात्मक उपाय सुचवले गेले.सहाशे कोटी बजेट म्हणजे पाच वर्षांत तीनशे कोटी नक्की जातात कुठे? या प्रश्नावर विरोधी पक्षातले व अपक्ष उमेदवार कमालीचे आक्रमक झाले होते. मात्र सत्ताधारी पक्षाचे उमेदवार अमोल मोहिते यांनी यावर अधिक बोलणे टाळल्याचे विशेष निर्दर्शनास आले.



# जयसिंगपूरचा विकास शाहू आघाडीच करणार-मादनाईक

जयसिंगपूर,ता.२९(प्रतिनिधी)-

**विरोधकांनी कितीही बिन बुडाचे आरोप केले तरीही यावर एकच उत्तर आहे ते म्हणजे शहराचा विकास. माझ्या राजकीय कारकीर्दीत पहिल्यांदाच शिरोळ तालुक्यात एवढ्या मोठ्या प्रमाणात फंड आणणारे आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर हे एकमेव नेते आहेत. त्यामुळे यापुढेही जयसिंगपूर शहरासह शिरोळ तालुक्याच्या विकासासाठी राजर्षी शाहू विकास आघाडीच्या उमेदवारांना नगरपालिकेत पाठवणे गरजेचे आहे असे मत शेतकरी नेते भाजपाचे पदाधिकारी सावकर मादनाईक यांनी मांडले.**

जयसिंगपूर येथील आयोजित प्रचार फेरी दरम्यान ते बोलत होते. राजर्षी शाहू विकास आघाडीचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार संजय पाटील यड्रावकर, प्रभाग ६ मधील नगरसेवक पदाचे उमेदवार महेश कलकुटणी, स्वाती मादनाईक यांनी मतदारांशी संवाद साधला. यावेळी या प्रभागातील मतदारांनी उमेदवारांचे स्वागत केले. याप्रसंगी बोलताना नगराध्यक्षपदाचे उमेदवार संजय पाटील यड्रावकर म्हणाले, शहरातील २०० हून अधिक झोपडपट्टी धारकांना प्रॉपर्टी कार्ड दिले आहे यापुढील काळात उर्वरित झोपडपट्टी धारकांचा प्रश्न मार्गी लावणार आहे, यापुढेही शहरातील सर्वच प्रश्नांसाठी राजर्षी शाहू विकास आघाडी काम करेल, असा दावा त्यांनी यावेळी व्यक्त केला. या प्रचार फेरीत अनिल बागणे, मिलिंद भिडे, रमेश यळगुडकर, शिवाजी कुंभार, प्रवीण इंगळे, अमर खाडे, तेजस कुऱ्हाडे, गणेश तावडे, सुजित दानोळी, शीतल पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# २ डिसेंबर रोजी मतदानासाठी सार्वजनिक सुट्टी जाहीर

कोल्हापूर,ता.२९(प्रतिनिधी)-

**राज्यातील नगरपरिषदा व नगर पंचायतीच्या निवडणुकांच्या अनुषंगाने मंगळवार, २ डिसेंबर रोजी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदार संघात सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली असल्याची माहिती उप सचिव हेमंत महाजन यांनी अधिसूचनेद्वारे दिली आहे.**

कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा, चंदगड, गडहिंग्लज, हातकणंगले, हुपरी, जयसिंगपूर, कागल, कुरुंदवाड, मलकापूर, मुरगूड, पन्हाळा, शिरोळ, वडगाव (कोल्हापूर) या नगरपरिषद/ नगरपंचायत क्षेत्रामध्ये सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.ही सार्वजनिक सुट्टी नमूद करण्यात आलेल्या मतदारसंघाच्या क्षेत्रातील जे मतदार कामासाठी त्या त्या मतदार संघांच्या बाहेर असतील त्यांना देखील लागू राहील. तसेच उपरोक्त नमूद करण्यात आलेल्या नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्रातील केंद्र शासनाच्या शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका इ. ना ही सार्वजनिक सुट्टी लागू राहील, असेही या अधिसुचनेत नमुद करण्यात आले आहे.

# हुपरीत जेवणावळ डिप्लोमसी शिगेला

हुपरी,ता.२९(वार्ताहर)-

**हुपरी नगरपरिषदेच्या निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला असताना, येथे एक वेगळेच चित्र पाहायला मिळत आहे. प्रचारसभा आणि पदयात्रांबरोबरच, मतदारांना आपल्या बाजूने वळवण्यासाठी उमेदवारांकडून जेवणावळी आणि खानावळ डिप्लोमसीचा प्रभावी वापर केला जात असल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे, यात पुरुष मतदारांसोबतच महिला मतदारांचाही मोठ्या संख्येने समावेश आहे.**



### मतदारांना आकर्षित करण्यासाठी हॉटेल आणि खानावळीत खास मेजवान्या

प्रभागांमधील गल्लीबोळात फिरून प्रचार करणारे उमेदवार आता मतदारांना थेट हॉटेल आणि खानावळीमध्ये खास मेजवानीचे आमंत्रण देत आहेत. मतदारांना मतदान करण्यासाठी पोटपूजा करण्यासाठी बोलावले जात आहे, ज्यासाठी काही हॉटेल्स आणि खानावळी तात्पुरत्या प्रचार केंद्रे बनल्यासारख्या दिसत आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, उमेदवारांच्या समर्थकांकडून मतदारांना वेगवेगळ्या हॉटेलमध्ये जेवणासाठी पास दिले जात आहेत. काही ठिकाणी शाकाहारी जेवणाची व्यवस्था आहे, तर काही ठिकाणी खास मांसाहारी मेजवानीचे आयोजन केले जात आहे. आज त्यांच्यासोबत, तर उद्या दुसऱ्यांसोबत अशाप्रकारे मतदारांच्या फेऱ्या होत आहेत. या खानावळ डिप्लोमसीमध्ये पुरुष मतदारांप्रमाणेच महिलाही मोठ्या गटागटाने हॉटेलमध्ये जेवणासाठी जात आहेत.यामुळे लोकशाहीच्या उत्सवात मतदारांना मिळणारी किंमत वाढल्याचे दिसत आहे, पण मतावर जेवणावळीचा प्रभाव पडणार का, हे निकालातून स्पष्ट होईल.या सर्व जेवणावळ डिप्लोमसीमध्ये धार्मिक भावनांचाही आधार घेण्यात आला आहे. मार्गशीर्ष गुरुवारचा मुहूर्त साधून काही उमेदवारांनी काही प्रभागात उपवास सोडण्यासाठी म्हणून बासुंदी आणि श्रीखंडाचेही घरोघरी वाटप केले. मतदारांच्या जेवणासोबतच उपवास-पोटपूजा याचाही निवडणुकीत प्रभावीपणे वापर होत आहे. या सर्व प्रकारामुळे सुजाण नागरिक दबक्या आवाजात बोलत आहेत की, मतांसाठी दिल्या जाणाऱ्या या मेजवानीमुळे निवडणुकीची पवित्रता धोक्यात येत आहे, पण मतदारांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहता, पवित्रता सध्या फ्रिजमध्ये ठेवल्यासारखी वाटतेय.

# भाजपच्या उमेदवारांना विजयी करा

## खास.धनंजय महाडिक;कुरुंदवाडात भाजपची प्रचार सभा संपन्न

कुरुंदवाड, ता.२९(प्रतिनिधी)-

**कुरुंदवाड शहराचा विकास व्हावा लोकांचे भवितव्य उज्वल करण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन खासदार धनंजय महाडिक यांनी केले. कुरुंदवाड नगरपालिका निवडणुकीसाठी उभे असलेल्या भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी खासदार महाडिक आले होते.**



भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ विठ्ठल मंदिर चौक येथे आयोजित जाहीर कॉर्नर सभेत बोलताना खासदार धनंजय महाडिक डॉ. संजय पाटील व उपस्थित सर्व उमेदवार.

यावेळी प्रचार रॅलीतील मतदारांचा प्रचंड प्रतिसाद पाहून भाजपचे नगराध्यक्षासह सर्व उमेदवार प्रचंड मतांनी विजयी होतील असा विश्वास कोल्हापूर जिल्ह्याचे भाजपचे ज्येष्ठ नेते खासदार धनंजय महाडिक यांनी व्यक्त केला. यावेळी बोलताना ते म्हणाले, मतदारांचा उत्स्फूर्त सहभाग पाहता या निवडणुकीत कुरुंदवाड नगरपालिकेवर भाजपाचे कमळ फुलणार यात शंकाच नाही. कुरुंदवाडच्या जनतेने काँग्रेस शाहू आघाडीच्या उमेदवारांना नामोहरम करावे असे जाहीर आवाहन त्यांनी केले.

कुरुंदवाड नगरपालिका निवडणुकीचे वातावरण चांगले तापले असताना या पार्श्वभूमीवर भाजपच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ खासदार धनंजय महाडिक कुरुंदवाड येथे प्रचाराकरिता आले असता प्रचाराचा शुभारंभ त्यांच्या हस्ते गणपती मंदिर येथून करण्यात आला. यावेळी डॉ. संजय दादा पाटील, भाजपचे जिल्हा अध्यक्ष राजवर्धन नाईक निंबाळकर, ॲड. सुशांत पाटील, अन्वर जमादार, भाजपचे सर्व पदाधिकारी, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारासह सर्वच प्रभागातील भाजपचे सर्व उमेदवार उपस्थित होते. गणपती मंदिर येथून रॅली काढण्यात आली. रॅलीला मोठा उत्स्फूर्त प्रतिसाद होता. रॅलीचे रूपांतर जाहीर कॉर्नर सभेत झाले.

# कोल्हापूर जिल्ह्यात शरद पवारांची तुतारी शांत

## आजोळच्या भूमीत पाठबळ घटल्याची चर्चा

कोल्हापूर,ता.२९(पांडुरंग दळवी)-

**माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांचे पुणे आणि बारामती प्रमाणेच कोल्हापूर जिल्ह्यावर विशेष स्नेह राहिले आहे. एकेकाळी इथल्या जनतेने त्यांना आणि त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला भरघोस पाठिंबा दिला. मात्र, सध्या कोल्हापूर हळूहळू पवारांपासून दुरावत असल्याचे चित्र आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये त्यांची ही ओळख ठळकपणे जाणवत आहे. जिल्ह्यातील एकूण आठ नगरपालिकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची तुतारी हे निवडणूक चिन्ह दिसत नाही. उर्वरित ठिकाणीही ३ डिसेंबरच्या मतमोजणीनंतरच विजयाचा आवाज येईल की नाही, हे स्पष्ट होईल.**



सोनिया गांधी यांच्या विदेशी जन्मभूमीच्या मुद्द्यावरून काँग्रेस पक्षातून बाहेर पडून शरद पवार यांनी १९९९ साली राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. पक्षाला पश्चिम महाराष्ट्रातून दमदार पाठिंबा मिळाला. तरीही, राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष नेहमी साडेतीन जिल्ह्यांपुरता मर्यादित असल्याची टीका राजकीय वर्तुळात होत राहिली. पवार यांच्यामध्ये ५० ते ५५ आमदार आणि सात ते आठ खासदार निवडून आणण्याची क्षमता असूनही, जयललिता किंवा ममता बॅनर्जी यांच्यासारखी एकहाती सत्ता महाराष्ट्रात त्यांना कधीच मिळवता आली नाही, हे कटू सत्य आहे.

कोल्हापूर हे पवारांचे आजोळ आहे. पन्हाळा तालुक्यात त्यांच्या मामाचे गाव आहे, तसेच अनेक प्रमुख नातेवाईक कोल्हापुरात आहेत. त्यामुळे शहर आणि जिल्ह्यात त्यांना मानणारा मोठा वर्ग नेहमीच सक्रिय राहिला. एकेकाळी लोकसभा मतदारसंघाच्या दोन्ही जागांवर राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व होते, तसेच जिल्ह्यात चार ते पाच आमदार निवडून येत असत. जिल्हा परिषद, महापालिका, जिल्हा बँक, गोकुळ दूध संघ आणि कृषी उत्पन्न बाजार समिती या महत्त्वपूर्ण संस्थांच्या सत्तेत राष्ट्रवादी काँग्रेसची मजबूत भागीदारी होती.

अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील बंडामुळे शरद पवारांच्या राजकारणाला मोठा धक्का बसला आहे. त्यामुळे, आता त्यांच्याकडील उरल्यासुरल्या गटाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी भारतीय जनता पक्षाला वगळून इतर कोणत्याही पक्षाशी युती किंवा आघाडी करण्याची भूमिका घेतली होती. मात्र, दुर्दैवाने जयसिंगपूर नगरपालिकेत राष्ट्रवादीचा गट भाजपसोबत गेला आहे.

कागल,मुरगुड,पेठवडगाव,हुपरी, पन्हाळा, मलकापूर,आणि गडहिंग्लज येथील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची उमेदवारीच नाही. शिरोळ, कुरुंदवाड, आजरा, चंदगड आणि हातकणंगले येथे त्यांची तुतारी दिसत असली तरी, मतदारांचा कौल काय असेल, हे लवकरच स्पष्ट होईल.

मागील लोकसभा निवडणुकीत शरद पवारांना काँग्रेसचे उमेदवार श्रीमंत शाहू छत्रपती यांच्यासाठी प्रचार करावा लागला होता. विधानसभा निवडणुकीत तर त्यांचा एकही उमेदवार निवडून आला नाही. त्यांनी प्रतिष्ठेच्या केलेल्या कागल मतदारसंघात, तुतारीचे उमेदवार समरजीतसिंह घाटगे यांना हसन मुश्रीफ यांच्याकडून अपयश आले आणि विशेष म्हणजे आता घाटगे यांनी मुश्रीफ यांच्याशीच राजकीय समझोता केला आहे. या सर्व घटनाक्रमातून कोल्हापूर जिल्हा हळूहळू पवारांच्या नेतृत्वापासून दूर जात असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

# कोल्हापूर परिमंडलात ६८ कोटींची वीजबिल थकबाकी

कोल्हापूर.ता.२९(प्रतिनिधी) -

**कोल्हापूर परिमंडल अंतर्गत घरगुती, व्यावसायिक,औद्योगिक, सार्वजनिकसेवा व इतर वर्गवारीतील ४ लाख १० हजार ३७८ ग्राहकांकडे ६८ कोटी ३४ लाख रुपयांची थकबाकी झाली आहे.**

वीज बिल थकवणाऱ्या कोल्हापूर परिमंडलातील १० हजार ३५४ वीजग्राहकांचा वीजपुरवठा तात्पुरत्या स्वरूपात खंडीत करण्यात आला आहे.यात कोल्हापूर जिल्ह्यातील ५ हजार ८३५ तर सांगली जिल्ह्यातील ४ हजार ५१९ ग्राहकांचा समावेश आहे. थकबाकीदार वीजग्राहकांनी थकीत बिलांचा त्वरित भरणा करावा, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.कोल्हापूर परिमंडल अंतर्गत येणाऱ्या कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील घरगुती ३ लाख ६० हजार ३६ ग्राहकांकडे ३५ कोटी ६७ लाख, व्यावसायिक ३२ हजार ६५३ ग्राहकांकडे ९ कोटी ६३ लाख, औद्योगिक ९ हजार ८४९ ग्राहकांकडे १८ कोटी ४८ लाख रुपयांच्या वीजबिलांची थकबाकी आहे.

# शिरसंगी, यमेकोंड परिसरात हत्तीचा धुमाकूळ

## ऊस,भात,नाचणा पिकांसह काजू,नारळाच्या झाडांचे नुकसान

आजरा,ता.२९(प्रतिनिधी)–

**आजरा तालुक्यातील शिरसंगी, यमेकोंड परिसरात हत्तीने धुमाकूळ घातला आहे. शेतकऱ्यांना दर्शन देण्याबरोबरच काजू व नारळाच्या झाडांसह ऊस, भात पिकांची मोठी नासाडी हत्तीकडून केली जात आहे. त्यामुळे या परिसरातील शेतकरी हवालदिल झाला असून हत्तीचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे.**



आजरा : शिरसंगी येथील आजरा–शिरसंगी रस्त्यावर हत्तीने दर्शन दिले. तर दुसऱ्या छायाचित्रात हत्तीने मळून ठेवलेल्या भात पिकांचे केलेले नुकसान.

गेल्या आठवडाभरापासून हत्तीने शिरसंगी, यमेकोंड परिसरात तळ ठोकला आहे. ऊस, भात पिकांसह काजू व नारळाच्या झाडांचे नुकसान हत्तीकडून होत आहे. सध्या सुगीचा हंगाम अंतिम टप्प्यात आला असून भात उत्पादक शेतकरी भात मळून ते घरी आणण्याकरिता धडपडत असताना दुसरीकडे मळून ठेवलेली भाताची रासही हत्तीकडून पायदळी तुडविली जात आहे. याशिवाय नाचणा पिकाचीही नासाडी मोठ्या प्रमाणावर होत आहे. गेल्या आठवडाभरात यमेकोंड येथील विलास देसाई, तानाजी कातकर, बाळू देसाई, विलास पडते, यशवंत कांबळे, शंकर कांबळे, मारुती कांबळे यांच्या ऊस व भात पिकांचे हत्तीने नुकसान केले आहे. याशिवाय हत्तीकडून पाण्याच्या पाईपलाईन, पाण्याच्या टाक्या, दुचाकीसह वाहनांचीही मोडतोड केली जात आहे. दिवसभर हत्ती शिरसंगीच्या जंगलात राहत असून सायंकाळच्यावेळी हत्ती मालकीच्या शेतशिवारात घुसून धुमाकूळ घालत आहे.

यमेकोंड येथील महादेव होडगे, उत्तम होडगे, रामचंद्र कुंभार, कृष्णा होडगे, वसंत तिबीले, भिमराव तिबिले, मारुती कांबळे, सचिन जाधव, शामराव पंडीत, अशोक कसलकर या शेतकऱ्यांच्या भात व नाचणा पिकाचे हत्तीने नुकसान केले आहे. चंद्रकांत देसाई यांना हत्तीचे दर्शन झाले असून या परिसरातील शेतकरी भितीच्या छायेखाली आहेत. वनविभागाने हत्तीचा कायमस्वरुपी बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे.

## चिकोडीत १३ डिसेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालत

चिकोडी,ता.२९(प्रतिनिधी)–

**येथील तालुका कायदा सेवा समितीने १३ डिसेंबर रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत चिकोडी शहरातील न्यायालय संकुलात राष्ट्रीय लोकअदालत आयोजित केले असल्याची माहिती चिकोडी ७ वे अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायाधीश तारकेश्वर गौडा यांनी दिली.**

ते चिकोडी येथील पत्रकार परिषदेत बोलत होते.चिकोडी तालुका कायदा सेवा समितीचे अध्यक्ष, वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश हरीश पाटील म्हणाले,'यावर्षी येथील विविध न्यायालयांमध्ये ११००० प्रकरणांपैकी १७०० प्रकरणे लोकअदालतीत निकाली काढण्यात आली आहेत. पत्रकार परिषदेला चिकोडी तालुका वकील संघटनेचे अध्यक्ष कलमेश किवड, सचिव आर.बी. हितलमणी आदी उपस्थित होते.

## संगम कारखाना प्रतिटन ३३०० रुपये दर देणार-पाटील

संकेश्वर,ता.२९(प्रतिनिधी)–



**हिडकल डॅम येथील संगम सहकारी साखर कारखाना चालू गळीत हंगामातील प्रतिटन उसाला ३३०० दर देणार असल्याचे कारखाना अध्यक्ष राजेंद्र पाटील यांनी सांगितले.**

ते पुढे म्हणाले, संगम सहकारी साखर कारखान्याला ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांच्या उसाला प्रतिटन एकरकमी ३२०० रुपये,कर्नाटक सरकारचे ५० रुपये व संगम कारखान्याचे ५० रुपये याप्रमाणे ३३०० रुपये दर दिला जाणार आहे.संगम साखर कारखान्याची गाळप क्षमता दररोज २.५ हजार मेट्रिक टन असली तरी दररोज ३ हजार मेट्रिक टन इतके ऊस गाळप केले जात आहे.आतापर्यंत ४२ हजार मेट्रिक टन इतके ऊस गाळप करण्यात आले आहे.संगम सहकारी साखर कारखान्याला ऊस उत्पादक शेतकऱ्यांची साथ लाभल्याने चालू गळीत हंगामात संगम ३.५ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट पूर्ण करणार आहे.सहकारी तत्वावर साखर कारखान्याने चालविणे तसे आव्हानात्मक कार्य असले तरी संगम साखर कारखान्याचे संचालक मंडळ सहकारातून संगम साखर कारखान्याचा विकास साधण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील राहिले आहे.संगम वर्षागणिक प्रगतीपथावर नेण्याचे कार्य केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

## कुंथल वडेर यांना पुरस्कार जाहीर

बेडकिहाळ,ता.२९(वार्ताहर)–



**येथील लट्ठे शिक्षण संस्थेच्या कन्नड माध्यम कॉन्व्हेंट प्राथमिक शाळेचे शिक्षक कुंथल अजित वडेर (नागझरी) यांना अन्वेषणे सांस्कृतिक अकॅडमी, राजाजीनगर बेंगलोर यांच्यावतीने 'शिक्षणरत्न राजोत्सव' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर झाला आहे.शिक्षण क्षेत्रासह सामाजिक व धार्मिक कार्यात दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल सन २०२५ –२६ सालासाठी हा पुरस्कार प्रदान केला जात आहे.**

पुरस्कार सोहळ्याचे आयोजन रविवार, ता.३० नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता, नयन सभांगण, रविंद्र कला क्षेत्र, जे.सी. रोड, बेंगलोर येथे करण्यात आले आहे.गेल्या १९ वर्षांपासून वडेर हे लट्ठे शिक्षण संस्थेच्या कन्नड माध्यम प्राथमिक शाळेत इंग्रजी विषयाचे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. शिक्षणासोबतच सामाजिक, धार्मिक व क्रीडा क्षेत्रात विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन करून त्यांचे व्यक्तीमत्त्व घडविण्यात ते मोलाची भूमिका बजावत आहेत.

## कलागुणांसाठी प्रतिभा कारंजी स्पर्धा प्रेरणादायी

### लक्ष्मण चिंगळे

अकोळ,ता.२९(वार्ताहर)–

**विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी प्रतिभा कारंजी स्पर्धा या प्रेरणादायी असून यातूनच आदर्श खेळाडू, कलाकार, निर्माण होऊ शकतात असे मत संगोळी रायण्णा शिक्षण संस्थेचे संस्थापक तथा बुडा अध्यक्ष लक्ष्मण चिंगळे यांनी केले.**



अकोळः कार्यक्रमात दिपप्रज्वलनप्रसंगी लक्ष्मण चिंगळे व इतर.

जिल्हा पंचायत बेळगावी, तालुका पंचायत निपाणी, गटशिक्षणाधिकारी कार्यालय निपाणी यांच्या संयुक्त सहकार्याने अकोळ सीआरसी पातळीवरील प्रतिभा कारंजी स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षपदावरून ते बोलत होते.यावेळी सीआरसी प्रमुख नारायण सुतार, सचिन केस्ते–भोज, लक्ष्मण चिंगळे, मुख्याध्यापक सीए पाटील आदींच्या हस्ते सरस्वती प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने उद्घाटन करण्यात आले.यावेळी प्रशालेच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी एन.के.सुतार यांनी मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी एमजीएस शाळेच्या मुख्याध्यापिका एल .बी. प्रताप, के.बी.एस.शाळेचया मुख्याध्यापिका शैला नेर्ले,एम.एस करडे,क्रीडा शिक्षक, परीक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. आभार भक्ती रानमाळे यांनी मानले.



अलाटवाडी येथे महात्मा फुले पुण्यतिथीनिमित्त प्रतिमापूजनप्रसंगी शिक्षकवृंद व विद्यार्थी.

## महात्मा फुले यांचे सामाजिक कार्य आदर्शवत-खांडेकर

पट्टणकोडोली,ता.२९(प्रतिनिधी)–

**स्त्री शिक्षण आणि बहुजन समाजासाठी महात्मा ज्योतिराव फुले यांनी आपले जीवन वाहून घेतले आहे. महात्मा फुले यांचे सामाजिक कार्य आदर्शवत असून स्त्री शिक्षणासाठी त्यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे आज अनेक स्त्रिया उच्च पदावर पोहोचल्या आहेत. त्यासाठी सर्वांनी महात्मा फुले यांची विचारसरणी अनुसरण करावी, असे प्रतिपादन मुख्याध्यापक शशिकांत खांडेकर यांनी केले.**

विद्यामंदिर अलाटवाडी (ता. हातकणंगले) या जिल्हा परिषदेच्या शाळेत महात्मा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षपदावरुन ते बोलत होते.प्रारंभी अध्यापक विठ्ठल पुजारी यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी समर्थ नंदीवाले, वैष्णवी पोवार या विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून महात्मा ज्योतिराव फुले यांच्या कार्याचा आढावा घेतला.यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. हरी माने यांनी आभार मानले.

## म.बसवेश्वर सौंदलगा शाखेचा वर्धापन दिन उत्साहात

निपाणी,ता.२९(प्रतिनिधी)–

**सहकार क्षेत्रातील अग्रेसर, बेळगाव जिल्ह्यातील प्रसिद्ध श्री.महात्मा बसवेश्वर क्रेडीट सौहार्द सहकारी नि.निपाणीच्या सौंदलगा शाखेचा २३ वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न झाला.प्रारंभी शाखा चेअरमन संजय भेडूगळे, व्हा.चेअरमन जिनगोंडा पाटील यांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले. सहकाररत्न संस्थापक चेअरमन डॉ.सी.बी.कुरबेट्टी यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले.**



महात्मा बसवेश्वर शाखा वर्धापनदिनप्रसंगी उपस्थित मान्यवर.

शाखेचे संचालक प्रसाद इनामदार यांनी सौंदलगा शाखेत ९ कोटी १ लाख ठेवी असून कर्ज वितरण ५ कोटी २० लाख, संस्थेस १२ लाख ९४ हजार नफा झालेला असून वार्षिक उलाढाल ३८ कोटी झाल्याचे सांगितले

कार्यक्रमास संस्थेचे चेअरमन श्रीकांत परमने, व्हा.चेअरमन प्रताप पट्टणशेट्टी, संचालक डॉ.एस. आर.पाटील, संचालक किशोर बाली, सुरेश शेट्टी, महेश बागेवाडी, अशोक लिगाडे, सदानंद दुमाले, सदाशिव धनगर, दिनेश पाटील, संचालिका पुष्पा कुरबेट्टी, विजया शेट्टी, सुवर्णा पट्टणशेट्टी, सीईओ एस.के आदनावर, कर्मचारी उपस्थित होते.स्वागत अजित लंबे यांनी केले.आभार तानाजी वाक्रुसे यांनी मानले.

## कारदगा येथे आज साहित्यिकांची मांदियाळी

### मराठी साहित्याचा पाच सत्रात होणार जागर

कारदगा,ता.२९(प्रतिनिधी)–

**कारदगा (ता.निपाणी) येथील साहित्य विकास मंडळ आयोजित २९ वे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन आज रविवार ता.३० रोजी पाच सत्रामध्ये संपन्न होणार आहे. या समेंलनासाठी साहित्यकांची मांदियाळी अवतरणार आहे.बेळगाव जिल्हा व सीमाभागात मराठी साहित्याचा जागर होत असल्याने साहित्य रसिक मराठीचा आस्वाद घेण्यासाठी सज्ज झाले आहेत.**

वसंतराव गायकवाड महाकांदबरीकार निवृत्त उपायुक्त महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांचे कांदबरी सादरीकरण, प्रा.डॉ.अच्यूत माने निपाणी यांची ''स्मरण यात्रा'' नावाचे पुस्तक प्रकाशन या संमेलनामध्ये होणार आहे.संजय अवघडी यांचे 'अमृतधाराः धर्म, अध्यात्म आणि जीवनमूल्ये 'नावाचे पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. डॉ.श्री.आलोक जत्राटकर, जनसंपर्क अधिकारी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर हे शिक्षण समाज आणि संस्कृती या विषयावर व्याख्यान देणार आहेत.त्याबरोबरच कथाकथन संजय कळमकर अहिल्यानगर यांचे होणार आहे.

कवी संमेलनात डॉ.केशव खटींग,हिंगोली, नितीन चंदनशिवे, कवठेमहांकाळ, संतोष नारायणकर, परभणी हे कविता सादर करणार आहेत. निवेदक म्हणून विजय काळे, कारदगा हे काम पाहणार आहेत.

कार्यक्रम ज्ञानेश कोळी चंद्रे आणि सहकारी यांच्या नेतृत्वाखाली होणार आहे.गावात साहित्यकांची मांदियाळी अवतरणार असल्याने संपूर्ण कारदगा नगरी व सीमा भागात वातावरण मराठी मय झाले आहे.



अंमलझरी:सैन्यदलात निवड झालेल्या युवकांच्या सत्कारप्रसंगी मान्यवर.

## अंमलझरी येथे सैन्यदलात भरती झालेल्या युवकांचा सत्कार

निपाणी,ता.२९(प्रतिनिधी)–

**येथून जवळच असलेल्या अंमलझरी गावात भारतीय सैन्यदलात निवड झालेल्या युवकांचा सत्कार श्री महादेव सेवा संघ व ग्रामस्थ यांच्यावतीने करण्यात आला.प्रास्ताविक सचिन कौंदाडे यांनी केले.**

सैन्यदलात भरती झालेले युवक उत्कर्ष कांबळे, लक्ष्मण गावडे, विठ्ठपा कट्टीकर या तीन युवकांचा वसंत रेपे, अभिजित कौंदाडे, महेश खोत,अनिल कौंदाडे, चंद्रकांत खोत, रामा रेपे, कुमार कंकनवाडे यांच्या हस्ते शाल, पुष्पहार, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.तसेच या युवकांच्या पालकांचाही सत्कार झाला.

कार्यक्रमास सुरज पाटील, सागर मोरे, विनू कंकनवाडे, शुभम खोत, उमेश खोत, आशिष खोत, यश कौंदाडे, मनिष कोकरे, सतीश खोत, अमेय कोकरे,नवनाथ कांबळे, जीवन कांबळे, शंकर कांबळे,मारुती कांबळे, संकेत कांबळे, गणेश कांबळे,महादेव कांबळे, भरमाप्पा कट्टीकर, सत्यापा गावडे, हालप्पा गावडे व गावातील युवक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बेडकीहाळ येथे राष्ट्रीय संविधान दिन उत्साहात साजरा

बेडकिहाळ,ता.२९(वार्ताहर)–

**येथे राष्ट्रीय संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने बेडकीहाळ बौद्ध समाजाच्यावतीने बेडकीहाळ सर्कल परिसरातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास उपस्थितांनी पुष्पहार घालून अभिवादन केले. यानिमित्त उत्तम पाटील यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.**

याप्रसंगी इंद्रजीत पाटील, अशोक आरगे, अभय मगदूम, शीतल खोत , संजय पाटील, सचिन पाटील, अब्दुल वहाबजुनेदी पटेल, गंगाधर सूर्यवंशी, जनगौडा धड्डु पाटील, नाभिराज खोत, महावीर पाटील, लिंगराज सूर्यवंशी, सचिन घाटगे,अमर शास्त्री, आनंद शिंदे,संतोष कांबळे, शिरीष कांबळे, शिलवंत यादव,नेताजी सनदी,यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.तसेच बेडकीहाळ ग्रामपंचायत कार्यालयात हि संविधान दिन साजरा करण्यात आला. ग्रामपंचायतीच्या आवारात संविधान प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले व संविधान प्रतिज्ञा घेण्यात आली.कार्यक्रमास शिवानंद बिजले यांच्यासह सदस्य व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## बोरगावसह परिसरात संविधान दिन उत्साहात

ढोणेवाडी,ता.२९(प्रतिनिधी)–

**सामाजिक कार्यकर्ते तुषार कांबळे हे अनेक समाज कार्यात हिरीरीने सहभाग घेत. त्यांचे कार्य खरच आजच्या युवा पिढीला आदर्शवत आहे.समाज सुधारकांचे कार्य जनमाणसात रुजविण्यासाठी त्यांची धडपड खरंच कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन मारुती मिरगे यांनी केले.**



शाळेला झाडे वाटप करताना तुषार कांबळे,डॉ.अरिफ मुजावर.


ते बोरगाव (तालुका निपाणी) येथे संविधान दिनानिमित्त वृक्षारोपण व संविधान प्रस्तावना पाठांतर कार्यक्रमात बोलत होते.बोरगाव येथील कन्नड, उर्दू मराठी शाळेमध्ये वृक्षारोपण व संविधान प्रस्तावना वाचन या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.प्रारंभी साई सुपर मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉ. अरिफ मुजावर यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रतिमा व संविधान पूजन करण्यात आले. त्यानंतर शाळेमध्ये वृक्षारोपण कार्यक्रम मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी तुषार कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी स्वागत रामजी पकाले यांनी तर आभार इब्राहिम मुल्ला यांनी मानले .या कार्यक्रमासाठी शिवाजी भोरे ,सर्जेराव धनवडे, किरण शिंगे, संजय महाजन, प्रकाश गुरव, सुदीप सनदी, प्रेम कांबळे सिद्धार्थ सनदी,हर्षवर्धन कांबळे,प्रकाश गुरव,सोमनाथ कुरळे, अभि पाटील, राकेश शिंगे, भूषण कांबळे,भीमराव कट्टी,किरण भोरे, अलोक कांबळे, लोकेश शिंगे यांच्यासह विद्यार्थी, मुख्याध्यापक शिक्षक उपस्थित होते.

ढोणेवाडीयेथील नालंदा बुद्ध विहारात संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी अनिल कांबळे यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी बौद्ध उपासक उपस्थित होते. माणकापूर, कारदगा, भोज,मांगुर, बारवाड, चाँदशिरदवाड येथे ही संविधान दिन साजरा करण्यात आला.

## हुपरीचे सहकार क्षेत्रातील जुने-जाणते नेतृत्व हरपले

### जि.प.चे माजी अध्यक्ष नानासाहेब गाट यांचे निधन

हुपरी,ता.२९(वार्ताहर)



**हुपरी येथील ज्येष्ठ नेते आणि कोल्हापूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष नानासाहेब फक्कड गाट (वय ८०) यांचे आज शनिवारी पहाटे दुःखद निधन झाले. ते गेल्या काही दिवसांपासून आजारी होते. त्यांच्या निधनाने शहर तसेच परिसराच्या सामाजिक, राजकीय आणि सहकार क्षेत्रातील एक जुने–जाणते नेतृत्व हरपले असून, शहरात शोककळा पसरली आहे.**

उच्चशिक्षित असलेले नानासाहेब गाट यांनी युवक संघटनेच्या माध्यमातून सामाजिक कार्यात पाऊल टाकले. ग्रामपंचायत सदस्य म्हणून त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. ज्येष्ठ नेते शरद पवार, दिवंगत देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार आणि खासदार बाळासाहेब माने यांचे ते कट्टर कार्यकर्ते म्हणून ओळखले जात होते आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सक्रिय होते.

**जिल्हा परिषदेत हॅट्रिक आणि अध्यक्षपद**

दिवंगत खासदार बाळासाहेब माने यांनी १९९२ मध्ये नानासाहेब गाट यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना जिल्हा परिषदेच्या स्वीकृत सदस्यपदी काम करण्याची संधी दिली. या संधीचा फायदा घेत त्यांनी १९९७, २००२ आणि २००७ अशा सलग तीन वेळा जिल्हा परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडून येत हॅट्रिक साधली. यानंतर २००७ मध्ये त्यांना कोल्हापूर जिल्हा परिषदेचा अध्यक्ष म्हणून काम करण्याचा बहुमान प्राप्त झाला.

**पाणी प्रश्नाची सोडवणूक**

अडीच वर्षांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात त्यांनी विविध विकासकामांच्या माध्यमातून भरीव कामगिरी केली. विशेषतः, शहरास भेडसावणाऱ्या पाणी प्रश्नावर त्यांनी विशेष लक्ष दिले. दूधगंगा नदीवरील तेरा कोटी रुपयांची महत्त्वपूर्ण पाणी पुरवठा योजना त्यांनी मंजूर करून घेतली आणि ती जलदगतीने पूर्ण करून कार्यान्वित देखील केली. याच योजनेतून आजही हुपरी शहराला पाणी पुरवठा होत आहे.

**सहकार आणि शैक्षणिक क्षेत्राला आधार**

ते श्री व्यंकटेश सहकारी सूत गिरणीचे उपाध्यक्ष तसेच श्री पंचमुखी गणेश पतसंस्थेचे आणि श्री शेतीमाल सहकारी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष होते.युवक संघटना व छत्रपती शाहू नागरी सहकारी पतसंस्था आदी संस्थांच्या उभारणीत त्यांचा मोलाचा वाटा होता.त्यांच्या निधनामुळे परिसराचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, दोन मुली, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ज्येष्ठ नेत्याला श्रद्धांजली वाहण्यासाठी परिसरातील नागरिकांनी आपली दुकाने बंद ठेवून दुखवट्यात सहभाग घेतला.

## संस्काराची बीजे पुढील पिढीला देणे आवश्यक

### यल्लेश काळे

बोरगाव,ता.२९(प्रतिनिधी)–

**आपल्या परिस्थितीला दोष न देता त्याला साधन बनवीत कठीण परिश्रमातून आपण शिक्षण घेतले पाहिजे .संस्कार हित शिक्षणाला महत्व देऊन यश गाठण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे.ज्या घरात संस्कार नाही त्या घरात सुख नाही.संस्कारावरून मुले कशी असावी हे समजते. भ्रष्टाचार, अन्याय, अत्याचार याविषयीची असावी लढण्याची वृत्ती असणारी अशी मुले आज घडली पाहिजे.**



पीएम श्री मराठी शाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना यल्लेश काळे.

मोबाईलच्या दुनियेत चुकीच्या गोष्टीचा धिक्कार करणारी पिढी निर्माण होणे गरजेचे आहे. म्हणूनच संस्काराची बीजे पुढील पिढीला देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन विजयनगर जिल्ह्याचे समाज कल्याण खात्याचे उपनिर्देशक यल्लेश काळे यांनी केले.

ते बोरगाव येथील पीएम श्री मराठी शाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते.ते पुढे म्हणाले, आपण अत्यंत कठीण परिश्रमातून शिक्षण घेतले आहे. शिक्षण घेत असताना आई–वडिलांचा व गुरुजनांचा आदर केला आहे त्यामुळेच आपण या पदावर पोहोचलो आहे. ग्रामीण भागातील मुलांच्या खूप बुद्धिमत्ता आहे .याचा उपयोग आपण करून घेणे गरजेचे आहे. मुलांनी आपल्या विद्यार्थी जीवनातच आपली ध्येय ओळखून ते गाठण्यासाठी प्रयत्न करावेत .आपण ज्या समाजात घडत आहे याची जाणीव ठेवून आई–वडील, गुरुजन, शाळा आपल्या गावाचे नाव उज्वल करण्यासाठी प्रयत्न करावेत.शाळेचे माजी मुख्याध्यापक एस .बी. पाटील, आर.ए .इंगळे, आनंद काळे, शाळा सुधारणा समितीचे अध्यक्ष शिवाजी भोरे उपाध्यक्ष सौ स्वाती शिंगे, संचालिका सुजाता पाटील,शाळेचे मुख्याध्यापक आर. एम .पकाले, उर्दू शाळेचे मुख्याध्यापक आय. य. मुल्ला,कन्नड शाळेच्या मुख्याध्यापिका एस.एस. गेरेपुजारी, यांच्यासह विद्यार्थी, पालक, एसडीएमसीचे सर्व संचालक उपस्थित होते. सूत्रसंचालन एम. व्ही.मिरगे यांनी केले तर एस.बी.बेनुरकर यांनी आभार मानले.

# छोट्या जाहीराती

## पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत

## * खरेदी विक्री *

**एन.ए. प्लॉट विकणे-** कलेक्टर व तहसिल कबनूरमध्ये जयहिंदनगर, दत्तनगर, गणेश मंदिर मागे, हॉटेल पॅराडाईज व गुडलकसमोर, सर्व सोयीसह संपर्क- ८१४९९६५६९९, ९८९०२७४१७६.

**सेंटर टॉवर,** सुंदर बागेजवळ, पीएनजी पासूनजवळ, १५०० स्क्वे. फूटाचे हॉल भाड्याने अथवा विकणे आहे. (बेसमेंट ४०० स्क्वे. फूट गाळा) संपर्क-९८६०८५८९९४

**विकणे आहे.** डिसेंट २ बीएचके फ्लॅट सनसिटी यड्राव येथे व कोरोची, धनगर माळ येथे १८०० स्क्वे. फूट जागेमध्ये ९०० स्क्वे. फूटाचे सर्व सोयीनियुक्त घर विकणे आहे. संपर्क-९४०५५८४७३३

**ज्युपिटर** २०१९ मॉडेल एक हाती महिला वापर असलेली विकणे आहे. दोन्ही टायर, बॅटरी, सीट नवीन. संपर्क-८२६२८३८९८३.

**बंगला व शेड** विकणे आहे. कोल्हापूर रोड, व्यंकटेश्वरा शाळे मागे, पाटील मळा, कबनूर, इचलकरंजी. मो. ९४२०४५४२२२.

**२ बीएचके विकणे आहे-** केटकाळे नगर, कबनूर. गाळा भाड्याने देणे. कबनूर रोड, जवाहरनगर, मो. ९५०३८६२६४०.

**५२ मागाची रिकामी शेड** लाईट पाणी सर्व सोयीनियुक्त विकणे आहे. ६० फुटी रोडटच सांगली रोड, बालाजी मंदिरजवळ, इचलकरंजी. मो. ९३२६०२२९१०, ९०११७२५२०५.

**कपडे वाळवण्याचे सिंगल** पाईप खाली-वरती करता येणारे हॅगिंग स्टॅण्ड, डासांची जाळी, स्लाईडींग विंडो, किचन ट्रॉली, कबनूर जाळी, राहुल- मो. ७५०७७१६६६४, ७५०७७२६६६४.

**संभाजीनगर कोरोची येथे** ४ गुंठ्यामधील फार्म हाऊस विकणे आहे व १ ते २ गुंठ्याचे प्लॉट उपलब्ध आहेत. संपर्क-शशिकांत- ७२१८३५५८८५, ७७६९०४११५०

**अब्दुललाट येथील** अरिहंत कॉलनीलगत बसवान मळा येथे १३ गुंठे एनए प्लॉट योग्य किंमत आलेस विकणे. क्लियर टायटन. मो. ९५७९३५४१८५

**फ्लॅट विकणे-** २ बीएचके तुळजाभवानी नगर, शहापूर. संपर्क- ९८८१४५३७९१

**दत्त जयंती महाप्रसादासाठी** गाय/म्हैशीचे साजुक कणीदार तूप होलसेल दरात पोहोच मिळेल. परगावी पार्सलची सोय आहे. ८७८८२०४५१३

**८८० स्क्वेअर फूट** प्लॉट विकणे आहे. दुसरा मजला, अक्षय अपार्टमेंट, गांधी पुतळा, गद्रे दत्त मंदिरजवळ. संपर्क-९८६०८८७४६६

**दोन व तीन पहारी** मिरची कांडप मशिन व १६ इंची लक्ष्मी पिठाची गिरणी चालू स्थितीत विकणे. संपर्क-९७६३२८५१७४

**२२०० स्क्वे. फूट** तयार शेड विकणे आहे. व्यंकटेश कॉलनी मागे, जवाहरनगर, इचलकरंजी. ९८५०९४९०८०

**नविन १ बीएचके** बांधकाम असलेले सर्व सोयीनियुक्त रो-बंगला विकणे. प्लॉट ५२५ स्क्वे. फूट, बांधकाम, ८५० स्क्वे. फूट डब्बल मजला (महानगरपालिका पासून फक्त ३ किमी. अंतर) पत्ता-संयुक्त कॉलनी, कोरोची. संपर्क-९५५२०२०१५५

**विकणे आहे.** चांगल्या स्थितीतील १५ एचपी-५ एअर कॉम्प्रेसर त्वरीत विकणे आहे. इच्छुकांनी संपर्क साधावा. संपर्क-७७१९८६०९०९

**रामलिंग रोड (आळते) येथे** रोडटच ४० गुंठे जमिन देणे आहे. फार्म हाऊससाठी उत्तम लोकेशन लाईट, पाणी, रस्ता सर्व सोयीनियुक्त अर्जंट विकणे आहे. संपर्क- ९९६०३९२५७१, ८६००५८७३९४

**ईयर एन्ड धमाका-** किचन ट्रॉली च्या मेंटेनन्सने वैतागला आहात? आता चिंता सोडा. २०२५ मधील लेटेस्ट किचन बनवा. तेही आपल्या जुन्या किचन ट्रॉली रिप्लेस करून भरघोस परतावा घेऊनच. इचलकरंजी परिसरातील The Famous किचन सम्राट घेऊन आले आहे ईअरएण्ड ऑफर मग विचार कसला करता? आजच कॉल करा आणि निश्चित रहा. मे किचन सम्राट, इचलकरंजी. ९८२२२४३६९३

**Beams for Sale-** 1) Toyota-190 & 230-1100MM. 2) Pic anol-190-1000MM. 3) Sulzer-390 & 430-1000MM. Contact- 7720013001

**आपल्या घरी येवून** सोफा क्लिनिंग (शांपोईंग) करून देवू नवीन व जुने बंगलो क्लिनिंग करून देवू. संपर्क- ८९७५९७४१०७, ८७९३९८४६९४

**रामलिंग, कुंथुगिरी** डांबरी रोडटच २०० फूट फ्रंटेज असणारा फार्म हाऊससाठी उपयुक्त प्लॉट विकणे आहे. संपर्क-९३७०१४१५०५

**विकणे आहे.** २ एचपी पल्वलायझर २ नग, १५ लिटर रोटर मशिन-२ नग, १० एचपी पल्वलायझर-१ नग. संपर्क-८४८४८७१८६३, ८४४६७५८६८३

**हायवेटच जागा देणे आहे.** निपाणीपासून १२ किमी. अंतरावरती निपाणी आणि संकेश्वरच्या मध्ये कणगला KIADB समोर पुणे-बंगळूर (NH-4) हायवेटच १४५ फूट फ्रंट असलेली २९ गुंठे जागा देणे आहे. संपर्क-९६०४११४१२१

**जुने व नवे पॉवरलूम** घेऊ व देऊ तसेच फवारा, कांडीमशीन डक्टींग घेऊ व देऊ. संपर्क- ८३१७२९१००८

## * भाड्याने देणे/घेणे *

**१५०० स्क्वे. फूट जागा,** गोठ्यासाठी उपयुक्त बांधकाम लाईट, पाण्याच्या सोयीसह भाड्याने देणे आहे. संपर्क-वनिता केमिकल्सजवळ, टाकवडे. फोन- ९६०४८१५९७८

**मेन रोड हिरापन्ना** लस्सीसमोर अरोमा बेकरीशेजारी गाळा भाड्याने देणे आहे. (व्यवसायासाठी उपयुक्त) संपर्क-९०३९६९३९६९

**पेट्रोल पंपावर** खाद्य व्यवसायाकरिता जागा भाड्याने देणे आहे. संपर्क-८३८०८१११८८

**मेन रोडटच १४०० स्क्वे.** फूट शोरूम बँक, ऑफिस, हॉस्पिटल, कॉर्पोरेट इत्यादी ऑफिससाठी नवीन बांधकाम असलेली इमारत भाड्याने देणे. फूट पार्किंग/फूट डिसप्ले, इचलकरंजी. ९८२२३२१३१७

**सर्व सोयीनियुक्त** गोडावून भाड्याने देणे. गारमेंट व इतर व्यवसायासाठी संपर्क-९५९४७५१२०१

**२ बीएचके** सर्व सोयीनियुक्त कंपौंड, पार्किंगसहीत भाड्याने किंवा गहाणवट देणे आहे. जाणता राजा, गल्ली नं.३, खोतवाडी. संपर्क- ७७६९८३८६४८, ९४०४४०७८२०

**२ खोल्या भाड्याने** देणे आहे. वेद भवनजवळ, इचलकरंजी. (शाकांहारीसाठी) संपर्क- ८९९९६००६५०.

**३ रूमचे आरसीसी घर** (१ बीएचके) भाड्याने देणे. मुसळे हायस्कूलजवळ, सांगली रोड, इचलकरंजी. मो. ९८९०३७१५९०, ९३०७३६५२७२.

**६३X४३ चे गोडाऊन** लाईट पाणी सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे आहे. लक्ष्मी महेश औद्योगिक सोसायटी, अ. लाट. संपर्क- ९३५६१०५६५६.

**इंडस्ट्रीयल इस्टेट** व ग्रामीण भागात १००० पासून १०००० स्क्वे. फुटापर्यंत. गोडाऊन शेड भाड्याने मिळतील. संपर्क- ९५५२७४३९८६.

### वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

**१ बीएचके रूम** भाड्याने/ गहाणवट देणे आहे. सांगली रोड, येलाज मळा, इचलकरंजी. मो. ९९७०८०४८६५.

**१ बीएचके फ्लॅट** भाड्याने देणे आहे. डि मार्टजवळ, छत्रपती संभाजी महाराज चौक, इचलकरंजी. मो. ८८८८२५३१६४.

**भाड्याने देणे-** १ बीएचके खोल्या सर्व सोयीनियुक्त. पत्ता- किरण गॅस मागे, लंगोटे मळा, २ री गल्ली, अर्जुन कदम, ९४२३२६७३२१.

**भाड्याने देणे-** वडा पाव व नाष्टासाठी लहान गाळा भाड्याने किंवा मोकळी जागा, भाड्याने पाहिजे. जाधव- ९८९००२७४१७.

**जागा भाड्याने देणे.** १) ८२०० चौ. फूट तीन रस्ते असलेली रिकामी जागा योगेश सायझिंगसमोर भोने माळ, इचलकरंजी. वेअर हाऊसिंग टर्फ ग्राऊंड इ.साठी उपयुक्त २) कबनूर पंचगंगा कारखाना रोडटच ५००० चौ. फूट जागा. (गावठाण) व २ खोल्या लाईट, पाणी कनेक्शनसह व्यवसायासाठी उपयुक्त. संपर्क- ९८९०३०५३१५, ७५०७२९५११२

**शेड भाड्याने देणे-** ७ एच.पी. लाईटसह १४X२६=३६० फुटाचे शेड फॅब्रिकेशन, वर्कशॉप, गोडाऊनसाठी उपयुक्त पत्ता- आयजीएम हॉस्पिटल रोड, नवयुग कॉर्नर, इचलकरंजी. मो. ९८२२५३४४५३.

**सांगली सिव्हीलसमोर** २ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे आहे. डॉ. सुभाष पाटील- ९४२२६२५५१५.

**भाड्याने देणे**/विकणे- आरसीसी हॉल+ किचन संडास, बाथरूम, स्वतंत्र लक्ष्मी मंदिर रोड, सिध्दी विनायक हॉलजवळ, नदीवेस रिंग रोड, इचलकरंजी. मो. ९७६५०२३०५४, ८६२६०४२५२५.

**१ बीएचके फ्लॅट** भाड्याने देणे आहे. प्रियदर्शनी कॉलनी कबनूर हायस्कूलसमोर, कबनूर. संपर्क- ९८८१८१४८८०.

**२ बीएचके फ्लॅट** भाड्याने देणे. सांगली नाक्याजवळ, इचलकरंजी. मो. ९८८१७७५२४२.

**दुकान गाळा भाड्याने** देणे आहे- ३० वर्षांपासून चालू स्थितीतील स्टेशनरी दुकान फर्निचरसहीत भाड्याने देणे आहे. सरस्वती मार्केट, इचलकरंजी. मो. ९८८१८१४११४, ९८८१७७५२४२.

**इचलकरंजीतील** व्यवसायीक जागा भाड्याने देणे. मॉडर्न स्कूलसमोर कोल्हापूर मेन रोडटच तळमजला २ रस्त्यांची कमर्शियल आरसीसी इमारत व जागा १८५० चौ. फूट सुरक्षित कंपौंड लाईट, पाणी कनेक्शनसह संपर्क- ९८९०३०५३१५, ७५०७२९५११२

**गाळा भाड्याने देणे आहे.** २०० स्क्वे. फूट मेन रोड, जनता बँक चौक. संपर्क-९५६१६६६९६७, ९०२८४४०१००

**२ बीएचके फ्लॅट** पहिल्या मजल्यावर सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे. पत्ता- भारती हायस्कूलच्या मागे आर.के. नगर, जिजामाता पार्कजवळ, शहापूर रोड, इचलकरंजी. ९७३०६३९३३६

**घर भाड्याने देणे आहे.** छोट्या कुटूंबासाठी केटकाळे गल्ली, शिवाजीनगर पोलिस स्टेशनसमोर. संपर्क-८९९९१९७००७

**२६X७५ आरसीसी** शेड हवेशीर टकाटक सर्व सोयीनियुक्त गारमेंट व इतरसाठी भाड्याने देणे आहे. विठ्ठलनगर. संपर्क-९६०४२७३००७

**२ रूम सर्व सोयीनियुक्त** भाड्याने देणे आहे. गोडाऊनसाठी आण्णा रामगोंडा शाळे पाठीमागे, इचलकरंजी. ८६६८४४३८६२, ७६६६२३१५३६

**चालू स्थितीतील** मोबाईल शॉपी भाड्याने देणे आहे. संपर्क- ८८३०५०८०६०

**भाड्याने देणे-** २ बीएचके सर्व सोयीनियुक्त १३०० स्क्वे. फूट पहिल्या मजल्यावर महासत्ता चौक, इचलकरंजी. फोन-९८२२६१००७३, ९६५७९५२५९९

**शहराच्या मध्यवर्ती** मोहन ऑर्केडमध्ये कमी भाड्यात गाळा भाड्याने देणे आहे. ऑफिस, क्लासेस, बिझनेस स्टार्टअपसाठी उपयुक्त. संपर्क-९९२३४६००६६

**भाड्याने देणे-** जनता बँकेसमोर, मेन रोडटच ४०० फूट दुकानगाळा. संपर्क-९८२३१५६५७२, इचलकरंजी.

**६०X२६ फुटाची** आरसीसी शेड पाण्याच्या सोयीसह भाड्याने देणे. गावभाग, टाकवडे वेस, इचलकरंजी. संपर्क-९८२२०३११६८

**वन रूम किचन,** हॉल गहाणवट देणे. अॅटॅच बाथरूम, २४ तास पाणी उपलब्ध व किराणा दुकान भाड्याने देणे आहे. भारतमाता हौसिंग सोसायटी, गल्ली नं.३, पंचगंगा पेट्रोल पंपासमोर, इचलकरंजी. मो. ९५२७८३२६३८

**विद्यार्थ्यांसाठी** (मुलांसाठी) रूम कॉट बेसिसवर भाड्याने मिळतील. सांगली नाका, अभय दूध डेअरी पाठीमागे, इचलकरंजी. ७८४१८२२१७२, ९८२३०८१६८१

**शेड भाड्याने पाहिजे.** वायडिंग मशिनसाठी १४००/१५०० स्क्वेअर फूट थोरात चौक किंवा आसपास पाहिजे. फोन-९६०४०४८२८९, इचलकरंजी.

**गाळा भाड्याने देणे आहे.** जनता बँकजवळ, शाहू कॉर्नर येथे व चाईनीज सेंठ विकणे आहे. संपर्क- ९४२११०८०८५, ९०२१७६९५९६

**३५०० स्क्वे. फूटची** पूर्ण बिल्डींग भाड्याने देणे. बँक, गोल्ड शोरूम, फायनान्स, मोबाईल शोरूम, पतसंस्था, ऑफिस हॉल सर्व सोयीनियुक्त घर, एचडीएफसी बँकलगत, राणी बागेसमोर, इचलकरंजी. ९२५६५७२७२७

**३००० व २०००** स्क्वे. फूटाचे शेड गोडावून व इतर व्यवसायासाठी भाड्याने देणे. ३० फूटी रोडटच वैरण बाजारजवळ, लक्ष्मी मंदिरसमोर, इचलकरंजी. फोन- ९०९६९४८८०१

## * नोकरी विषयक *

**किचन हेल्पर पाहिजे-** इचलकरंजी. मो. ८२०८८३९०२४, ८१७७९८६९६९.

**मार्केटिंग ऑफिसर** नेमणे आहेत. इचलकरंजी मधील मल्टिस्टेट को. ऑप. क्रेडिट सोसायटी आणि सहकारी पत संस्थेमध्ये व्यवसायवाढी साठी अनुभवी फिल्ड एक्झिकिटिव्ह ऑफिसर /मार्केटिंग ऑफिसर यांची पदे तात्काळ भरणे आहेत सम्पर्क ९२७०८४५०७१

**गांधी कॅम्पमधील** बुगड बंधू घरगुती मांसाहारी खानावळीमध्ये वाटपी कामासाठी कामगार पाहिजेत. वेळ-संध्याकाळी ७ ते ११. संपर्क- ९८९०३५७४६१.

**इचलकरंजीमधील** नामांकीत सीएनसी- व्हीएमसी इंजिनिअरींग मशिन शॉपमध्ये खालील जागा भरावयाच्या आहेत. १) ऑपरेटर-३ (शिकाऊ व अनुभवी), २) हेल्पर-२, (शिकाऊ व अनुभवी), ३) अॅटोकॅड इंजिनिअर-१ (अनुभवी), ४) QA Head (अनुभवी), आकर्षक पगार दिला जाईल. संपर्क- ८३८१०७०५९७, ७७२२०४८२३४.

**आईस्क्रिम पार्लरमध्ये** पार्ट टाईम कामगार पाहिजे पत्ता- स्टेशन रोड जुना नाका, इचलकरंजी. मो. ९७६६०११३०३.

**कंपनी देखरेखसाठी** नवरा बायको पाहिजेत. राहणेची सोय. पत्ता- लक्ष्मी इंडस्ट्रीज, हातकणंगले, मो. ९८५००५६५३२.

**कामगार पाहिजे -** पॅकींग व फोर व्हिलर ड्रायव्हींग कामाकरीता संपर्क- समर्थ ट्रेडर्स, बावणे गल्ली, गर्ल्स हायस्कूलसमोर, इचलकरंजी. मो. ९२२५२५९९६६.

**ऑफिस कामासाठी** लेडीज पाहिजे. संगणक ज्ञान आवश्यक. स्थानिकांना प्राधान्य. संपर्क- ७२४९७६०४१३, संभाजी चौक, इचलकरंजी.

**होगाडे मोटर ट्रेनिंग** स्कूलमध्ये ड्रायव्हर पाहिजे. स्थानिकांना प्राधान्य. संपर्क- संभाजी चौक, इचलकरंजी. मो. ९८९०८३४६२७.

**रेडिमेड कापड दुकानात** कामगार पाहिजेत. संपर्क- बुबना गारमेंट, इचलकरंजी. मो. ९४२२५११२८१.

**कामगार पाहिजेत-** बेडशिट पडदे व कारपेट दुकानासाठी कामगार पाहिजेत. संपर्क- ओम इंटरप्राईज, कल्पना टॉकीजसमोर, इचलकरंजी. मो. ९३७३७८५९५५.

**बिअरबारसाठी** वेटर व हेल्पर पाहिजे. संपर्क- ७५८८६२०५०५, ९८५०५९६९६५, इचलकरंजी.

**इचलकरंजी नामांकीत** पॅथॉलॉजी लॅबसाठी लॅब टेक्निशियन हवे आहेत. अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल. संपर्क- ९१९९१९९१८७.

**घरातूनच आरोग्यदूत** म्हणून काम करून दररोज ५००/- रुपये कमवा. आरोग्य क्षेत्रात आवड असणाऱ्यांसाठी सुवर्णसंधी. संपर्क- ९११२४१३६७३.

**कॉम्प्युटर सेल्स** अॅण्ड सर्व्हिस ऑफिसमध्ये मुली पाहिजेत. सेल्स २ पोस्ट अकौंटंट मार्केटींग १ पोस्ट. संपर्क- प्रमोद इन्फोटेक- ९७६७४९६९२२.

**एअरजेट कारखान्यासाठी** हुशार व अनुभवी दिवाणजी पाहिजे. संपर्क- ९४०५५८३९४५.

**एअरजेट युनिटमध्ये** बिम प्लॅनिंग, डिस्पॅच, बिल्डींग व पार्टी हिशोबसाठी दिवाणजी पाहिजे. कॉम्प्युटर आवश्यक. संपर्क- ९४२२०४६९२४.

**पाहिजेत-**१)सुपरवायझर सिव्हील डिप्लोमा/ डिग्री,२) कन्स्ट्रक्शन मटेरिअरचे मार्केटींग कामासाठी फ्रेश/ अनुभवी. मो. नं. ८३९०७१२५७९.

**फोर्च्युन मॉलमध्ये** अर्जंट पाहिजे आहे. हाऊस किपिंगसाठी लेडीज व मुले, फॉर्च्युन सिनेप्लेक्समध्ये १२ वी पास, कॅफे असोसिएशनसाठी मुले हवी आहेत. व अनुभवी ड्रायव्हर हवा आहे. संपर्क-८४८३८८७४२९.

**अर्जंट पाहिजे-** चांदणी चौक, विकली मार्केटजवळ, फॉर्च्युन स्कायसिटी येथे हाऊस किपिंगसाठी लेडीज हवी आहे. आकर्षक पगार. संपर्क- ८४८३८८७४२९.

**पिझ्झा आऊटलेट किचनमध्ये** कामासाठी शेफ, हेल्पर पाहिजे व मार्केटींगसाठी मुलगी पाहिजे. अनुभवींना प्राधान्य. मो.७२७६११७३९०, ८४२१४०८१९७.

**टु व्हिलर** शोरूमकरीता लेडीज क्लार्क पाहिजे. अर्जासह भेटा- ओम मोटर्स, शाहु पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**इलेक्ट्रॉनिक शारूममध्ये** बॅक ऑफिससाठी कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजेत. एक्सलशीट येणे आवश्यक. ९२२६८८१४७०.

**हुपरी येथे** एका नामांकीत कंपनीमध्ये सिक्युरिटीसाठी महिला पाहिजेत. कामाची वेळ- ९.३० ते ७.३०, पगार १० हजार पासून पुढे. संपर्क- ८३९०८००८०१.

**इचलकरंजीमधील** लॉजमध्ये साफसफाई व रूम सर्व्हिस करणेसाठी सुशिक्षित कामगार पाहिजेत. संपर्क- ८६६८२१९७६३, ९८६०५७०४०४

**पाहिजेत-** सीएनसी/व्हीएनसी ऑपरेटर-४, सुपरवायझर- १, जवाहरनगर, इचलकरंजी. मो. ९४२३२८४८५३.

**सिक्युरिटी गार्डस् पाहिजे-** ठिकाण आवाडे पार्क- तारदाळ येथे ड्युटी ८ तास, पगार १५०००/- २६ दिवस, पीएफ+ ईएसआयसी+ बोनस, नॅशनल हॉलीडष सुट्टी, वय २५ ते ४०. शिक्षण १२ वीच्या पुढे संपर्क-८६६९९५९९६४.

**कामगार भरती** वेल्डर-२, हेल्पर - ४, संपर्क- हॉलमार्क हॉस्पिटल फर्निचर शहापूर रोड, सावली सोसायटीजवळ, इचलकरंजी. मो. ९९२२१४२०४०, ९४२३२७५२३२.

**ऑफिस बॉय व** इंडस्ट्रीयल ऑईल मार्केटींगसाठी जेंटस् पाहिजेत. पत्ता- न्यु इंडिया प्रोसेसजवळ, जुने एस.टी. स्टॅण्डजवळ, इचलकरंजी. मो. ९३७२१४३३१३.

Wanted- Dispadch Incherge one post and casting inspector one post in foundry fally knowledge essential. Contact- 9922810349.

**हेवी लायसन्स** आसणारा ६ चाकी, लाईनसाठी ड्रायव्हर पाहिजे. संपर्क- ८९८०९५०४५९, ९३७०९९२५३७.

**हेल्पर पाहिजेत**-पाहिजेत संभाजी चौक, राहुल मशिन संपर्क- ८८५२९९०२३७.

**कामगार पाहिजे-** ज्वेलर्स दुकानात कामाला मुलगा पाहिजे. संपर्क- ७४९९१६८९६०.

**सीएनसी, व्हीएमसी,** एचएमसी अनुभवी व फ्रेश ऑपरेटर पाहिजेत. योग्य पगार दिला जाईल. स्वस्तिक ग्रुप, पार्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, यड्राव. संपर्क- ८६६८६१०८६०.

**इस्त्री दुकानात** कामगार पाहिजे. आवाडेनगर, आकर्षक पगार. संपर्क-८६०५५६२६०६.

**अर्जंट सिक्युरिटी भरती** इचलकरंजी, यड्राव, तारदाळ, हातकणंगले, कुंभोज, नांदणी, आकर्षक पगार. संपर्क- ७०२०१९७९८०, ८२०८५१९९८८.

**इचलकरंजी एसटी** स्टँडमध्ये टू व्हिलर पार्किंग कामासाठी कामगार डे/नाईटसाठी पाहिजे. संपर्क- ८२३७७४४४४४

**गोडावून** कामासाठी ४ हेल्पर पाहिजे. कामाची वेळ सकाळी ९ ते ७ सायंकाळी पगार १४००० महिना रविवार सुट्टी, पत्ता - डेक्कन चौक, संपर्क - किशोर ८६०००३४४९६.

**लेडीज कॉम्प्युटर** ऑपरेटर पाहिजे. जीमेल लिहिता वाचता येणे आवश्यक. संपर्क - ९६३१३१६०३०.

**हॉटेलमध्ये** कामासाठी २ वेटर आणि २ साऊथ इंडियन कुक पाहिजेत. संपर्क - ८८८८०८९१२९, ९५११७७३३८९.

**Required** : Accounts Assistant - Female, Edu. B.Com/M.Com. Exp : 1 to 2 years Location Parvati Industrial Estate, Yadrav. Must have knowledge of Tally Prime, hrm772001@gmail.com, Mob. 7720018406.

**सिक्युरिटी** गार्डस् पाहिजे. तारदाळ, आवाडे पार्कमध्ये ड्युटी १२ तास पगार - १३५००/- पीएफ ईएसआयसी राहण्याची सोय. संपर्क - ८६६९९५९९६४.

**पाहिजेत** - महिला ऑफीस असिस्टंट पाहिजे. शिक्षण १० वी, १२ वी (संगमनगर, कोडींग्रे, तारदाळ, यड्राव उमेदवारास प्राधान्य. संपर्क - ७७२००१८४०६.

**Required** : Following professional marketing manager 01 BE/MBA 2 years experience in marketing, Sales executive 02, for Solar wiring work 04, Welder 02 (ITI), Plumber 03, Helper 03, Ichalkanji, Sangali, Kolhapur, Pune, Contact No. 8208318851, 9579919293.

**पाहिजे.** ऑफिस कामासाठी व ऑर्डर बुकिंगसाठी अनुभवी सेल्समन पाहिजेत. (जेंटस) संपर्क-सुशिल व्हेंचर लि. डॉ. आंबेडकर पुतळ्याजवळ, इचलकरंजी. ९३५६७८५५०७

**लेथ मशिनवर** रिपेअरी कामाकरिता टर्नर व वेल्डर पाहिजे. आकर्षक पगार. संपर्क-९२०९०६०१४३, ९९२२४९९५१४

**इचलकरंजी येथील** बार व रेस्टॉरंट मध्ये बारमन/ मॅनेजर व वेटर, हेल्पर पाहिजे. किचनमध्ये वस्ताद पाहिजे. संपर्क-९४२३८५९३१२

**मॉन्जिनिज केक दुकानात** कामासाठी कॉम्प्युटर नॉलेज असलेली मुलगी पाहिजे. फोन- ८६२४९२६२१०, (दु. १२ ते २ पर्यंतच फोन करणे)

**त्वरीत सिक्युरिटी** गार्ड पाहिजेत. इचलकरंजीत बंगल्यासाठी व शहापूर, तारदाळ, जयसिंगपूरसाठी पीएफ+इएसआयसी सुविधा. ८००७०६९१८०, ८०५५६१३०४०

**पाहिजेत.** डी.टी.पी. ऑपरेटर. कोरल ड्रॉ, फोटोशॉप चे ज्ञान असलेले गरजू मुलगा/मुलगी पाहिजे तसेच ऑफिस कामासाठी ऑफिसबॉय मुलगा पाहिजे. पत्ता- अथर्व डिजीटल, साखरपे हॉस्पिटलजवळ, टायटन शोरूममागे, इचलकरंजी. मो. ७०३८३७५५५५

**होलसेल कॉस्मेटिक दुकानात** १० वी/१२ वी झालेली मुले पाहिजेत. हिरा इन्टरप्राईजेस, गांधी कॅम्प, गंथडे खानावळशेजारी, इचलकरंजी.

**चायना रिपेअर मास्टर पाहिजे.** सिमको ऑटो मास्टर पाहिजे. सिमको ऑटो कामगार पाहिजे. संपर्क-९३२२९८६१५३

**अकौंटींग-** टॅली प्राईम मध्ये अनुभव असणारी विवाहीत लेडीज स्टाफ पाहिजे. अनुभव किमान-३ वर्षे. संपर्क-९८३४५७०१२७

**हुपरी येथे ५ स्टार** एमआयडीसी मध्ये हॉटेलसाठी शाकाहारी कुक- १, किचन असिस्टंट-१, तंदूरसाठी-१, वेटर-४ त्वरीत भरणे आहेत. ९१७५२१०९९९

**फॅब्रिकेशन कामासाठी** अनुभवी वेल्डर, हेल्पर, ग्रँडर मारणारा शिकाऊ कामगार पाहिजे. आकर्षक पगार, विठ्ठलनगर. ९६०४२७३००७

**अकाऊंटींगसाठी** महिला कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजेत. संपर्क-प्रभाकर इंडस्ट्रिज, भोने माळ, इचलकरंजी. ९३२५८२२२८८

**फार्मासिस्ट नेमणे-** डॉ. फलटणे क्लिनिक-सोहम मेडिकल, आवाडे टॉकीजमागे, इचलकरंजी. ९८५०८८०७४०

**५ वर्षे अनुभवी** सिनियर अकौटंट पाहिजे. मुठाणे एजन्सी, हिरो शोरूमजवळ, इचलकरंजी. संपर्क- ८६९८८६९६९६

**CNC/VMC** वर अनुभवी/शिकाऊ ऑपरेटर, प्रोग्रॅमर मशिनिस्ट पाहिजे. एस.पी.एस. इंजिनिअर्स, डी मार्टजवळ, इचल. ९८९०१५०४९५, ९९२३४५०३९२

**कापड दुकानात** कामासाठी अनुभवी व हुशार लेडीज कामगार पाहिजे. पगार+कमिशन. संपर्क- ९७६७३७४५१६

**नामवंत अकॅडमी**/स्कूलसाठी शिक्षक-४, शिक्षण-डी.एड./बी.एड. टेलिकॉलर-३, कौन्सिलर-८. कामाची वेळ- स. ९ ते २ व दुपारी ४ ते ९. संपर्क-९९२२३१४३०९

**मोबाईल दुकानात** कामासाठी मुलगा/मुलगी पाहिजे. संपर्क- ९१३०१५५१५५

**अॅमेझॉन कंपनीचे पार्सल** डिलीव्हरी करण्यासाठी त्वरीत मुले पाहिजेत. (ड्रायव्हिंग लायसन आवश्यक) संपर्क-९०९६१०४४४२

**जॉकी एक्सक्लूझिव्ह** इचलकरंजी, आकर्षक पगारासह खालील पदांची भरती करत आहे. पुरूष सेल्सपर्सन, महिला सेल्सपर्सन अनुभवी/ विनाअनुभवी. अमृत प्लाझा, जयहिंद मंडळ मैदानसमोर, इचलकरंजी. संपर्क-९५०३५२१००४

**डॉमीनोज पिझ्झा-** कामगार पाहिजे. डिलेव्हरी बॉय, आकर्षक पगार, पार्टटाईम, फूलटाईम. संपर्क- ९५२९२१५७४०, ७८४१०५४१०८

**इंग्रजी माध्यम शाळेकरीता** कॉम्प्युटर विषयासाठी शिक्षिका पाहिजे. आकर्षक पगार, अधिक माहितीकरीता. संपर्क- ९५११८७६५८३

**डोळ्यांच्या दवाखान्यामध्ये** ऑप्टोमेट्रिक्स पाहिजे. संपर्क- ९८२२००९१४८, इचलकरंजी.

**भाकरी व चपाती** करणेसाठी अनुभवी लेडीज पाहिजेत. हॉटेल बसवेश्वर शाहू कॉर्नर, इचलकरंजी. संपर्क-९८८१४७५०१८

**टेलिकॉलिंगसाठी** मुली हव्या आहेत. वय-१८ ते ४० वर्षे. शिक्षण-१२ वी पुढे. श्री महालक्ष्मी वधुवर- ८८३०२४०४२६

**इंदिरा रेफ्रिजरेटर** आणि ए.सी. शॉपमध्ये १० वी, १२ वी पास/ नापास शिकावू, कष्टाळू व हुशार कामगार भरती चालू आहे. भविष्यात भागीदारींची संधी. संपर्क- ९९२२२०८८५९-अनिरूध्द माळी.

**पाहिजे.** १० वी, १२ वी पास, नापास मुले गोडावून आणि डिलेव्हरीसाठी श्री सिध्दीविनायक सेल्स, महेश क्लबसमोर. संपर्क- ९८२२४४६२३५, वेळ-सकाळी १० ते ४

**नामांकित कंपनीमध्ये** इंजिनिअर CNC/VMC ऑपरेटर-२, हेल्पर-२ पाहिजेत. पत्ता-एएससी कॉलेजजवळ. संपर्क- ९६०४८२४२०४, ९८८१६३७४८१

**पाहिजेत.** ITI व D.M.E. Design Drawing कामासाठी त्वरीत पाहिजेत. भेटा. परफेक्ट स्टिल्स, कोरोची. ८७९३५४४४९७, ९३२६१०७६४४

**Required** - 1 to 2 year experienced civil site fngineer (D.C.E.) Contact- 9823096720

**शि. पेंटर/गवंडी**/कामगार- बांधकाम साईटवरील वरकामासाठी गरजू शि. पेंटर/गवंडी/कामगार पाहिजे. सं. ८१८००४६०६० मेसेज करावा.

**साईट सुपरवायझर पाहिजे.** आमचे कन्स्ट्रक्शन फर्ममध्ये सिव्हील डिग्री, डिप्लोमा किंवा इतर अनुभवी सुपरवायझर पाहिजे. स्वत:ची टू व्हिलर असावी. सिव्हील अॅटो कॅड ज्ञान आवश्यक आहे. संपर्क- सिंबा कन्स्ट्रक्शन-९७६३८५०९६५, ८८८८७०७७५३

**सुतार काम करण्यासाठी** सुतार पाहिजेत. फॅब्रिकेशन कामासाठी कामगार पाहिजेत. पत्ता-लक्ष्मीदत्त मंडप इंडस्ट्रिज, प्रा. लि. आंबेडकर पुतळ्याजवळ, इंडस्ट्रियल इस्टेट. संपर्क-७३०११३६४६४

**रिसेप्सनिस्ट पाहिजे.** पात्रता- एमएससीआयटी पास. सुख:कर्ता हॉलिडेज. ८२०८२९५२०२

**१८ ते २५ वयोगटातील** युवकांना प्रतिदिन पाचशे रूपये पगारावर शिकावू म्हणून प्रशिक्षण दिले जाईल. आयटीआय प्रशिक्षण घेतलेला जर उमेदवार असेल तर त्याला विशेष प्राधान्याने काम दिले जाईल. व्हॉटस् अॅप क्रमांकावर त्वरीत संपर्क साधा. ९३२२९८६१५३

**दवाखान्यातील कंपौंडर** कामासाठी मुले/मुली पाहिजेत. डॉ. परदेशी दवाखाना, जिव्हाजी मंदिराजवळ, कोल्हापूर रोड, इचलकरंजी.

**पाहिजेत.** हातकणंगले लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट येथील टेक्स्टाईल कंपनीमध्ये अकौंट असिस्टंट पाहिजे. बी.कॉम, टॅली प्राईम, वर्ल्ड एक्सेल इत्यादी कॉम्प्युटरची माहिती आवश्यक, टेक्स्टाईलमधील १ ते २ वर्षांचा अनुभव असावा. वेळ-९ ते ६, पगार १४ ते १५ हजारपर्यंत. बॉयलर अटेंडन्ट-फर्स्ट क्लास, ऑफिसबॉय-१० वी, १२ वी. वाहन चालविणे आवश्यक. संपर्क- ९७६७७४७६५६

**पाहिजेत.** १) बेकरी मशिन मेंटनन्स-४-आयटीआय फिटर, इलेक्ट्रीशियन, अनुभवी. २) डिस्पॅच सुपरवायझर-४-पदवीधर, डिस्पॅच कामाचा अनुभवी. ३) लोडींग कामासाठी मुले-४. ४) बेकरी प्रोडक्शन कामासाठी महिला/मुले- ४. फोन-९७६६२५६६५५

**मोबाईल शॉपीमध्ये** अकौंटींगसाठी अकौटंट पाहिजे. टॅली व जीएसटी ज्ञान आवश्यक. शॉप वेळ- सकाळी १० ते रात्री ९.३० पर्यंत. पत्ता- अक्षदा कम्युनिकेशन, पंचवटी टॉकीजशेजारी, नगरपालिका कॉम्प्लेक्स. संपर्क-८७९६४७११११

**पाहिजेत.** $CO_2$ वेल्डींग मशिनवर हुशार व अनुभवी वेल्डर पाहिजे. वरद इंडस्ट्रिज, इचलकरंजी. मो. ९८८१६६६६७७

**पार्वती इस्टेट जवळील** टेक्स्टाईल मिलमध्ये बॅक सायझर-५, हेल्पर- ६, कापड मेंडिंग व चेकिंग करणेसाठी महिला व पुरूष-४. इएसआयसी सुविधा उपलब्ध. संपर्क-७७२००१३००१

**शेती काम व बागकामासाठी** अनुभवी व्यक्ती पाहिजे. कामाचे ठिकाण-अल्फान्सो शाळेच्या पाठीमागे तसेच मशिन शॉपमध्ये हेल्पर कामासाठी मुलगा पाहिजे. संपर्क-७७४४०४३२०७

**ऑफिसबॉय पाहिजेत.** ऑफिस कामाकरिता शिकाऊ/अनुभवी ऑफिसबॉय पाहिजे. संपर्क-क्रोपेडा इंडिया प्रा. लि. इचलकरंजी. ९२२५६८६८६८

**लेडीज इंग्लिश टायपिस्ट** पाहिजे. देशमुख डायग्रोस्टिक सेंटर केडीसीसी बँकेजवळ, इंडस्ट्रियल इस्टेट, इचलकरंजी. फोन- ९११९५०८५९०, ८८८८३५११५०

**पाहिजे.** CNC/VMC ऑपरेटर व सुपरवायझर पाहिजेत. शिकाऊ/ अनुभवी, आकर्षक पगार. संपर्क- ९४२३६२७०४५, ९८६०४४०५४८, इचलकरंजी.

**कामगार पाहिजे.** बझारसाठी फ्रेशर/अनुभवी मुले/मुली पाहिजेत.संपर्क- राजेश्वर सुपरबझार, डेक्कन चौक, इचलकरंजी. ९०११५४९८०८

**पार्ट टाईम/फूल टाईम** अकौटींग कामासाठी जेंटस पाहिजे. कॉम्प्युटर ज्ञान व टॅली येणे आवश्यक. संपर्क- वेलटेक इंजिनिअर्स. ७७४३९३२३४५

**A Fast Growing** - Laboratory Equipment Distributor Require, Female Office Co-Ordinator-1 (Fluent Communication & MS Excel is Must) A Married Lady from Khotwadi & Vicinity will be Prefered. Contact- 9850333396, tdjadhav1984@gmail.com

**वधूवर सुचक ऑफिसमध्ये** ग्रॅज्युएट लेडीज पाहिजेत. संपर्क- ९८२३४२५४०४, शहापूर.

**लहान मुला-मुलींच्या** रेडिमेड कापड दुकानासाठी अनुभवी कामगार पाहिजे. संपर्क- ९३२६०२३६५४, ७६२०१९३७४२

**गारमेंटमध्ये** शिकावू व अनुभवी महिला/पुरूष पाहिजेत. पत्ता-गुरू टॉकीजसमोर, इचलकरंजी. अक्षर सर-८००७०२८१५०, नयन सर- ९०२९९४८६४१

**कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे.** एमएस-ऑफिस येणे आवश्यक. संगणकावर कामाचा अनुभव असावा. किमान-१२ वी पास आवश्यक. संपर्क-प्रतिक सर- ७०२०५६८४८५

**टेक्स्टाईल फर्ममध्ये** पॅकिंग कामासाठी गरजू लेडीज किंवा जेंटस पाहिजे. संपर्क-७९७२६७२१७०

**नोकरीची संधी-** पद: ग्राहक संबंध व्यवस्थापक आणि विक्री. व्यक्ती पात्रता-१) पदवीधर. २) हिंदी, इंग्रजी आणि मराठी भाषेचे चांगले ज्ञान. ३) विक्री क्षेत्रात किमान २ वर्षांचा कामाचा अनुभव. स्थान पार्वती औद्योगिक वसाहत, यड्राव. संपर्क-९४२०४९३९०१

**उर्वरित छो.जा. पान ७ वर**

* पान ६ वरून *

## नोकरी विषयक

**चायनिज गाड्यावर** कुक पाहिजे. फॅमिलीसह राहण्याची सोय. संपर्क–९५२७८३२६३८, इचलकरंजी.

**टेक्स्टाईल कंपनीमध्ये** दिवाणजी आणि कार ड्रायव्हिंग करीता १ जेंटस, ग्रे कापड करीता अनुभवी जेंटस लागणार. पत्ता–हिरकणी हॉटेलजवळ, सर्वोदय नगर. संपर्क–९४२१६१४३९१

**इचलकरंजी येथे** बिअरबारमध्ये कामासाठी वेटर पाहिजे. संपर्क–८८३०९८३४०१

**Electronics Industry-** करीता B.E./B. Tech/Diploma पाहिजेत. Assembly/Software मधील अनुभव आवश्यक. संपर्क–९३२५२५७३२५

**कॉम्प्युटर ऑपरेटिंगसाठी** लेडीज पाहिजे. संपर्क–९९२२५९९५९९

**सेल्समन पाहिजे.** इलेक्ट्रीक दुकानात कौंटरवर शिकाऊ किंवा अनुभवी सेल्समन कामगार पाहिजे. समक्ष भेटा. वरचे दुकान, राणी बागेजवळ. ९०११९४२१६९.

**कामगार पाहिजे.** अकौटींगसाठी लेडीज पाहिजे व डिलेव्हरीसाठी जेंटस पाहिजे. संपर्क–सपना एंटरप्राईजेस, पंचगंगा फॅक्टरी, शहापूर रोड. मो. ८९९९२९६७७८

**मंगल कार्यालयाच्या** साफ सफाईसाठी जोडपे पाहिजे. रहाणेची व्यवस्था. संपर्क–९०२१६१४३४३, इचलकरंजी.

**स्पंदन मेडिकलमध्ये** कामासाठी गरजू मुले पाहिजेत आणि स्पंदन हॉस्पिटलमध्ये डॉक्टर B.H.M.S. B.A.M.S. पाहिजेत. संपर्क–८४२१४२६६८५

**कामगार पाहिजे.** लकी पेंटस दुकानात कामासाठी मुले पाहिजेत. स्टेशन रोड, केटकाळे कॉम्प्लेक्स, इचलकरंजी. ९८६०५१७६१२

**मेडिकलमध्ये** फार्मासिस्ट पाहिजेत. संपर्क–९१४५०२८०९८, इचलकरंजी.

**टेक्स्टाईल मशिनरीसाठी** शिकाऊ किंवा अनुभवी कामगार पाहिजे. पत्ता– षटकोन चौक, मेटे बिल्डींग, आर.जे. प्रोफेशनलशेजारी, इचलकरंजी. फोन–९८२२३४५३१२

**फूलटाईम अनुभवी वेटर** पाहिजे. हॉटेल प्रतिनिधी, दत्तनगर, इचलकरंजी. फोन–९४०३४८००००

**गारमेंट कामाकरिता** लेडीज ऑपरेटर पाहिजे. ऑफिस कामासाठी ज्यु. अकौटंट पाहिजे. २ वर्षाचा टॅलीचा अनुभवी लेडीज. संपर्क–दत्तनगर, भाटले मळा, इचलकरंजी. फोन–९५७९९९९७३९

**हेल्पर पाहिजेत.** हेल्पर कामासाठी पुरूष कामगार पाहिजेत. वय–१८ ते ५०, शिक्षण–१० वी, १२ वी झालेले, लिहायला–वाचायला येणे आवश्यक. पत्ता–विन्सर वर्क वेअर, नाईट कॉलेजजवळ, इचलकरंजी. संपर्क–९४०४७००५२१

**नामवंत गारमेंटमध्ये** बॅग शिवणेसाठी लेडीज पाहिजेत. तसेच बॅग प्रिटींगसाठी लेडीज/जेंटस पाहिजेत. आकर्षक पगार+पीएफ+ईएसआयसी सुविधा. पत्ता– शहापूर, तारदाळ नाका, श्रीरामनगर, गल्ली नं.१. संपर्क–९३०७३९४७९३, ९०२८७९९१५३

## यात्रासहल

**अष्टविनायक** १४ डिसेंबर, १९ जानेवारी गिरनार सोरटी सोमनाथ द्वारका, सरदार सरोवर–१० दिवस. काशी, आयोध्या, प्रयागराज–१० फेब्रुवारी. संपर्क–कोजागिरी–९४२०५९२५२४, ९४०३९५३४१२

**छोटी जाहीरात मोठा प्रतिसाद**

## बोअरवेल विषयक

**श्री साई बोअरवेल–**आमचेकडे ४.५० व ६.५० इंची बोअर कमीत कमी रेटमध्ये मारून मिळेल. ९८८१३५५८१३, ९९२२७७२०३६

**गंगा आली रे अंगणी–**श्री गणेश बोअरवेल ६.५ इंची बोअरवेल खुदाई करून मिळेल. संपर्क–९८२२७७७२२६, ९४२२७५२४५६

**चौगुले बोअरवेल–**४३ वर्षांची परंपरा आमचेकडे एक दिवसात ४॥। व ६॥ इंची बोअरवेल मारून सबमर्सिबल पंप बसवून मिळेल. संपर्क–डॉ. संजय चौगुले, जुन्या स्टॅण्डसमोर, स्टेशन रोड, इचलकरंजी. मो. ९३२५१४६८८४

**चौगुले बोअरवेल जयसिंगपूर–** घरासाठी ४॥। इंची व शेतीसाठी ६॥ इंची बोअर मारून मिळेल. संपर्क–९९६०१०५४२१

## कर्जविषयक

**घरकर्ज, पत्रा,** लोडबेरिंग, तारणकर्ज, सिबील खराब असेल तरी कर्ज मिळेल. मो. ९५११९२६०९०

**जागा घेऊन घर** बांधणेसाठी कर्ज तसेच तारणकर्ज मिळेल. कमी कागद पत्रामध्ये, कमी व्याजदरात. संपर्क–निता माने, ८४११०३८४१४. (आवास योजना लागू)

**सर्व प्रकारची कर्ज** प्रकरणे खात्रीशीर करून देऊ. संपर्क–दिशा फायनान्स, इचलकरंजी. फोन–९०२२५४२०६९, ९८५०९४९४९९

## वधुवर

**सर्व धर्मीय, प्रथम,** विधवा, विधूर, घटस्फोटीत, आंतरजातीय, असंख्य वधु–वर स्थळे उपलब्ध. अधिक माहितीसाठी इचलकरंजी. मो. ८९७२९२००१७.

## हरवले - सापडले

**पाकीट हरवले आहे** रंगाटे अॅल्युमिनियम ते वर्धमान चौक ते महाडिक दवाखाना रोडवर दि. २६/११/२०२५ रोजी सकाळी ७ ते ८ दरम्यान हरवले आहे. आणून देणाऱ्यास योग्य बक्षिस देऊ. संपर्क–९८८१६६९५८५.

## कुरणीत दीड एकरातील ऊस जळाला

**मुरगूड, ता.२९(प्रतिनिधी)–**

**कुरणी (ता.कागल) येथील शेतकरी सुखदेव खराडे यांच्या सुमारे दीड एकरातील ऊस आगीत जळून खाक झाला. त्यामुळे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.**

उसाला आग लागल्याचे कळताच बिद्रीच्या अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले.त्यांनी आग आटोक्यात आणली. त्यामुळे पुढील अनर्थ टळला. यावेळी संभाजी ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष सचिन हंचनाळे यांनी आग विझवण्यासाठी सहकार्य केले.

# शासकीय कामात अडथळा; १५ जणांची निर्दोष मुक्तता

**इचलकरंजी,ता.२९ –**

**मुख्याधिकारी यांच्या दालनातील टेबलवर मृत डुक्कर ठेवून आंदोलन तसेच घोषणाबाजी करुन सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी कै.बंडोपंत मुसळे यांच्यासह १५ जणांची येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली.**

१७ सप्टेंबर २०१६ रोजी कै.बंडोपंत मुसळे यांच्यासह प्रमोद वेटाळे, श्रीकांत मुसळे, अर्जुन भाटले, रमेश वरुटे, ऋषिकेश मुसळे, सोमनाथ निढोधे, जितेंद्र भागवत, सिध्दराम तळे, रमजान मुल्ला, अमोल कडतारे, सचिन आयरेकर, अकबर मिरजे, सचिन बाऊसकर आदिनी आंदोलन करून सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसात गुन्हा नोंद होवून १५ जणांविरूध्द येथील न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाले होते.सदर खटल्याच्या सुनावणी वेळी सरकारी पंच, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, आंदोलनावेळी केलेले व्हिडीओ शुटींग, पंचनामा तसेच इतर महत्त्वाच्या साक्षीदारांचे जबाब न्यायालयासमक्ष नोंदवण्यात आले होते. सदर फिर्यादी व साक्षीदारांच्या तसेच पंच जबाबामधील असलेली विसंगती तसेच तपासातील त्रुटी संशयित आरोपींचे अॅड. सचिन माने यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणुन दिले. सदरचे साक्षी पुरावे, तपासातील त्रुटी , युक्तिवाद ग्राहय मानुन सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली.आरोपींतर्फे अॅड. सचिन माने व अॅड. मदन भोसले यांनी काम पाहिले.

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नंबर २९४ / ब पैकी समजुतीचा नकाशा प्रमाणे प्लाटॅ नं २४ चे क्षेत्र १८० चौ.मी यासी चतुः : सिमा– पुर्वेस – गट नंबर २९४ / ब ची मिळकत, पश्चिमेस – २० फुट रस्ता, दक्षिणेस – प्लॉट नंबर २३, उत्तरेस – प्लॉट नं २५ ची श्री. रमेश पाटील यांची मिळकत. सदरची मिळकत ही श्री. प्रकाश भिवा केंगार रा. इचलकरंजी यांच्या मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे तोंडीकरार आमचे अशिलांकडून संचकार रक्कम स्वीकारून करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता. २८/११/२०२५

**अॅड.आनंद प्रकाश पटवा**
रा.आसरा नगर, बसस्टॉप जवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

१) मिळकतीचे वर्णन :– जि. कोल्हापूर, ता. हातकणंगले पैकी क॥ इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील मिळकतीचा रि.स.नं.६३०/क/पैकी/प्लॉट नं./७९ यापैकी बिगरशेती प्लॉट नं. ७९ याचे इचलकरंजी महानगरपालिकेकडील उपविभागणी नकाशा प्रमाणे भुखंड नं.७९/१ क्षेत्र २०८.९४ चौ.मी. व भुखंड नं. ७९/२ क्षेत्र १६२.७६ चौ.मी. याचा सि.स.नं. १८०८१/अ याची मोजमापे पुर्व–पश्चिम ८० फुट, दक्षिण उत्तर ५० फुट असे ४००० चौ. फुट याचे ३७१.७ चौ.मी.ची खुली जागा यांसी यांसी चतु:सिमा पुर्वेस – ३० फुट रुंदीचा रस्ता, पश्चिमेस– ३० फुट रुंदीचा रस्ता, दक्षिणेस– ओपन स्पेस, उत्तरेस– सदर रि.स.नं. पैकी प्लॉट नं. ३६ ची कारंडे यांची मिळकत,

२) वर नमुद केलेली मिळकत ही श्री रफिक दस्तगीर सपसागर, रा. इचलकरंजी यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी सदरची मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांना देवून संचकार दाखल रक्कम स्विकारून मिळकत करारपत्राने विक्री करणेचा करार करुन दिलेले आहे. सबब, वर नमुद मिळकतीबाबत कोणाचाही हक्क,दावा,पोटगी अर्ज,आरक्षण,तारणगहाणदस्त अगर इतर कोणत्याही प्रकारची हरकत असलेस त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आंत खाली नमुद केले पत्यावर लेखी कळवावे. म्हणून दिली जाहीर नोटीस ता. २९/११/२०२५ इ.रोजीचे.

**अॅड. सुनिल सु. धुपदाळे**
रा.१७/२९४ पुजारी मळा राजमातानगर इचलकरंजी
मो.नं. ९३२६०२२३८५

## महावितरण — वीज बंद निवेदन

म.रा.वि.वितरण कंपनीच्या मंडल कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या ग्राहकांना सुचित करण्यात येते अतिशय तातडीच्या दुरुस्तीच्या व देखभालीच्या कामामुळे दिनांक **०१.१२.२०२५** रोजी खालील भागातील व आसपास परिसरातील वीज बंद राहणार आहे. तरी ग्राहकांनी सहकार्य करावे. वीज पुरवठा कामाच्या वेळेनुसार दिलेल्या वेळेपूर्वी किंवा नंतर पूर्ववत होऊ शकतो.

| | |
|---|---|
| १ | **३३ केव्ही नागरतास वाहिनी (कालावधी: स. ११.00 ते दु. १६.00) बाधीत क्षेत्र:** माद्याळ, मेढेवाडी, दरडेवाडी, गवसे, सुळेरान, धनगरमोळा, घाटकरवाडी, रेशीम केंद्र, किट्टवडे, लिंगवाडी, अंबाडे, आल्याचीवाडी, दाभीळ, शेळप, पारपोली, खेडगे, देवर्डे, हाळोली, मसौली, पारेवाडी. |
| २ | **३३ केव्ही गडहिंग्लज एमआयडीसी वाहिनी (कालावधी: स. १0.00 ते दु. १६.00) बाधीत क्षेत्र:** बड्याचीवाडी, औरनाळ, गडहिंग्लज एमआयडीसी, शेंद्री. |
| ३ | **३३ केव्ही गांधीनगर वाहिनी (कालावधी: स. 0९.00 ते सायं. १७.00) बाधीत क्षेत्र:** वळीवडे, चिंचवाड, गांधीनगर |
| ४ | **३३ केव्ही अब्दुल लाट वाहिनी (कालावधी: स. १0.00 ते दु. १२.00) बाधीत क्षेत्र:** अब्दुल लाट, लाटवाड, सत्यराज टेक्सटाईल पार्क, इचलकरंजी वाटर वर्क्स. |
| ५ | **३३ केव्ही रेमंड वाहिनी (कालावधी: स. ११.00 ते दु. १४.00) बाधीत क्षेत्र:** ३३ केव्ही रेमंड वाहिनीवरील सर्व ग्राहक. |
| ६ | **३३ केव्ही सोनगे वाहिनी (कालावधी: स. १0.00 ते दु. १५.00) बाधीत क्षेत्र:** चिमगाव, अवचीतवाडी, शिंदेवाडी, दौलवाडी, यमगे, हळदी, हळदवडे, करंजीवने. |
| ७ | **३३ केव्ही हिंद गिअरवाहिनी (कालावधी: स. १0.00 ते दु. १५.00) बाधीत क्षेत्र:** ३३ केव्ही हिंद गिअर वाहिनी सर्व ग्राहक. |

कोप/पीआरओ नं. २०९/२०२५–२६ — **अधीक्षक अभियंता (कोमं), कोल्हापूर**

## ग्रामपंचायत मौ. चिखली ता. कागल, जि. कोल्हापूर
## जाहीर ई–निविदा सु.क्र. ०१ सन २०२५–२६

**ग्रामपंचायत मौ. चिखली, ता. कागल, जि. कोल्हापूरकडील वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजना सन २०२५–२६** योजने अंतर्गत खालील एका कामाची ई–निविदा ऑनलाईन या http://mahatenders.gov.in वेबसाईटवर दि. २९/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजलेपासून प्रसिध्द करणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव व योजना | निविदा रक्कम | निविदा संच फी | १.०० टक्के इसारा रक्कम | काम पूर्ण करावयाची मुदत | आवश्यक मक्तेदारांची नोंदणी वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौ. चिखली, ता. कागल येथील डवरी वसाहत पांडुरंग डवरी ते शिवाजी कोकणे घरापर्यंत रस्ता करणे. | १५०००००.०० | १०००.०० | १५०००.०० | सहा महिने | जिल्हा परिषदकडील वर्ग–५–अ व त्यावरील नोदणीकृत मक्तेदार |

सदरची कामाची विस्तृत जाहीर निविदा सूचना अटी/शर्तीसह http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**वरील निविदेच्या महत्त्वाच्या तारखा**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | निविदा प्रसिध्द व डाऊनलोड कालावधी | दि. २९/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० पासून | दि. ०६/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० पर्यंत. |
| २ | ऑनलाईन निविदा व निविदा फॉर्म फी/ इसारा रक्कम सबमिशन कालावधी | दि. २९/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० पासून | दि. ०६/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० पर्यंत. |
| ३ | निविदा उघडणेचा कालावधी | दि. ०८/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० पासून | |

**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत चिखली, ता. कागल**

**सरपंच**
**ग्रामपंचायत चिखली, ता. कागल**

## जाहीर नोटीस

मौजे चंदुर येथील गट नंबर ५७३ पैकी क्षेत्र हे. ०.४६ आर ची शेत मिळकत यासि चतुः : सिमा–पुर्वेस – गट नंबर ५७२ मधील रस्ता, पश्चिमेस – श्री. उमेश आण्णासो वाघमोडे यांची मिळकत. दक्षिणेस– जयश्री अमोल पाटील व निवेदिता शिवराज पाटील यांची मिळकत, उत्तरेस – श्री. शिवकुमार सुनिल पाटील श्री.संजयकुमार चितलांग्या व अर्चना पाटील यांची मिळकत. सदरची मिळकत रोहन प्रकाश बगली.रा.चंदुर यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र आमचे अशिल यांच्या कडुन संचकार रक्कम स्विकारुन करारपत्र करुन दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट, बोजा, इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागद पत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही

ता. २८/११/२०२५

**अॅड.आनंद प्रकाश पटवा**
रा.आसरा नगर,
बसस्टॉप जवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

मौजे चंदुर येथील गट नंबर ५७३ पैकी क्षेत्र हे. ०.४० आर ची शेत मिळकत यासि चतु:सिमा– पुर्वेस – गट नंबर ५७२ मधील रस्ता, पश्चिमेस – श्री. उमेश आण्णासो वाघमोडे यांची मिळकत. दक्षिणेस – श्री सातगोंडा पाटील यांची मिळकत, उत्तरेस – श्री. रोहन प्रकाश बगली यांची मिळकत. सदरची मिळकत जयश्री अमोल पाटील व निवेदिता शिवराज पाटील. रा. चंदुर यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र आमचे अशिल यांच्या कडुन संचकार रक्कम स्विकारुन करारपत्र करुन दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट, बोजा, इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागद पत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही

ता. २८/११/२०२५

**अॅड.आनंद प्रकाश पटवा**
रा.आसरा नगर,
बसस्टॉप जवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## चुक–दुरुस्ती जाहीर नोटीस

दि.२९/११/२०२५ इ.रोजी दै. महासत्ता या दैनिक वृत्तपत्रात अॅड. आर. आर. बाणदार, रा.इचलकरंजी यांचेमार्फत प्रसिध्द झालेल्या जाहीर नोटीसीतील मिळकतीचे वर्णनामध्ये पॅरा १ मध्ये प्लॉट नं.३५ ची मिळकत ही ''अफसाना अस्लम सनदी यांचे मालकीची व खुद्द कब्जेवहिवाटीची आहे'' असे नजरचुकीने तसेच टंकलेखनाच्या चुकीने चुकीचे नमूद झाले होते, तथापि सदर नोटीसीचे मिळकतीचे वर्णनामध्ये प्रत्यक्षात व वस्तुस्थितीप्रमाणे प्लॉट नं.३५ ची मिळकत ही '' अफसाना अस्लम सनदी यांचे मालकीची व खुद्द कब्जेवहिवाटीची आहे '' ऐवजी ''अस्लम दस्तगीर सनदी यांचे मालकीची व खुद्द कब्जेवहिवाटीची आहे '' असे वाचणेत व समजणेत यावे. म्हणून दिली चुक–दुरुस्ती नोटीस.दि.३०/११/२०२५.

**अॅड. रियाज रफीक बाणदार**
३/४५७, स्वामी समर्थ मंदिर समोर, महासत्ता चौक,
इचलकरंजी.
मो. ९८२३६३६३२२.

## जाहीर नोटीस

मौजे लक्ष्मीवाडी येथील गट नंबर १५१/२ पैकी क्षेत्र हे १.०४ आर ची शेत जमिन मिळकत यासि चतुः सिमा– पुर्वेस – श्री. विलास पाटील यांची मिळकत, पश्चिमेस – श्री. खोत यांची मिळकत. दक्षिणेस– २० फुट रस्ता, उत्तरेस – वन विभागाची मिळकत. सदरची मिळकत इंदुमती शामु कुरणे, कृष्णात शामु कुरणे, अर्जुन शामु कुरणे, रा. अतिग्रे यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे संचकारपत्र आमचे अशिल यांच्या कडुन संचकार रक्कम स्विकारुन करुन दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट, बोजा, इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागद पत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही

ता. २८/११/२०२५

**अॅड.आनंद प्रकाश पटवा**
रा.आसरा नगर,
बसस्टॉप जवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

शहर इचलकरंजी येथील रि.स.नं ९/२ पैकी प्लॉट नं १डी चे क्षेत्र १८५.९२ चौ.मी.ची खुली जागा मिळकत यासी चतु:सिमा– पुर्वेस– पाटील वसाहत, पश्चिमेस – ३० फुट रस्ता, दक्षिणेस – सुनिता दानोळे यांची मिळकत, उत्तरेस– संदीप कळेकर यांची मिळकत सदरची मिळकत ही सौ सारिका संपत चौगुले रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असून त्यांनी आमचे अशिलांना संचकार रक्कम स्विकारून त्यांना करारपत्र करून दिलेली आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही

ता. २८/११/२०२५

**अॅड.आनंद प्रकाश पटवा**
रा.आसरा नगर,
बसस्टॉप जवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविणेत येते की इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील रि.स.नंबर– ५११ हिस्सा क्र. २ क्षेत्र हे. १–३४ आर आकार रुपये २३–२८ पैसे, यापैकी क्षेत्र ०–१०–२५ आर पॉ. आकार रुपये १–७३ पैसे ची मिळकत यापैकी सामाईकातील अविभक्त निम्मे हिस्सेचे क्षेत्र हे. ०–५–१२ आर ची खुली जागा यासि चतु: सिमा– पुर्वेस – लाड यांची उर्वरीत मिळकत, पश्चिम– शिंदे यांची उर्वरीत निम्मी मिळकत, दक्षिण– शिंदे यांची मिळकत, उत्तर– ३० फुट समाईक रस्ता.

येणेप्रमाणे चतु: सिमेतील मिळकत ही श्री अविनाश पांडुरंग शिंदे रा. २० / ८४४, कोल्हापूर नाका, इचलकरंजी यांची मिळकत असून त्यांनी सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा देवून आमचे अशिलांशी भरीव संचकार रक्कम स्विकारून खरेदीपुर्व करारपत्र केलेले आहे. सबब, सदर मिळकती बाबत कोणाचाही कसलाही हक्क संबंध, करार, बोजा वगैरे असलेस तो त्यांनी आजपासून ०७ दिवसाचे आत आम्हास खालील पत्त्यावर कागदपत्रांसह लेखी पटवून द्यावा. म्हणुन दिली जाहीर नोटीस अशी दि. २८/११/२०२५

**अॅड. रोहित नागेश शेजाळे**
१२/६१९, विश्वकर्मा बिल्डींग
साखरपे हॉस्पिटलजवळ,
इचलकरंजी.
मो.९५११७७९९३३.

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

मिळकतीचे वर्णन:– मौजे कोरोची येथील गट नं ४५२ हिस्सा क्र.ब मधील बिगर शेती झालेला प्लॉट नंबर २६ चे क्षेत्र १११–५२ चौ. मी. खुली जागा यासी चतु:सिमा पूर्व– प्लॉट नं. २० ची मिळकत, पश्चिम– २० फुटाचा रस्ता, दक्षिण– प्लॉट नं. २५ ची मिळकत, उत्तर– प्लॉट नं. २७ ची मिळकत, सदरची मिळकत ही बाबुनी तुकाराम सावंत यांच्या मालकीची असून त्यांनी सदरची मिळकत ही आमच्या पार्टीस करारपत्राने लिहून दिलेली असून त्यापोटी संचकार ही स्विकारलेला आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा काहीही हक्क, हित संबंध, दावा तारण इत्यादी काही असलेस ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील पत्यावर लेखी तक्रारी नोंदवावी. म्हणून दिली नोटीस

दि. २९/११/२०२५

**श्री. विश्वनाथ कृष्णा घाटगे**
(स्टॅम्प रायटर)
१०/५६३, विक्रमनगर,
इचलकरंजी.
मो. ९८२३४५८५८५.

## जाहीर नोटीस

मौजे कबनूर येथील गट नंबर ७१४ पैकी प्लॉट नंबर ५ / २ व ५ / ३ चे एकत्रीत क्षेत्र ९८.१४ चौ. मिटर ची खुली जागा मिळकत यासि एकत्रीत चतुः सिमा पुर्वेस – प्लॉट नंबर ५/१, पश्चिमेस – प्लॉट नंबर ५/४, दक्षिणेस–श्री गणपती इंगवले यांची मिळकत, उत्तरेस – १५ फुट रस्ता. सदरची मिळकत सौ.स्वाती राजु शिंदे व सौ. प्रणिता बळीराम नरवाडे. रा. कबनूर यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र आमचे अशिल यांच्या कडुन संचकार रक्कम स्विकारुन करुन दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट, बोजा, इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागद पत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही

ता. २८/११/२०२५

**अॅड.आनंद प्रकाश पटवा**
रा.आसरा नगर, बसस्टॉप जवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांना कळणेकरिता,

ता. हातकणंगले पैकी मौजे आळते येथील शेतजमीन याचा क. गट नं. १०५८, यामधील क्षेत्र हे.०.४४.०७ आर, आकार रू.२.२८ पैसे यामधील क्षेत्र हे ०.२० आर, आकार रू.१.०३ पैसेची शेतजमीन, यासी चतु:सीमा –पूर्वेस –परवीन दिलावर शेख यांची जमीन, पश्चिमेस – सरकारी रस्ता, दक्षिणेस –याच गट नंबरपैकी श्री. अमृत शिवाजीराव जाधव यांची मिळकत व उत्तरेस – याच गट नंबरपैकी श्री. अशोक जयपाल हावळे यांची जमीन.

येणेप्रमाणे चतु:सीमेतील मिळकत ही श्री. अमृत शिवाजीराव जाधव, रा. कबनूर यांच्या मालकी वहिवाटीची आहे. सदर मिळकत आमच्या अशिलाना खरेदी देणेचे ठरवून संचकार रक्कम स्विकारली आहे. सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेची हमी वरील मिळकत मालकांनी आमचे अशिलांना दिली आहे. तथापि, सदर मिळकतीबाबत कोणाचाही खरेदी विक्री, करार, दावा, कब्जा, कूळ, तारणगहाण, बक्षीस, वाटणी, वारसा, वहिवाट, पोटगी, आरक्षण, संपादन, अन्य कोणाचा कर्ज, देणी अगर अन्य कोणत्याही स्वरूपाचे हक्कसंबंध असलेस सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आत हक्काच्या कागदपत्राच्या अस्सल प्रतिसह लेखी हरकत आमचे खालील पत्त्यावर द्यावी. मुदतीनंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस सही

तारीख २९/११/२०२५ इ. रोजी.

**अॅड. सुनिल जे. विभुते**
१३/११२७/२, महर्षि वाल्मिकी सोसायटी, इचलकरंजी.
मो. ९८८१७०३८३८.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते कि,

मिळकतीचे वर्णन :– जिल्हा व तुकडी कोल्हापूर पोटतुकडी व तहसील हातकणंगले व मा. दुय्यम निबंधकसो हातकणंगले यांचे अधिकार कक्षेतील हुपरी नगरपरिषद हद्दीतील मिळकत त्याचा भू. ग. नं. १७६५ त्याचे एकूण क्षेत्र ० हे. ५० आर, आकार ५ रुपये ५४ पैसेची सामाईक शेत मिळकत यापैकी क्षेत्र ० हे. २५ आर आकार २ रु ७७ पैसेची मिळकत, व भू. ग. नं. १७६६ त्याचे एकूण क्षेत्र ० हे. ४९ आर, आकार ४ रुपये ६६ पैसेची सामाईक शेत मिळकत यापैकी क्षेत्र ० हे. २४ आर आकार २ रु.३३ पैसेची मिळकत असे एकूण क्षेत्र ४९ आर ची मिळकत असून यासी चतु: सिमा :– पूर्वेस – श्री. बाळासो गाठ यांची मिळकत, पश्चिमेस – तळंदगे फाटा इंगळी रस्ता, दक्षिणेस –श्री. भरत मंडपे यांची मिळकत, उत्तरेस– सदर गट नंबर पैकी उर्वरित क्षेत्र, येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत,

येणेप्रमाणे मिळकत ही या जाहीर नोटीसीचा विषय असून यापुढे यास '' सदर मिळकत'' असे संबोधले आहे.

सदर मिळकत ही श्री. अक्षय महावीर कुसान, श्री. आदिनाथ बाळासो चिंचने, पृथ्वीराज भाऊसो चौगुले, शिवाजी भूपान चौगुले सर्व रा. हुपरी यांनी सामाईकत खरेदी केलेली मिळकत असून सदर मिळकत ही त्यांचे सामाईक मालकी वहिवाटीची आहेत. सदर मिळकत मालकांनी सदर मिळकत ही आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवून त्यांच्याकडून संचकारा दाखल रक्कम स्वीकारून तसा करारपत्र / संचकारपत्र लिहून दिलेले आहे. सदर मिळकत ही पूर्णतः निर्वेध, निष्कर्जी व बोजारहित असलेचा निर्वाळा सदर मिळकत मालकांनी आमचे अशिलांना दिला आहे. तरी देखील सदर– मिळकतीबाबत अन्य कोणाही त्रयस्थ इसम, बँका, वित्तीय संस्था, सावकारी इसम यांचा बोजा अगर कोणाचाही सदर मिळकतीमध्ये हक्क, दान, गहाण, लीज, भाडेपट्टा, पोटगीचा हक्क, व इतर तत्सम कोणताही हक्क असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसाचे आत खालील पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रानिशी प्रत्यक्ष भेटून खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही तक्रार न आलेस आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार आलेस ती आमचे अशिलांचे कायदेशीर हक्कावर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस आज मु. रेंदाळ सही ता. २९/११/२०२५

**अॅड. सद्दाम मनसूर नाईकवाडे**
पत्ता– ग्रामपंचायत मागे, विठ्ठल मंदिर जवळ, रेंदाळ.
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर पिन. ४१६२०३,
मो.नं. ८३०८५९१४६६

# तासगावात भाजपकडून मुख्यमंत्र्यांच्या आदेशाला केराची टोपली

## संदीप गिड्डे यांचा घणाघात : राष्ट्रवादीच्या उमेदवारीला मुख्यमंत्र्यांचा हिरवा कंदील

तासगाव,ता.२९(प्रतिनिधी)-

**तासगाव नगरपालिका निवडणुकीत अजित पवार यांच्या राष्ट्रवादीसोबत महायुती करावी,असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. मात्र त्यांचे निर्देश फाट्यावर मारुन भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी भाजपचे स्वतंत्र पॅनेल लावले. हे पॅनेल लावताना अनेक पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेतले नाही, असा घणाघाती आरोप भाजप किसान मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस संदीप गिड्डे यांनी पत्रकार परिषदेत केला.तर नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार म्हणून अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या ज्योती पाटील यांना मुख्यमंत्र्यांचा हिरवा कंदील आहे, असेही ते म्हणाले.**

पुढे बोलताना गिड्डे म्हणाले, नगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने माझ्या भूमिकेबाबत तर्क- वितर्क लढवले जात आहेत. मी नाराज असल्याच्या चर्चा आहेत. मात्र मी भाजपचा समर्पित कार्यकर्ता आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आदेश माझ्यासाठी अंतिम आहे.सुरुवातीच्या काळात तासगाव नगरपालिका निवडणुकीच्या प्रक्रियेत मी होतो. मात्र नंतरच्या काळात मला तासगावच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी विश्वासात घेतले नाही. पण, मी इथली सगळी परिस्थिती भाजपच्या शिर्ष नेतृत्वाकडे मांडली होती. त्यावेळी आपण तासगावात राष्ट्रवादीसोबत युती करावी.इथल्या राष्ट्रवादीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार ज्योती पाटील या बलवान आहेत,असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कळवले होते. त्यावेळी त्यांनी ज्योती पाटील यांच्या उमेदवारीला हिरवा कंदील दाखवला होता. शिवाय अजित पवारांच्या राष्ट्रवादीसोबत महायुती करावी, असेही निर्देश त्यांनी दिले होते. ही महायुती व्हावी, यासाठी मी प्रयत्न केले. मात्र इथल्या स्थानिक पदाधिकाऱ्यांना आपण फार मोठे झाल्यासारखे वाटत होते. त्यामुळे त्यांनी मुख्यमंत्र्यांचे निर्देश फाट्यावर मारले व जिल्ह्यातील भाजपच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना अंधारात ठेवून भाजपचे पॅनेल लावले.ते म्हणाले, भाजप हा सामुहिक निर्णय घेणारा पक्ष आहे. पण, तासगावात तसं होत नाही. इथले पदाधिकारी स्वतःचीच सर्कस उभी करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या डोक्यात कोणी काय भरवलं आहे, माहित नाही.



यावेळी भाजपचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तासगाव नगरपालिका निवडणुकीत माझी अवस्था कुरुक्षेत्रातील अर्जुनासारखी झाली आहे. मला विश्वासात घेतले जात नसल्याने मी माझ्या शिलेदारांना विविध पक्षातून उभे केले आहे. त्यांना निवडून आणण्यासाठी मी जीवाचे रान करणार आहे.शिवाय मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार ज्योती पाटील यांच्या प्रचारात मी सक्रीय सहभागी होणार आहे, असे संदीप गिड्डे म्हणाले.

## वरणगे पाडळी येथे पुन्हा बिबट्याचा वावर

यवलूज.ता.२९(प्रतिनिधी)-

**वरणगे पाडळी (ता.करवीर) येथील वेशीच्या माळात शेतकऱ्यांना शुक्रवारी दुपारी नव्याने बिबट्याचा वावर दिसून आला असून या बिबट्याने एका कुत्र्यावर हल्ला करून त्याला भक्ष केले आहे. या परिसरात वारंवार बिबट्या दिसून येत असल्याने शेतकऱ्यांत भितीचे वातावरण आहे. सायंकाळी वनविभागाच्या रेस्क्यू पथकाने ड्रोनव्दारे वरणगे पाडळी व यवलूज येथील जंगल भागाची पाहणी केली परंतू त्यामध्ये बिबट्याचा ठावठिकाणा दिसून आला नाही.**

वरणगे पाडळी व यवलूज परिसरातील डोंगर भागात जंगल आहे. त्याला लागून शेतकऱ्यांच्या जमिनी आहेत. सध्या ऊस गळीत हंगाम सुरु असल्याने शेतकरी गुऱ्हाळ घर व साखर कारखान्यांना ऊस गाळपाच्या लगभगीत आहेत. गेल्या आठवडाभरात या परिसरात बिबट्याने थैमान घातले असल्याने नागरिकांच्यात मनात घबराहटीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शुक्रवारी सायंकाळी उशिरापर्यंत वनविभागाचे वनरक्षक विदेश तांबारी, प्रितम केसरकर, प्रदीप सुतार रविराज बलुगडे यांनी ड्रोनच्या साहाय्याने बिबट्याचा शोध घेतला परंतू ड्रोनमध्ये बिबट्याचा ठावठिकाणा दिसून आला नाही. नागरिकांनी सावधानता बाळगावी, असे आवाहन वनविभागाच्या रेस्क्यू पथकामार्फत करण्यात आले आहे.



लाठीकाठी, प्रशिक्षणातील शिबीरार्थीना स्मृतीचिन्ह देताना क्लबचे अध्यक्ष संजय घायतिडक, प्रकाश गौड व इतर.

## रोटरी क्लबच्यावतीने प्रशिक्षण शिबीर संपन्न

इचलकरंजी,ता.२९-

**येथील मुलींमध्ये आत्मविश्वास वाढावा, ऐतिहासिक शस्त्र कला अवगत व्हावी म्हणून, दरवर्षी आत्मनिर्भर बेटी अभियान अंतर्गत, लाठी-काठी, दांडपट्टा, तलवार-भाला प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले जाते. यावर्षीही माय फाऊंडेशन व रोटरी क्लबच्यावतीने प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले होते.**

या शिबिरात २५ मुलींनी सहभाग घेतला होता. या व्यतिरिक्त या अभियानामध्ये भारताचा स्वर्णिम इतिहास, प्राचीन ग्रंथ, भारताने जगाला दिलेले योगदान, भारतातील महान योद्धे, इत्यादी विषयांवर आधारित चर्चासत्र आणि पालकांशी संवादसत्र सुद्धा घेण्यात आले. या शिबीरात मुलींनी लाठीकाठी, तलवार,भाला खेळाचे प्रात्यक्षिक सादर केले. या मोहिमेतील प्रत्येक मुलीला सहभाग स्मृतीचिन्ह देण्यात आले. यावेळी प्रशिक्षक महेश गवंडी यांचा सत्कार करण्यात आला. या समारोप समारंभप्रसंगी रोटरी क्लब ऑफ इचलकरंजीचे प्रेसीडेंट संजय घायतिडक, प्रकाश गौड, नेमिनाथ कोथळे, सत्यनारायण धूत आणि सर्व पदाधिकारी तसेच माय फाऊंडेशनचे संजय रांदड, आनंद काबरा, अरूण बांगड आणि माय सदस्य उपस्थित होते.हे संपूर्ण शिबिर यशस्वी करण्यासाठी रोटरीचे सर्व पदाधिकारी, कर्मचारी व माय सदस्य सर्वश्री बालाप्रसाद भूतडा, गोपाल चांडक, नवनीत बांगड, दीपक बियाणी, वासुदेव तोतला, आनंद बंग, प्रवीण मुंदडा, प्रमोद जाजू, शरद झंवर, अरूण बांगड यांनी परिश्रम घेतले.

## मार्गशीर्ष महिन्यामुळे फळांना मागणी

कोगनोळी,ता.२९(प्रतिनिधी)

**मार्गशीर्ष महिना हा महिलांसाठी विशेष महत्वाचा असतो. मार्गशीर्ष महिन्याला प्रारंभ झाला असून या महिन्यातच महिला व युवती वेगवेगळे व्रतवैकल्य करुन उपवास करीत असतात. यासाठी फळे ही पूजेला लागतात. त्यामुळे फळांना मागणी वाढली आहे.**

पूजेसाठी विविध प्रकारची पाच फळे पुजली जातात.यासाठी कोगनोळी येथे व्यापाऱ्यांनी फळांचे स्टॉल मांडले आहेत. ४० रुपयांपासून ६० रुपयांपर्यंत वेगवेगळ्या प्रकारची पाच फळे विकली जात आहेत. व्रतवैकल्याचा महिना असल्याने ग्राहकांचाही चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

# कबनुरात कर थकबाकीदारांना ५० टक्के सवलत देण्याचा ठराव मंजूर

## कर सवलतीची ३१ डिसेंबरपर्यंत मुदत

कबनूर,ता.२९(वार्ताहर)-

**येथील निवासी मालमत्ता कर, पाणीपट्टी आणि दिवाबत्ती कराच्या थकबाकीदारांना दिलासा देत कबनूर ग्रामपंचायतने १ एप्रिल २०२५ पूर्वीच्या थकबाकी वर ५० टक्के सवलत देण्याचा ऐतिहासिक ठराव सरपंच सुलोचना कट्टी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ग्रामसभेत बहूमताने मंजूर करण्यात आला.**



ग्रामपंचायतने दिलेल्या माहितीनुसार सन २०२५-२६ या चालू वर्षीचा कर एकरकमी भरल्याशिवाय ही सवलत मिळणार नाही. तसेच १ एप्रिल २०२५ पूर्वीची थकबाकी भरताना फक्त ५० टक्के रक्कम भरावी लागणार आहे. उर्वरित पन्नास टक्के रकमेची पूर्ण सवलत राहील.ही सवलत फक्त मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान या कालावधीत म्हणजे ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत लागू असणार आहे. त्यानतर कोणत्याही प्रकारची सवलत दिली जाणार नाही.

ग्रामपंचायत अधिकारी संजय बर्डे यांनी विषयपत्रिकेवरील विषय वाचन करून निवासी कर थकबाकीदारांना ५०टक्के सवलत मिळणेबाबत शासन परिपत्रकानुसार चर्चा करण्याचे आवाहन केले. तेव्हा खंडेराव परीट,उमेश पाटील आदीनी ज्या ग्रामस्थांनी प्रामाणिकपणे वेळेवर कर ग्रामपंचायतीला भरला आहे. त्याच्यासाठी ग्रामपंचायतीने काय उपाययोजना केल्या आहेत,असा प्रश्न उपस्थित केला.त्यावेळी ग्रामपंचायत अधिकारी श्री.बर्डे यांनी आम्ही सरकारकडे याबाबत मार्गदर्शन मागवतो, असे सांगितले. महावीर पिंपळे यांनी प्रामाणिकपणे कर भरणाऱ्याच्यावर सरकार अन्याय करत असल्याचे म्हटले.अजित खूडे यांनी कर भरलेल्यांना पुढील काळात ५० टक्के करमाफीची मागणी केली. सुनील इंगवले व विनायक गुंडुकले यांनी औद्योगिक व निवासी वाणिज्य कर आकारणी विभागणी झाली पाहिजे अशी मागणी केली. कॉ. आनंदराव चव्हाण यांनी मोठ्या थकबाकीदार यांची वसुली मतासाठी केली जात नसल्याचा आरोप केला.

त्यानंतर कबनूर ग्रामपंचायतने १ एप्रिल २०२५ पूर्वीच्या थकबाकीवर ५० टक्के सवलत देण्याचा ठराव बहूमताने मंजूर करण्यात आला. ग्रामसभेत झालेल्या चर्चेत दत्तात्रय शिंदे, उत्तम जाधव, अजित खूडे, दत्तात्रय पाटील, शांतीनाथ कामत, रविंद्र धनगर, विष्णू चव्हाण, रियाज चिक्कोडे, विशाल दंडवते आदींनी भाग घेतला. यावेळी उपसरपंच सुधीर लिगाडे, मधुकर मणेरे, सुनील काडाप्पा आदी ग्रामस्थ हजर होते.

# रुईतून अवजड वाहनांना एकेरी मार्ग

## सततच्या वाहतूक कोंडीमुळे ग्रामपंचायतीचा निर्णय

रुई,ता.२९(वार्ताहर)-

**रुई गावातून साखर कारखाने, औद्योगिक वसाहती तसेच हुपरी मार्गे कर्नाटकाकडे येणाऱ्या तसेच जाणाऱ्या अवजड वाहनांसाठी एकेरी मार्ग करत रूई ते रुई फाटा मार्गे जाण्याचे आवाहन येथील ग्रामपंचायतच्या मार्फत करण्यात आले आहे.**

रुई गावाच्या एका बाजूला लक्ष्मी औद्योगिक वसाहत व पंचगंगा साखर कारखाना आहे तसेच दुसऱ्या बाजूस कागल पंचतारांकित औद्योगिक वसाहत व जवाहर साखर कारखाना आहे त्याचबरोबर हुपरी मार्गे कर्नाटकाकडे जाणाऱ्या अवजड वाहनांची संख्या लक्षणीय आहे. त्यामुळे रुई गावातील मुख्य चौकालगत असणाऱ्या इचलकरंजीकडे जाणाऱ्या वळणावर वारंवार वाहतूक कोंडी होत आहे. परिणामी त्याचा नाहक त्रास इतर प्रवाशांना व कामगार वर्गाला होत आहे.यावर वेळोवेळी दैनिक महासत्तामध्ये अवजड वाहनांमुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीवर मार्ग काढावा याबाबत वृत्त प्रसिद्ध करण्यात आले होते.या वृत्ताची दखल घेत व होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेऊन ग्रामपंचायतच्या वतीने हुपरी, पट्टणकडोलीकडून येणाऱ्या व हातकणंगले- रुई फाटामार्गे येणाऱ्या अवजड वाहनांकरिता रुई ते रुई फाटा या मार्गावरूनच वाहतूक करावी यासाठी एकेरी मार्ग करण्यात आला आहे. त्यामुळे इचलकरंजीकडे जाण्यासाठी मुख्य चौक ते रुई फाटा या मार्गाचा वापर करावा, असे आवाहन ग्रामपंचायतीमार्फत करण्यात आले आहे.



रूई येथील इचलकरंजी वळणावर एकेरी मार्गाचा बोर्ड लावताना ग्रामपंचायतीचे कर्मचारी.




## पेठवडगावात शैक्षणिक साधन निर्मिती कार्यशाळा संपन्न

टोप,ता.२९(प्रतिनिधी)-

**श्री शाहू शिक्षण प्रसारक सेवा मंडळ संचलित सावित्रीबाई फुले महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पेठ वडगाव येथे बी. एड. भाग १ च्या -४ प्रात्यक्षिकांतर्गत शैक्षणिक साधन निर्मिती कार्यशाळा उत्साहात पार पडली. महात्मा जोतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त द्वारकानाथ भोसले यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून कार्यशाळेची सुरुवात झाली.**

प्रास्ताविकेत प्राचार्य डॉ.अस्मिता पाटील यांनी फुले दाम्पत्यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या क्रांतिकारी कार्याचा उल्लेख करताना,शैक्षणिक साधनांमुळे अध्यापन अधिक प्रभावी व सहजसोपे होते,असे सांगितले. स्वागत प्रा. सुनिता बाणदार यांनी केले. भोसले यांनी तरंगचित्र, घडीचित्र, त्रिमितीय मॉडेल यांसह विविध साधनांची प्रत्यक्ष प्रात्यक्षिके सादर केली. विद्यार्थिनींचे गट करून विविध विषयांनुसार आकर्षक व उपयुक्त शैक्षणिक साधने तयार करून घेण्यात आली. कार्यक्रमाचे आभार प्रा. विमल कोळी यांनी मानले. संस्थेचे अध्यक्ष गुलाबराव पोळ यांचे या उपक्रमास विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यशाळेस बी. एड. विद्यार्थिनी उपस्थित होत्या.


आर्ट ऑफ लिव्हिंग, इचलकरंजी येथे...
हॅपिनेस प्रोग्राम
दोन विविध बॅचेस
सकाळ व संध्याकाळ
विश्वविख्यात सुदर्शन क्रिया, योग, प्राणायम, ध्यान, अमुल्य ज्ञान



उत्तम मानसिक, शारीरीक, आरोग्य, रोगप्रतिकारक शक्ती विकास केंद्रित



लाईफ कोच, वरिष्ठ प्रशिक्षक विनायक मुरदंडे भैय्या यांच्यासोबत...
ज्यामुळे सर्व प्रकारचा ताण तणाव कमी होऊन मनःशांती, एकाग्रता, उत्साह, सकारात्मकता, आत्मविश्वास वाढण्यास मदत होते
बुधवार दि. ३ डिसेंबर २०२५ ते रविवार दि. ७ डिसेंबर २०२५
वेळ: सकाळी ६:०० ते ९:०० | सायंकाळी ६:०० ते ९:००
स्थळ: नामदेव भवन, इचलकरंजी
9604756839 | 7350535000 | 9890175055

पंचवटी शुक्रवार ता.२८ पासून
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरू राहील
ऑनलाईन बुकींग bookmyshow
अधिक माहितीसाठी संपर्क : 9623150103
रोज ४ खेळ * १२ * ३ * ६ * ९ वा.



तेरे इश्क में (हिंदी)

५६ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
भाग्यरेखा DOLBY DIGITAL
शुक्रवार ता. २८ पासून
नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम
रोज ४ खेळ *१२-३-६-९ वा.



तेरे इश्क में (हिंदी)
भु. क्रिती सेनन, धनुष

श्रीहरी शुक्रवार, ता.२८/११/२०२५ पासून दुपारी १ व ४ वाजता
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
प्यासा मन
प्रौढांसाठी सायं. ७ वा.
कहाणी
A A

श्रीदत्त शुक्रवार, ता. २८ पासून रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
लेसन्स (भाग २)
A शहरात प्रथमच * फक्त प्रौढांसाठी A

कल्पना लेजर प्रोजेक्टरसहीत शुक्रवार ता. २८ पासून
रोज ४ खेळ
१२ * ३ * ६ व ९ वाजता



तेरे इश्क में (हिंदी)

गुरु शुक्रवार ता. २८ पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
रोज ४ खेळ १२.३०* ३.३० * ६.३० व ९.३० वा.
युवा पिढीची क्रेझ बनलेली जबरदस्त लव्ह स्टोरी



तेरे इश्क में (हिंदी चित्रपट)
साऊथ सुपरस्टार धनुष व किर्ती सेननची थ्रीलर लव्ह स्टोरी

RK CINEMA 3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070 book my show



"तेरे इश्क में" (हिंदी)
10:00 AM, 01:00 PM
02:00 PM, 04:00 PM
07:00 PM, 09:15 PM
10:00 PM
"दे द प्यार दे 2" (हिंदी)
10:30 AM, 01:30 PM
07:30 PM
"झूटोपिया 2 3D" (हिंदी)
11:30 AM, 05:00 PM
07:15 PM
"मस्ती 4" (हिंदी)
04:30 PM, 10:30 PM
चित्रपटाचा भरघोस आनंद घ्या आमच्या नवीन खाद्य प्रकारासह, खासकरून पिज्जा, पास्ता, सँडविच, गार्लिक ब्रेड आणि बरिस्ता एक्सप्रेसो कॉफी इचलकरंजीत प्रथमच

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11



तेरे इश्क में (HIN) (U/A)
11.15am, 02.30, 04.00, 05.45, 07.15, 09.00, 10.30pm
झूटोपिया २ (3D) (HIN) (U/A)
11.30am, 04.45pm
मस्ती ४ (HIN) (A)
02.00pm
दे दे प्यार दे २ (HIN) (U/A)
10.00pm
रंगीला रि-रिलीज (HIN) (U)
07.00pm
आता पहा मॉर्निंग शो फक्त 100 पासून पुढे

# कराड पालिकेवर आघाडीचा झेंडा फडकवा

## एकनाथ शिंदे; यशवंत व लोकशाही आघाडी उमेदवारांच्या प्रचारार्थ सभा

कराड,ता.२९(प्रतिनिधी)-

**कराड ही महाराष्ट्राच्या विकासाची यज्ञभूमी आहे. यशवंतराव चव्हाण यांनी येथूनच विकासाची गुढी उभारली. त्या वारशाला नवी उंची देण्यासाठीच यशवंत विकास आघाडी आणि लोकशाही आघाडीत एकजूट केली आहे. कराडच्या विकासाचा झेंडा, हाच या आघाडीचा अजेंडा आहे. कराडचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कराड पालिकेवर आघाडीचा झेंडा फडकवा, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.**


कराडः यशवंत व लोकशाही आघाडीच्या प्रचार सभेत बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, समवेत उमेदवार राजेंद्रसिंह यादव, माजी मंत्री बाळासाहेब पाटील व मान्यवर.

कराड मंगळवार पेठेतील यशवंत विकास आघाडी व लोकशाही आघाडी उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी माजी सहकार मंत्री बाळासाहेब पाटील, जयवंतराव शेलार,जयंतकाका पाटील, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजेंद्रसिंह यादव, माजी उपनगराध्यक्ष जयवंतराव पाटील, नगरसेवक हणमंत पवार, फारूक पटवेकर, राजेंद्र माने, बंडानाना जगताप, शिवाजीराव मोहिते, घनश्याम पेंढारकर,नितीन वास्के, सुलोचना पवार, नाना पाटील, अल्ताफ शिकलगार, विद्याराणी साळुंखे, नंदकुमार बटाणे, गीतांजली थोरात आदी मान्यवर उपस्थित होते.

शिंदे म्हणाले, ही आघाडी विरोधकांचे डिपॉझिट जप्त करेल.कराडची वाट लावणाऱ्यांच्या हाती नारळ देऊन त्यांना मार्ग दाखवा.कराडच्या विकासासाठी ३२५ कोटी रूपयांचा निधी दिल्याचे त्यांनी सांगितले. पाणीपुरवठा योजनेसाठी ३६४ कोटी, ड्रेनेजसाठी ९६ कोटी, रस्त्यांसाठी १२८ कोटी या मोठ्या प्रकल्पांवर भर देतानाच आणखी निधी देण्याची ग्वाही त्यांनी दिली. कराड विमानतळ विस्तारीकरण, ऑडिओ हॉल, शॉपिंग सेंटर, आरोग्यशिक्षण सुविधा, पाणी व ड्रेनेज योजना अशा प्रकल्पांना गती देणार असल्याचे त्यांनी सांगितले. राजेंद्रसिंह यादव यांना कोणीही रोखू शकत नाही. विकासाचा झेंडा नगरपालिकेवर निश्चित फडकेल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

माजी सहकारमंत्री बाळासाहेब पाटील म्हणाले,कराड शहराच्या शैक्षणिक, सांस्कृतिक आणि कृषी क्षेत्रात अनेक नेत्यांनी महत्त्वाची कामे केली.पी.डी. पाटील यांच्या दूरदृष्टीतून अनेक सुस्थितीतील योजना उभ्या राहिल्या. आता नागरिकांच्या गरजांचा आवाज ऐकून दोन्ही आघाड्यांनी विकासाचा नवा अध्याय सुरू केला आहे. वाढत्या लोकसंख्येनुसार पिण्याच्या पाण्याचे व ड्रेनेजचे जाळे अधिक विस्तारण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले,नारळ आणि छत्री या चिन्हांसमोरील बटण दाबा; कराडच्या विकासाचा निर्णय तुमच्या हातात आहे. आम्ही नागरिकांच्या मनातील कराड उभे करू.

नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजेंद्रसिंह यादव यांनी, २४ बाय ७ पाणीपुरवठा योजना, सोलर बचत प्रकल्प, वाढीव भागातील ड्रेनेज,१४ नवी अभ्यासिका,फिश मार्केट, पार्किंग समस्येवरील उपाय, नवी कृष्णा घाटांची निर्मिती, संत सखू मंदिराला पर्यटन दर्जा, पालिकेच्या शाळांना अत्याधुनिक सुविधा यांसारख्या योजनांची घोषणा केली. ते म्हणाले, पुढील ५० वर्षांचा विकासाचा पाया आता रचायचा आहे. यशवंत व लोकशाही आघाडीच्या उमेदवारांना संधी द्या; पाच वर्षांत कराडच्या विकासात कोणतेही काम अपूर्ण राहणार नाही.

# घोगाव ते पलूस कॉलनी रस्त्याची दयनीय अवस्था

कुंडल,ता.२९(वार्ताहर)

**कराड-विजापूर महामार्गावर घोगाव (रेल्वेगेट) ते पलूस कॉलनी रस्त्याची खड्ड्यांमुळे दयनीय अवस्था झाली आहे. अनेक वेळा या रस्त्यावर लहान मोठे अपघात होऊन काहींना आपला जीव गमवावा लागला आहे. तरी या रस्त्याची तातडीने दुरुस्ती व्हावी, अशी मागणी नागरिकांच्यातून होत आहे.**


घोगाव-पलूस कॉलनी रस्त्यावर पडलेले मोठ-मोठे खड्डे.

कराड-विजापूर महामार्ग मोठा रहदारीचा असून या रस्त्यावर लहान वाहनांसह ऊस वाहतुकही मोठ्या प्रमाणात केली जाते.या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनांचा वेग मंदावून वाहतुकीची कोंडी होत आहे.तसेच घाडगे पूल, घोगाव बसस्थानक, लक्ष्मी मंदिर तसेच गणपती मंदिर (पलूस कॉलनी) पुलाजवळ पडलेल्या मोठ मोठ्या खड्ड्यांमुळे अपघाताच्या प्रमाणामध्ये वाढ झाली आहे. रात्रीच्या वेळी पुढून येणाऱ्या वाहनांच्या प्रखर लाईटमुळे मोटर सायकल चालकांना गाडी चालवण्याचा अंदाज येत नाही. उसाची वाहतूक ही मोठ्या प्रमाणात या रस्त्यावरून असते. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे रात्रीच्या वेळी अपघात होत आहेत. या महामार्गावर अनेकांचे बळी गेले आहेत. पीडब्ल्यूडी खाते आणखी कोणाचा बळी जातोय काय? याची वाट पाहते आहे की काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे

### दुरुस्ती करण्याची नागरिकांतून मागणी

हा रस्ता पूर्ण काँक्रिटीकरण आहे ज्या ठिकाणी पुल तयार केली आहेत तेथे डांबरी रस्त्याचे काम केले आहे. या ठिकाणची कामे ठेकेदार दर्जेदार करत नसल्यामुळे एका वर्षात रस्त्यामध्ये खड्डे पडत आहेत. तरी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी या रस्त्यावरील खड्ड्याकडे काळजीपूर्वक लक्ष देऊन खड्डे मुजवून घ्यावेत, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.खड्डे मुजवून घेतले नाही तर तीव्र आंदोलन केले जाईल, असा हा सूर नागरिकांच्यातून व्यक्त होत आहे.

# प्रवीण मानेंना विजयी करा-राजू शेट्टी

आष्टा,ता.२९(प्रतिनिधी)-

**घराण्याचा वारसा घेऊन मत मागणाऱ्यांपेक्षा कामाची शिदोरी घेऊन मत मागणाऱ्या प्रवीण माने व त्यांच्या सहकाऱ्यांना आष्टा नगरपालिकेच्या निवडणुकीत संधी द्या, असे आवाहन माजी खास. राजू शेट्टी यांनी केले.**

आष्टा येथे महायुतीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार प्रवीण माने यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत माजी खास.राजू शेट्टी बोलत होते. यावेळी प्रवीण माने, डॉ.सतीश बापट, शितल चौगुले, उदय कवठेकर,अरुण कवठेकर,ज्योती कोळी, सुरेंद्र मालगावे,उषा ढोले, संदीप सावंत उपस्थित होते.

राजू शेट्टी पुढे म्हणाले, प्रवीण माने हा शेतकऱ्याचा मुलगा आहे.सर्वसामान्य कष्टकरी जनतेबरोबर शेतकऱ्याच्या मालाला, ऊसाला दर मिळावा म्हणून रस्त्यावर उतरणारा शेतकऱ्याचा नेताही आहे. संघटनेचे ऊस दर आंदोलन कारखानदारांनी मोडीत काढण्याचा प्रयत्न केला. यावेळी मदतीला आलेल्या प्रवीण माने यांच्यासह सर्व २४ उमेदवारांना आष्टेकरांनी साथ द्यावी. मोठ्या मताधिक्क्याने निवडून देऊन पैरा फेडावा.


आष्टा येथील प्रचार सभेत बोलताना माजी खास. राजू शेट्टी,समवेत प्रवीण माने व इतर.

प्रवीण माने म्हणाले, गेली सात,आठ वर्षे जनतेसाठी लढत आलोय.जनतेच्या सर्व त्या समस्या सोडवण्यासाठी रात्रीचा दिवस करून धावतो आहे यापुढील काळात देखील लढण्याची इच्छा आहे. जनतेने मतरुपी आशीर्वाद देऊन लढण्यासाठी बळ द्यावे. आष्टा शहराचा विकास काय असतो ते करून दाखवतो.

# मलकापूरच्या विकासाला गती देणार

### मंत्री मकरंद पाटील

कराड,ता.२९(प्रतिनिधी)-

**मलकापूरच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही. विरोधक काहीही बोलोत, राज्याचे अर्थखाते आपल्याकडे आहे. मलकापूरच्या सर्वांगीण विकासासाठी निधीचा पाऊस पडेल. या माध्यमातून शहराच्या विकासाला मोठी गती देऊ, अशी ग्वाही मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी दिली.**

राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, शिवसेना (उबाठा) आणि समविचारी पुरोगामी विकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ मलकापूर (ता.कराड) येथील आयोजित सभेत ते बोलत होते.यावेळी उदयसिंह पाटील-उंडाळकर, डॉ.सुधीर जगताप, बाळासाहेब सोळसकर, राजेश पाटील-वाठारकर, सुनील पाटील, इंद्रजीत चव्हाण, अजित पाटील-चिखलीकर, प्रा. धनाजीराव काटकर, काँग्रेस तालुकाध्यक्ष नामदेव पाटील, शिवसेना जिल्हाध्यक्ष हर्षल कदम, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार डॉ.आर्यन कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.



मलकापूर : राष्ट्रवादी, काँग्रेस, शिवसेना व समविचारी पुरोगामी विकास आघाडीच्या सभेत बोलताना मंत्री मकरंद पाटील, समवेत उपस्थित मान्यवर.

उदयसिंह पाटील म्हणाले, आकर्षक आश्वासने,पैशांची भाषा पुढील काही दिवसांत वाढेल.पण मलकापूरच्या नागरिकांनी स्वाभिमानाने मतदान करून पुरोगामी विचारांना पाठिंबा द्यावा.कराड दक्षिणमध्ये रुजू पाहणाऱ्या सरंमजाम प्रवृत्तींना थारा देऊ नका.

शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष हर्षल कदम यांनी सत्ताधाऱ्यांवर हल्लाबोल करत त्यांनी निवडणुकीचा बाजार मांडला गेला आहे. पैशाची उधळपट्टी आणि सत्ता यांचा उघड गैरवापर सुरू आहे. मतदारांचा अनादर करणाऱ्या प्रवृत्तीला आता आळा घालावा लागेल, असे सांगितले.

नगराध्यक्ष पदाचे उमेदवार डॉ.आर्यन कांबळे म्हणाले, मलकापूरमध्ये प्रलंबित प्रश्नांची संख्या मोठी आहे. हे प्रश्न सोडवण्यासाठी मी पूर्ण क्षमतेने काम करीन. पुरोगामी विकास आघाडीवर जनतेचा विश्वास वाढत आहे आणि त्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही.

दादासो शिंगण यांनी, मागील पाच वर्षांत सत्ताधाऱ्यांनी नगरपालिकेच्या माध्यमातून सामान्य नागरिकांवर अन्याय केल्याचे सांगत शहराच्या विकासाला साथ देण्याचे आवाहन केले.

### उपकारकर्त्याला विसरून विरोधकांच्या मांडीवर बसलात!

पृथ्वीराज चव्हाण यांनी मलकापूरसाठी तब्बल १६०० कोटींचा निधी दिला. दोन वेळा तुमच्या घरातील व्यक्तींना आमदार केले आणि ज्यांनी उपकार केले, त्यांच्याच विरोधकांच्या मांडीवर जाऊन बसलात. हा उपकाराचा मोबदला आहे का? असा सवाल अजितराव पाटील-चिखलीकर यांनी मनोहर शिंदे यांचा समाचार घेताना उपस्थित केला.तसेच पृथ्वीराज चव्हाणांचा हा अपमान धुवून काढण्यासाठी जनता यथोचित उत्तर देईल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.


कुंडल येथे प्रसाद पाटील याचा सत्कार करताना क्रांती कारखान्याचे चेअरमन शरद लाड व अन्य मान्यवर.

# प्रसाद पाटील याचा सत्कार

कुंडल,ता.२९(वार्ताहर)-

**येथील क्रांती इंटरनॅशनल पब्लिक स्कूलचा विद्यार्थी प्रसाद अनिल पाटील याने वाराणसी (उत्तरप्रदेश) येथे पार पडलेल्या ६९ व्या राष्ट्रीय शालेय आर्चरी स्पर्धेमध्ये व्दितीय क्रमांक पटकावून रौप्य पदक प्राप्त केले. याबद्दल क्रांतीअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन शरद लाड यांनी त्याचा सत्कार केला.**

यावेळी शशिकांत वाघमारे, अनिल पाटील आदी उपस्थित होते. या यशाबद्दल कुंडल, पलूस परिसरामध्ये प्रसाद पाटील याचे कौतुक होत आहे. त्याला सातारा येथील प्रविण सावंत यांचे मार्गदर्शन लाभले.

# गुन्हेगारी वृत्तीच्या लोकांना हद्दपार करा-शिंदे

आष्टा,ता.२९(प्रतिनिधी)-

**आम.जयंत पाटील यांनी आष्टा शहरात कोट्यावधी रुपयांची विकास कामे केलीत. प्रशासक काळात सत्तेच्या चाव्या वापरत काही जणांनी पालिकेत प्रवेश केला. त्यांना टक्केवारीचा छंद जडला आहे. यामुळेच आष्ट्यात गुन्हेगारी वाढली आहे. महिला असुरक्षित आहेत. गुन्हेगारी वृत्तीला हद्दपार करा व जनतेसाठी विकासाचं व्हिजन असणाऱ्या शहर विकास आघाडीच्या सर्व सदस्यांना निवडून द्या, असे आवाहन शहर विकास आघाडीचे नेते वैभव शिंदे यांनी केले.**

आष्टा येथील गोरडे चौक येथे शहर विकास आघाडीच्या झालेल्या कोपरा सभेत ते बोलत होते. यावेळी आ.जयंत पाटील, माजी


आष्टा येथील कोपरा सभेत बोलताना वैभव शिंदे, व्यासपीठावर आ.जयंत पाटील व इतर प्रमुख मान्यवर.

उपनगराध्यक्ष शेरनवाब देवळे, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार विशाल शिंदे, वरदराज शिंदे, भाग्यश्री शिंदे, रघुनाथ जाधव, माणिक शेळके, संग्राम फडतरे, रामचंद्र सिद्ध हे प्रमुख उपस्थित होते.

वैभव शिंदे म्हणाले, सामाजिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक असणारी शहराची ओळख आता गुन्हेगारीचे शहर होते की काय अशी परिस्थिती मागील तीन-चार वर्षांपासून निर्माण झाली आहे. मारामाऱ्या,चोऱ्या, घरफोड्या महिलांच्या दागिने चोरीच्या अनेक घटना घडत आहेत. गुन्हेगारी हद्दपारीचा शिक्का असणारे शहराचा विकास मीच केला असे भासवित आहेत. गुन्हेगारी मनोवृत्तीच्या नागरिकांनी हद्दपार करण्याची वेळ आली आहे.जनता निश्चितच हद्दपार करेल, असा विश्वास व्यक्त केला.


ते पुढे म्हणाले, शहर विकास आघाडीच्या माध्यमातून जवळपास १५० कोटी रुपयांची सत्ता काळात कामे तर ५५ कोटीची कामे प्रशासक काळात झाली आहेत अशी एकूण २०५ कोटींची कामे शहरात झाली आहेत पण आम्ही केलेल्या कामाचे श्रेय लाटणाऱ्यांची संख्या वाढली आहे. राज्य सरकारकडे सुमारे ७४ कोटी रुपयांची अतिरिक्त पाण्याची योजना प्रस्तावित केली आहे. ती पूर्णत्वाकडे न्यायची आहे. नागरिकांना २४ तास पाण्याची सोय करून देईन. तरुणांना रोजगारासाठी, औद्योगिक वसाहतीसाठी प्रयत्नशील राहणार आहे. त्यासाठी आष्टाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असून शहर विकास आघाडीच्या सदस्यांना निवडून द्या.

# बनपुरीत पुनर्वसनातील हस्तांतरण व्यवहारावरील निर्बंध शिथिल

ढेबेवाडी,ता.२९(प्रतिनिधी)-

**महिंद धरणाच्या लाभक्षेत्रातील बनपुरी (ता.पाटण) गावासाठी पुनर्वसन अधिनियमातील तरतूदी अन्वये लावलेले हस्तांतरण व्यवहारावरील निर्बंध शिथिल करण्यात आले असून, तशा सूचना पाटणचे तहसीलदार अनंत गुरव यांनी येथील मंडलाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.**

बनपुरीचे महेश पाटील व गावचे सरपंच मनोज पाटील यांनी मंत्री शंभूराज देसाई यांना शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीवर असलेल्या हस्तांतरण निर्बंधाबाबत माहिती दिली. मंत्री देसाई यांनी याबाबत संबंधितांना सूचना देऊन हा प्रश्न निकालात काढण्यास सांगितले होते.त्यानुसार हा प्रश्न मार्गी लागल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. महिंद धरणाचे बांधकाम सुरू करतेवेळी नोव्हेंबर १९९६ सालापासून धरणग्रस्तांच्या पुनर्वसन प्रयोजनासाठी बनपुरीच्या शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावर पुनर्वसन कायदा कलम १२ अन्वये कोणत्याही प्रकारचे हस्तांतरास/विभागणीस बंदी अशी नोंद करण्यात आली होती.या नोंदीमुळे बनपुरीतील शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. बँक कर्ज प्रकरण तसेच जमिनीचे खरेदीविक्री व्यवहार करताना अडथळे येत होते. सातबाऱ्यावरील हस्तांतरण बंदीच्या नोंदी काढाव्यात, यासाठी महेश पाटील यांनी मंत्री देसाई यांच्याकडे पाठपुरावा केला. मंत्री देसाई यांनी याबाबत कार्यवाहीचे आदेश संबंधित विभागाला दिले. त्यानुसार हस्तांतरण व्यवहारावरील निर्बंध शिथिल करण्यात आले आहेत.


गिरीश चितळे यांना नियुक्ती पत्र प्रदानप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे कार्यवाह कुलगुरू प्रा.डॉ.सुरेश गोसावी व अन्य.

# गिरीश चितळे यांची 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस' म्हणून नियुक्ती

भिलवडी,ता.२९(वार्ताहर)-

**शिवाजी विद्यापीठाच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शाळेत फूड टेक्नॉलॉजी विषयासाठी 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस' म्हणून चितळे डेअरीजचे संचालक गिरीश चितळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नवी शिक्षण नीती (एनईपी) अंतर्गत अकादमिक-उद्योग सहकार्य वाढविण्यासाठी ही मानद नियुक्ती दिली गेली आहे.**

नियुक्तीपत्र कार्यवाह कुलगुरू प्रा.डॉ.सुरेश गोसावी यांनी प्रदान केले. यावेळी कार्यवाह प्र-कुलगुरू प्रा.डॉ.ज्योती जाधव तसेच विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सिद्धार्थ शिंदे, स्वगत पारुळेकर, संजय परमणे आणि विशाल गायकवाड उपस्थित होते.

# राष्ट्रवादी हीच आमच्या कार्यकर्त्यांची जात

### उपमुख्यमंत्री अजित पवार

कोरेगाव,ता.२९(वार्ताहर)-

**मी कुणाची जात विचारत नाही. राष्ट्रवादी हीच आमच्या कार्यकर्त्यांची जात आहे. आम्ही नेहमी १२ बलुतेदारांना घेऊन पुढे जाण्याची परंपरा पाळली आहे.**



**मोठ्या प्रकल्पासाठी विशेष निधीची आवश्यकता असते. नुसती भाषणे देऊन विकास होत नाही. योजना राबवण्यासाठी पैशांची गरज असते आणि ते देण्याचे काम आम्ही करू, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.**

रहिमतपूर नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या प्रचार सभेत ते बोलत होते यावेळी खास.नितीन पाटील, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अनिल देसाई,जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सोळसकर, माजी नगराध्यक्ष सुनील माने, शिवसेना नेते वासुदेव माने, माजी नगराध्यक्ष आनंदा कोरे, प्रदीप विधाते, शहाजी क्षीरसागर, संभाजी गायकवाड, राष्ट्रवादी युवकचे प्रदेश उपाध्यक्ष मनोज देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

### सत्तेचा माज जनता खपवून घेत नाही

दुबार-तिबार मतदार, एका प्रभागातून दुसऱ्यात मतदार हलवणे हे चुकीचे आहे. संविधानाने दिलेला मताचा हक्क अबाधित राहायला हवा. लोकशाहीत दमदाटीला स्थान नाही. किती आले, किती गेले, अर्ध्या हळकुंडाने पिवळे होऊ नका, आम्ही लाखो मताने आठ-आठ वेळा निवडून आलो आहोत; पण कधी माज केला नाही, असा टोला त्यांनी नाव न घेता आम.मनोज घोरपडे यांना लगावला.

उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणाले, शहरातील रस्ते, पाणीपुरवठा आणि इतर मूलभूत सुविधांच्या उभारणीत शासनाने अनेक पावले उचललेली असून, शेतकऱ्यांसाठी मोफत वीज तर महिलांसाठी लाडकी बहिणी योजना आणून त्यांना सन्मानाने जगण्यासाठी मदत केली आहे. सुनील माने यांची शहरासाठी मोठी स्वप्ने आहेत त्यांच्यामागे माझे पूर्ण पाठबळ आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली रहिमतपूरचा विकास अधिक वेगाने होईल. शहराच्या मध्यभागी छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक आणि एसटी स्टँड परिसरात व्यापारी संकुल उभारण्याचा प्रस्ताव प्रलंबित असून, त्याला आगामी काळात गती देणार असल्याचेही अजित पवार यांनी सांगितले.

# अरुणोदयाचा अस्त



इचलकरंजी मंगळवार पेठेतील अरुणराव घोरपडे यांच्या आकस्मिक निधनाने जुन्या काळातील राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांना धक्का बसला. या शहराच्या राजकीय भरभराटीच्या काळात अनेक वर्षे अखिल भारतीय काँग्रेसचे इचलकरंजी शहराचे सेक्रेटरी म्हणून त्यांनी काम केले. हे काम करत असताना त्यांचा दे.भ. बाबासाहेब खंजिरे, सहकारमहर्षी दत्ताजीराव कदम यांच्याबरोबर सहवास आला.

शहर काँग्रेसचे अध्यक्ष पुरुषोत्तम बाळकृष्ण सुभेदार यांचे ते अत्यंत आवडते कार्यकर्ते होते. अरुणरावांच्या काळात काँग्रेसचे अनेक सेल होते, त्या सगळ्या प्रमुख सेलपदी अरुणरावनी काम केले. हे काम करत असताना सहकारमहर्षी क. बा.आवाडेदादा, मल्हारराव बावचकर, प्रकाश आवाडे यांच्या ते निकट आले, इचलकरंजीच्या अनेक प्रश्नांवर त्यांनी आंदोलने केली. १९६२ पासून १९८० पर्यंत नगरपालिका ताब्यात असेपर्यंत नागरी विकासामध्ये ते सतत पुढे होते आणि सदाशिवराव मुरदंडे यांच्याबरोबर ते काम करत होते. त्यांच्या कार्याचा श्रीगणेशा हा मंगळवार पेठेपासून झाला, त्यावेळी मंगळवार पेठेचे प्रमुख महादेवआण्णा मुरदंडे, शंकर बापू बिडकर यांच्या सहवासात ते सातत्याने होते. याच काळात त्यांनी ज्ञानेश्वर माऊली पत संस्थेची निर्मिती केली. आज ही संस्था प्रचंड प्रमाणात वाढलेली आहे आणि सामान्य जनतेला अनेक प्रकारे मदत करत आहे. या पत संस्थेच्या निमित्ताने राजेंद्र बचाटे, महादेव लांडगे, इथापे मामा, श्री.कदम, शिवलिंग पांढरे, बाळासाहेब चव्हाण ही कार्यकारी मंडळींनी फार मोठे सहकार्य केले. यातूनच ज्ञानेश्वर सेवा मंडळ हेही तयार झाले. या संस्था मोठ्या करण्यात अरुणरावांचा फार मोठा हात होता.

अरुणराव घोरपडे हे नवमहाराष्ट्र सहकारी सुतगिरणीचे अनेक वर्षे संचालक होते, त्यांच्या आकस्मिक निधनाने कदम, खंजिरे विचाराने काम करणाऱ्या आजच्या शेकडो कार्यकर्त्यांवर दुःखाची फार मोठी छाया पसरली. स्वभावाने प्रेमळ आणि मित्रांना मदत करणारे असे हे व्यक्तीमत्व होते. अलीकडे ते सार्वजनिक कार्यात कधीच नव्हते पण त्यांनी निर्माण केलेले सहकारी त्यांना कधीच विसरत नव्हते. त्यांच्या निधनाने या शहराच्या विकास पर्वातील सातत्याने आघाडीवर असणारा एक धडाडीचा आणि विचारी कार्यकर्ता काळाच्या पडद्याआड गेला. परमेश्वराने त्यांच्या आत्म्याला चिर:शांती द्यावी ही ईश्वर चरणी प्रार्थना...

**शामराव कुलकर्णी**

● रविवार विशेष

जग झपाट्याने बदलत आहे आणि नव्या बहुध्रुवी व्यवस्थेमध्ये भारताची भूमिका अत्यंत महत्त्वाची व निर्णायक ठरत आहे. विशेषत: जी-२० शिखर परिषदेमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेली सिंहगर्जना ही सबंध मानवजातीच्या कल्याणासाठी दिलेली हाक आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या एकात्म मानवदर्शनाचे सूत्र समोर ठेवत भारत दक्षिणेकडील सर्व राष्ट्रांच्या कल्याणासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एकात्म मानव विकास म्हणजे जगातील सर्व देशांतील मानव समुदायाच्या संपूर्ण प्रगतीसाठी भारत नव्या भूमिकेत उतरला आहे. यासाठी त्यांनी सहा नवे उपक्रम प्रस्तावित केले असून सर्वसमावेशक विकासाचे नवे समीकरण मांडले आहे.



# सर्वसमावेशक विकासाची हाक

### विकासाचे सहा स्तंभ

नवे जग विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारलेले आहे. माहिती तंत्रज्ञान असो की कृत्रिम प्रज्ञा असो की दुर्मिळ खनिजांचा शोध असो या सर्व बाबतीमध्ये आपणास पारंपारिक ज्ञान आणि आधुनिक शहाणपण यामध्ये सुंदर समन्वय साधण्याची गरज आहे. या दृष्टीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जी-२० च्या व्यासपीठावर मांडलेले प्रमेय महत्त्वाचे आहे. त्यांनी पारंपारिक शहाणपणाचे भांडार एकत्रितपणे शोधून त्याचा मानव समाजाच्या समग्र विकासासाठी उपयोग कसा करता येईल यावर भर दिला आहे. भारतीय शिक्षणामध्ये ज्याप्रमाणे भारतीय ज्ञानव्यवस्था आयकेएस विकसित करण्याचा प्रयत्न केला जात आहे, त्याचप्रमाणे सबंध जगामध्ये सुद्धा आपल्या पारंपारिक शहाणपणाचा शोध घेऊन त्याला आधुनिकतेची जोड देण्याची आवश्यकता आहे. तसे झाल्यास मानवी कल्याणाचा मार्ग अधिक सुलभ सुकर आणि सुरळीत होऊ शकेल अशी त्यांची धारणा आहे. त्यांचा हा विचार शतकाच्या पलीकडे डोकावणारा आहे आणि शाश्वत सर्वसमावेशक विकासावर भर देणारा आहे. त्यामुळे त्यांच्या या नवसंकल्पनेचे यथार्थ स्वरूप आपण समजून घेतले पाहिजे. त्यांनी मांडलेल्या सहा प्रस्तावामध्ये प्रामुख्याने पारंपारिक ज्ञानभांडार तसेच इतर पाच कल्पनांचा समावेश आहे. या पाचही कल्पना एकमेकांशी निगडित व जोडलेले आहेत. त्यामुळे त्यांचे परस्पर संतुलन लक्षात घेऊन त्यांनी या कल्पनांचा विकास करण्यावर भर दिला आहे. अलीकडे आफ्रिका आणि आशिया खंडातील दुर्मिळ खनिजावर अमेरिका, चीन, रशिया या बड्या देशांचा मोठा डोळा आहे. खरे तर हे त्या त्या देशांची संपत्ती आहे. त्यांच्या सोन्या, चांदीवर या देशाने अधिकार का गाजवावा तसेच त्यांच्याकडे असलेल्या दुर्मिळ खनिजांची लुटालुट करण्याचा त्यांनी का प्रयत्न करावा हा प्रश्न पडतो. अगदी कांगोसारख्या छोट्या देशांमध्येसुद्धा चीनने तेथील सोन्याच्या खाणीचे कंत्राट विकत घेऊन तेथील साधन सामग्रीची लूट सुरू केली आहे. अनेक आफ्रिकन देश या तथाकथित साम्यवादी महासत्तेच्या आणि भांडवली महासत्तेच्या शोषणाला बळी पडत आहेत. भारताने त्यांच्या नैसर्गिक साधनसामग्रीचे रक्षण करण्यासाठी त्यांच्यामध्ये जागृतीची नवी लाट निर्माण करण्यावर भर दिला आहे. त्यांच्या दुर्मिळ खनिजांचा विकास आणि शोध त्यांनी करावा आणि त्यांचा उपयोग तेथील समाजाच्या कल्याणासाठी करावा पण तसे न करता महासत्ता त्यांची लूट करून त्यांचे शोषण करत आहेत याला काय म्हणावे हा खरा प्रश्न पडतो.

जी २० शिखर परिषदेच्या समारोपाच्या सत्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एआयचा वाढता गैरवापर रोखण्यासाठी जागतिक पातळीवर व्यवस्था विकसित करण्याचे आवाहन केले. पुढील वर्षी भारतामध्ये तिसरी एआय परिषद होत आहे. या परिषदेत येण्याचे निमंत्रणही त्यांनी दिले याबाबतीत त्यांचा दृष्टीकोन पाश्चात्य देशापेक्षा अधिक स्पष्ट वास्तव आणि वस्तुनिष्ठ असल्याचे दिसून येते. हे एआयच्या गैरवापराबाबत जागतिक पातळीवर संपूर्ण कॉम्पॅक्ट व्यवस्था निर्माण करण्याचे त्यांचे धोरण अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतामध्ये पुढील वर्षी होणाऱ्या परिषदेत त्याचा उहापोह व्हावा म्हणून हा मुद्दा मांडला आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या रचना व कार्यपद्धतीत सुधारणा करण्याची गरज आहे, हा मुद्दाही पंतप्रधानांनी त्यांच्या भाषणात मांडला. खरे तर संयुक्त राष्ट्राच्या कार्याचा विस्तार जरूर व्हावा. असा विस्तार हा पर्याय नव्हे तर गरज आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले. संयुक्त राष्ट्र संघाच्या कार्यपद्धतीत बदल करण्याची हीच योग्य वेळ आहे असे त्यांनी सूत्र मांडले आहे. हे खरोखर चिंतनीय आहे आणि विचार करण्यासारखे आहे. आफ्रिकन भूमीवर झालेली ही पहिली जी २० शिखर परिषद होती. या परिषदेस अमेरिकेने अनुपस्थित राहून वाटाण्याच्या अक्षता दाखविल्या असल्या तरी जर्मनी, कॅनडा, इंग्लंड, फ्रान्ससह जगामधील इतर १९ देश यामध्ये प्रामुख्याने उपस्थित होते. जगामध्ये कुठलाही निर्णय हा एका देशाच्या विचाराने नव्हे तर सर्वांच्या कलेने घेतला पाहिजे. ते अमेरिकेला मुळात कळत नाही. ट्रम्प यांच्या एकाकी हुकूमशाही वृत्तीमुळे त्यांनी जी २० मधून अंग काढून घेतले.पण तरीही ही परिषद सुव्यविस्थतपणे पार पडली.

या परिषदेत संमत झालेले ठराव हे अतिशय महत्त्वाचे आहेत. पंतप्रधान मोदी यांनी केलेली तीन भाषणे जगातील ज्वलंत प्रश्नावर प्रकाश टाकणारी आणि जगाच्या डोळ्यात अंजन घालणारी ठरली आहेत. त्यांच्या विचाराचा शोध आणि बोध हेच सांगतो की, आता २० टक्के अर्थव्यवस्थेचा भार असलेल्या अमेरिकेपेक्षाही ८० टक्के व्यवस्था असलेल्या इतर राष्ट्रांच्या मतांना भविष्यात महत्त्व दिले पाहिजे. या दृष्टीने जी-२० परिषदेत संमत झालेल्या ठरावाला विशेष महत्त्व आहे. कारण त्यात जगातील सामान्य माणसांच्या आशा आकांक्षाचे प्रतिबिंब म्हटले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रस्तावित केलेल्या सहा प्रकल्पापैकी पहिला प्रकल्प जागतिक पारंपारिक ज्ञान भांडार स्थापन करणे हा आहे. तसेच त्यामध्ये आफ्रिकन कौशल्य विकास गुणक योजना याद्वारे आफ्रिकेत कौशल्य विकास करण्यावर भर दिला जाणार आहे. तसेच जागतिक आरोग्यसेवा प्रतिसाद यंत्रणा उभी करण्यावर भर दिला जाणार आहे. त्यामुळे आफ्रिकेतील लोकांना आरोग्याच्या सोयीसवलती मिळतील. मादक पदार्थ आणि दहशतवाद यांच्यातील जुगाड कसा टाळता येईल व त्याचा कसा सामना करता येईल याचा विचार करण्यात येत आहे. तसेच खुली उपग्रह डेटा पार्टनरशिप योजना विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. दुर्मिळ खनिजांच्या शोधासाठी व्यापक चक्रांकन योजना विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. अन त्यात पुढाकार घेतला जाणार आहे. या सहा योजनांमुळे आफ्रिकन संघातील देशांना जी २० राष्ट्र मदत करतील असा नरेंद्र मोदी यांचा प्रस्ताव आहे व तो नवे वरदान ठरणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रस्तावित केलेली आफ्रिकेच्या विकासाची सहा कलमी योजना अर्थपूर्ण आहे. त्यातील पहिले कलम हे परंपरी ज्ञान भंडाराच्या उभारणीसाठी पुढाकार घेणारे आहे. त्यामुळे आफ्रिका व आशिया खंडात परस्पर पूर्वक पारंपारिक ज्ञानासाठी सहाय्य करणे शक्य होईल. आफ्रिकन कौशल्य गुणक कार्यक्रम ही दुसरी योजना आहे. त्यानुसार आफ्रिका देशातील सर्व देशांना येथील तरुणांना कौशल्य प्रशिक्षणाचे केंद्र स्थापन करण्यात येईल. व त्या आधारे त्यांना प्रगत तंत्रज्ञानाची माहिती देण्यात येईल. म्हणजे आफ्रिकेतील कौशल्य दुरी स्किल गॅप भरून काढता येईल. आफ्रिकेसाठी जागतिक पातळीवर हेल्थकेअर प्रतिसाद व्यवस्था विकसित केली जाणार आहे. त्यामुळे आफ्रिकन देशातील मलेरिया, एड्स, पिवळा आजार यासारख्या दुर्धर रोगावर तत्काळ उपचार मिळू शकतील. ड्रग्स आणि दहशतवाद यातील जुगाड तोडण्यासाठी आफ्रिकन देश नवी व्यवस्था विकसित करीत आहे. त्यासाठी विविध योजना करण्यात येतील.

### शाश्वत विकासासाठी

शाश्वत मानवी विकासासाठी आपणास भावी पिढ्यांसाठी पाणी, हवा, ऊर्जा, जमीन ही साधने जपून ठेवली पाहिजेत आणि ती नव्या पिढीला हस्तांतरित केली पाहिजेत; पण प्रत्यक्षामध्ये तसे घडत नाही. ज्यांच्याकडे विपुल भांडवलाचा संच आहे. असे देश या साधनसामग्रीचा अधिकाधिक उपयोग करून आपल्या अर्थव्यवस्थेला भक्कम स्वरूप आणून देण्याचा प्रयत्न करतात.आणि ते छोट्या विकसनशील देशांचे शोषण करतात. या देशांवर लादला जाणारा प्रचंड कर्जाचा बोजा आणि कर्ज वसुलीची चक्रवाढ व्याज पद्धतीची तंत्रे म्हणजे हे मोठे देश जणूकाही एखाद्या सावकाराप्रमाणे वाटतात. त्यामुळे दक्षिणेकडील देशांची कर्ज परतफेडीची नवी व्यवस्था विकसित करणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांचे शोषण थांबू शकते. आणि तेथील निधी त्यांच्या देशाच्या विकासासाठी वापरला जाऊ शकतो. ज्याला आपण सर्वसमावेशक विकास म्हणतो. अशा विकासाचा सामान्य माणूस हा केंद्रबिंदू असतो आणि सामान्य माणसाच्या आर्थिक सांस्कृतिक तसेच आरोग्य विषयक गरजा पूर्ण करण्यासाठी एक नवी व्यवस्था विकसित करणे आवश्यक आहे. त्यामुळे जी २० राष्ट्रांनी आरोग्य प्रतिसाद यंत्रणा विकसित करण्याचा विचार सुद्धा पंतप्रधान मोदींनी मांडला आहे तो अत्यंत महत्त्वाचा आहे.भारत याबाबतीत नुसते सिद्धांत सांगत नाही तर जगातील १५० पेक्षा अधिक देशांना कोव्हिड काळामध्ये भारताने मोफत लस पुरविली आहे आणि त्यामुळे अधिकाधिक लोकांचे कल्याण करण्याचा प्रयत्न केला आहे.

### जी २० घोषणापत्र

जोहान्सबर्ग येथे संमत झालेले जी २० घोषणापत्र हे अमेरिकेसारख्या राष्ट्राचा विरोध असूनही इतर सर्व राष्ट्रांनी एकमताने संमत केले आहे. त्यामुळे एकाकी पडलेल्या अमेरिकेची मोठी पंचायत झाली आहे. त्यांना भविष्य काळामध्ये त्यांच्या चुका दिसतील आणि त्यांना सुद्धा सुधारणा करण्याचे महत्त्व लक्षात येईल. कारण जगामध्ये लोकशाही जगवावयाची असेल तर सामाजिक आणि आर्थिक विकासाचे अंतर भरून काढणे तेवढेच महत्त्वाचे आहे. बड्या राष्ट्रांनी पर्यावरणाचा अवाच्या सव्वा उपयोग केला आणि आता ते विकसनशील देशांना वेठीस धरत आहेत. खरे तर या पर्यावरणाचा विनाश केल्याबद्दल त्यांनी आणखी किंमत मोजली पाहिजे आणि हवामान बदलाच्या काळात विकसनशील देशांच्या मदतीसाठी त्यांनी अधिकचा निधी दिला पाहिजे. ब्राझीलमध्ये झालेल्या जागतिक हवामान परिषदेत आता कुठे त्यांचे डोळे उघडत आहेत ही एक चांगली गोष्ट आहे परंतु प्रश्न अनेक आहेत, उपाय मात्र कमी आहेत हे लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणातून जी २० सदस्य राष्ट्रांमध्ये एक नवी जागृती घडून आणली आहे.

### आफ्रिकेतील नवे प्रवाह

दक्षिण आफ्रिकेच्या जोहान्सबर्गमध्ये झालेल्या परिषदेत सबंध आफ्रिका खंडात विकासाचे नवे वारे वाहत आहे.आता आफ्रिकन युनियनच्या अध्यक्षपदी अंगोलाची निवड झाली आहे आणि भारत आणि अंगोला यांच्यातील संबंध सुधारले आहेत. भारताच्या राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांनी नुकताच अंगोलाचा दौरा केला आणि जी २० परिषदेत आफ्रिकन युनियनचे अध्यक्ष हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटले यावरून असे दिसते की आफ्रिकेच्या सर्वांगीण विकासामध्ये भारत पूर्वी खारीचा वाटा उचलत असे, आता भारत आफ्रिकेच्या विकासात सिंहाचा वाटा उचलण्यासाठी पुढे आला आहे. ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. छोट्या विकसनशील राष्ट्रांची कोंडी करण्यात मोठ्या देशांना धन्यता वाटते.हे देश त्यांचे शोषणही करतात, आणि त्यांना पायदळी तुडवितात. त्यामुळे दक्षिणेकडील सर्व देशांना एकत्र करून त्यांचे नेतृत्व करण्याचा भारत प्रयत्न करत आहे. आजवर दक्षिणेकडील देशांच्या झालेल्या तीन परिषदेमध्ये भारताने हेच प्रामुख्याने नमूद केले आहे, की दक्षिणेकडील देशाने त्यांच्या सामाजिक. आर्थिक सांस्कृतिक, शैक्षणिक विकासासाठी एकत्र येऊन सामुदायिक लढाईची व्युहरचना केली पाहिजे. ही व्युह रचना करण्यासाठी भारताने दिलेले सहा विकास उपक्रम म्हणजे विकासाचे सहा स्तंभ आहेत. हे स्तंभ जसे मजबूत होतील तशी विकासाची प्रक्रिया अधिक गतिमान होऊ शकेल. या दृष्टीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडलेला सिद्धांत अत्यंत महत्त्वाचा आहे तो सबंध तिसऱ्या जगातील देशांमध्ये एक सर्व विकासाचे वारे आणणार आहे.

**■ प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर**
आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे अभ्यासक

● लक्षवेधी

## पाऊल गरजेचेच; पण...

गेल्या काही दिवसांत अनोळखी क्रमांकांवरून येणाऱ्या फोन कॉल्समुळे त्रस्त असलेल्या मोबाईल ग्राहकांची समस्या अधिकच गुंतागुंतीची बनली आहे. कारण सुरुवातीला केवळ अनावश्यक उत्पादने व सेवांच्या विक्रीसाठीचे प्रस्ताव वाटणारी ही गोष्ट अलीकडील काळात डिजिटल फसवणूक,सायबर गुन्हेगारी आणि संघटित प्रमोशनल कॉल्सच्या मोठ्या जाळ्यात परिवर्तित झाली आहे. स्मार्टफोन वापरणाऱ्यांना लक्ष्य करून होणारे फसवे कॉल्स इतक्या प्रमाणात वाढले आहेत की प्रत्येक अनोळखी कॉलमागे संभाव्य जोखीम दडलेली असते. सर्वसामान्य ग्राहकाला कोणता कॉल माहितीचा आहे आणि कोणता थेट फसवणुकीचा हे समजणेही कठीण होते.

या पार्श्वभूमीवर भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण अर्थात ट्रायने गेल्या वर्षभरात अनावश्यक, स्पॅम आणि फसवणूक करणाऱ्या कॉल्सवर कठोर कारवाई करत एकूण २१ लाख मोबाईल क्रमांक बंद केले किंवा काळ्या यादीत टाकले आहे. हे निश्चितच स्वागतार्ह पाऊल आहे. परंतु या समस्येची मुळे अधिक खोल आहेत. कारण अशा प्रकारचे कॉल करणाऱ्यांनी लोकांना गंडा घालण्यासाठी नवनवे मार्ग शोधले आहेत.कोणी एक क्रमांक ब्लॉक केला तरी दुसऱ्या क्रमांकावरून तसाच कॉल येतो आणि ही प्रक्रिया सतत सुरूच राहते. त्यामुळे केवळ मोबाईल क्रमांक बंद करणे किंवा काळ्या यादीत टाकणे हे पुरेसे उपाय राहिलेले नाहीत.

आज सर्वाधिक आवश्यकता आहे ती अशा सशक्त तंत्रज्ञान व्यवस्थेची, जी



अनावश्यक व्यावसायिक कॉल्सपासून ते डिजिटल फसवणूक, डिजिटल अरेस्ट आणि सायबर गुन्ह्यांच्या संपूर्ण जाळ्यापासून ग्राहकांचे सक्रिय संरक्षण करू शकेल. या समस्येवर नियंत्रण ठेवणे ही केवळ नियामक संस्थेची जबाबदारी नसून दूरसंचार कंपन्या, सरकारी यंत्रणा, वित्तीय संस्थांपासून ते ग्राहकांनी स्वतःही सतर्क राहण्यापर्यंत सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. कारण सायबर गुन्हेगारांची पद्धत जितक्या वेगाने बदलते, तितक्या वेगाने संरक्षण यंत्रणाही बदलावी लागते. ग्राहकांनी अनोळखी कॉल्सना वैयक्तिक माहिती देऊ नये, बँक-संबंधित माहितीवर फोनवर विश्वास ठेवू नये आणि संशयास्पद कॉल्सची तक्रार तातडीने नोंदवावी हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

● यशोगाथा

## आर्थिक स्वावलंबनाची मधाळ कहाणी

आजच्या काळात महिला प्रत्येक क्षेत्रात आपली मजबूत ओळख निर्माण करत आहेत. शिक्षण, नोकरी आणि उद्योगधंद्याबरोबरच आता ग्रामीण भागातील महिला देखील स्वावलंबनाचा नवा मार्ग शोधत आहेत. महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील सुलेवाडी या छोट्याशा गावातील रोहिणी प्रकाश पाटील यांनीही स्वावलंबनाचा ध्यास घेतला आणि स्वकर्तृत्वाने लखपती बनल्या.

रोहिणी यांनी घरगुती जबाबदाऱ्या आणि शेतीकाम यापलीकडे जाऊन स्वतःची एक स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. एका वृत्तपत्रातील जाहिरातीमुळे त्यांचे आयुष्य पालटल्याचे त्या सांगतात. मधमाशा पालनाचा व्यवसाय सुरू करण्यापूर्वी रोहिणी यांनी आपल्या गावातील ३५ महिलांचा एक गट तयार केला आणि महाबळेश्वर येथे पाच दिवसांचे विशेष प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षणानंतर त्यांनी मधमाशा पालनाचा उद्योग सुरू करण्याचा निर्णय घेतला.



एप्रिल २०१४ मध्ये रोहिणीने खादी ग्रामोद्योग प्रशिक्षण संस्थेतून मधमाशा पालनाचे प्रशिक्षण घेतले. गावातील इतर महिलांसोबत तिने मधमाशांची देखभाल आणि मध काढण्याच्या तंत्रज्ञानाचे बारकावे शिकली. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर १५ महिलांनी मिळून प्रत्येकी ५,००० रुपये गुंतवून एक स्वयं-साहाय्य गट स्थापन केला. मात्र, काही महिन्यांतच हा गट विखुरला. इतर महिलांचे पैसे परत दिल्यानंतर रोहिणी यांनी एकटीनेच पुढे जाण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्यांच्याकडे भांडवल नसल्यामुळे स्वतःचे दागिने गहाण ठेवून दीड लाख रुपयांचे कर्ज घेतले आणि २०१७ मध्ये ३५ मधमाशा पेट्यांपासून स्वतःचा व्यवसाय सुरू केला.

व्यवसाय सुरू होताच रोहिणींसमोर अनेक अडचणी उभ्या राहिल्या. त्यांनी घेतलेल्या पेट्यांमधून मधमाशा उडून गेल्या. पहिल्याच हंगामात तिला ३५ पेट्यांमधून फक्त ८० किलो मध मिळाला. तो त्यांना ६०० रुपये प्रति किलो दराने विकावा लागला. तरीसुद्धा रोहिणी यांनी हार मानली नाही. प्रशिक्षणातून शिकलेल्या तंत्राचा वापर करून त्यांनी नवीन पेट्यांमध्ये मधमाशा पुन्हा बसवल्या आणि उद्योग पुढे नेला. यानंतर 'फॉरेस्ट हनी' या नावाने स्वतःचा ब्रँड लॉन्च केला.

रोहिणी या मधमाशांच्या पेट्या कोयना धरणाजवळील पश्चिम घाटातील जैवविविधतेने नटलेल्या जंगलात ठेवतात. त्यामुळे त्यांच्या मधात नैसर्गिक आणि औषधी गुणधर्म अधिक असतात असे त्या सांगतात. आज त्यांच्याकडे ११२ मधमाशा पेट्या आहेत आणि दरवर्षी ८८० ते ९०० किलो मध तयार होतो. हा ऑर्गेनिक मध १,२०० रुपये प्रति किलो या दराने थेट ग्राहकांना विकतात. त्यांच्या उत्पादनाला एवढी मागणी आहे की त्यांना ना घाऊक व्यापाऱ्यांपर्यंत, ना किरकोळ बाजारात जाण्याची गरज भासते. ग्राहक स्वतः घरी येऊन मध खरेदी करतात. तसेच त्या शेतकऱ्यांना परागण (पोलिनेशन) सेवांसाठी मधमाशांच्या पेट्या ७,५०० रुपयांना विकतात आणि त्यातूनही चांगली कमाई करतात.

● प्रासंगिक

## ६२,०७,९१,९१,७९० रुपयांचे दान

अॅमेझॉनचे संस्थापक जेफ बेझोस यांच्या माजी पत्नी मॅकेंझी स्कॉट यांनी तब्बल ७०० दशलक्ष डॉलर्सचे (सुमारे ६२, ०७, ९१, ९१, ७९० रुपये) अविश्वसनीय दान जाहीर करून सर्वांना आश्चर्यचकित केले आहे. त्यांनी ही प्रचंड रक्कम अमेरिकेतील अश्वेत महाविद्यालये आणि विद्यापीठांच्या समूहाला दिली असून, त्यामुळे उच्च शिक्षणाला मोठी मदत मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.या क्षेत्रात आजपर्यंत झालेले हे सर्वात मोठे सामूहिक दान मानले जात आहे. मॅकेंझी स्कॉट यांनी हे दान २०१९ मध्ये जेफ बेझोस यांच्यासोबत झालेल्या घटस्फोटानंतर मिळालेल्या संपत्तीतून दिले असून, त्या करारातून त्यांना अॅमेझॉनमधील अब्जावधी डॉलर्सची मोठी हिस्सेदारी प्राप्त झाली होती.





अश्वेत उच्च शिक्षण संस्थांसाठी स्कॉट यांनी दिलेले हे दान एक परिवर्तनकारी टप्पा मानला जात आहे. अनेक दशकांपासून मर्यादित साधने, कमी गुंतवणूक आणि आर्थिक अडचणींना सामोरे जाणाऱ्या अनेक एचबीसीयू संस्थांना याचा मोठा आधार मिळणार आहे. हावर्ड विद्यापीठ, बॉवी स्टेट विद्यापीठ, प्रेयरी व्ह्यू अच् विद्यापीठ आणि फिलेंडर स्मिथ विद्यापीठ यांसारख्या संस्थांनी स्कॉट यांचे दान अधिकृतरीत्या स्वीकारले असून त्याला ऐतिहासिक निर्णय म्हणले आहे.

या संस्थांच्या प्रमुखांनी सांगितले की, स्कॉट यांनी दिलेले दान कोणत्याही अटी-शर्तींशिवाय दिले गेले असल्याने ते अत्यंत परिवर्तनकारी ठरते. या निधीमुळे शैक्षणिक कार्यक्रमांचा विस्तार, नवीन शिष्यवृत्ती, जुनी पायाभूत सुविधा सुधारण्याचे काम, तसेच दैनंदिन नोंदी आणि प्रशासनिक मर्यादांशिवाय संशोधनात गुंतवणूक करता येणार आहे. हावर्ड विद्यापीठाचे अध्यक्ष वेन ए. आय. फ्रेडरिक यांनी जाहीर केलेल्या ८० दशलक्ष डॉलर्सच्या दानाबद्दल बोलताना सांगितले की, ही मदत अशा संस्थांवर असलेल्या दीर्घकालीन विश्वासाचे प्रतिक आहे, ज्या अत्यंत कमी संसाधनांमध्येही उच्च दर्जाची प्रगती साधत आल्या आहेत.

स्कॉट यांनी एवढ्या मोठ्या प्रमाणावर दान देण्याची क्षमता त्यांना २०१९ मधील घटस्फोटातून मिळाली, ज्यामध्ये बेझोस यांच्या अॅमेझॉन शेअर्सचा मोठा हिस्सा त्यांना मिळाला होता.या शेअर्सचे मूल्य बाजारानुसार बदलत गेले, पण विश्लेषकांच्या अंदाजानुसार या करारामुळे त्यांना अनेक अब्ज डॉलर्सची संपत्ती प्राप्त झाली. नंतर त्यांनी आपली बहुतांश संपत्ती दान करण्याचा संकल्प जाहीर केला आणि मागील दशकातील सर्वात व्यापक व धाडसी परोपकारी उपक्रमांपैकी एक सुरू केला. स्कॉट यांच्या परोपकारी मंचाच्या नोंदीनुसार, त्यांनी २०१९ पासून आजपर्यंत जवळपास १९ अब्ज डॉलर्सचे दान हजारो संस्थांना दिले असून, यात आर्थिक विषमता, वांशिक अन्याय आणि दीर्घकालीन निधीअभावाचा सामना करणाऱ्या समुदायांचा विशेष समावेश आहे.त्यांची दान करण्याची पद्धत पारंपरिक अब्जाधीशांपेक्षा वेगळी आहे, कारण त्या कठोर अटी, विस्तृत लेखापरीक्षण किंवा गुंतागुंतीच्या अहवाल प्रणाली टाळतात.

**खालील विद्यापीठांना हे दान मिळाले आहे:**

हावर्ड विद्यापीठ, प्रेयरी व्ह्यू अच् विद्यापीठ, मॉर्गन स्टेट विद्यापीठ, नॉर्थ कॅरोलिना अढ स्टेट विद्यापीठ, बॉवी स्टेट विद्यापीठ, नॉरफॉक स्टेट विद्यापीठ, विंस्टन-सलेम स्टेट विद्यापीठ, व्हर्जिनिया स्टेट विद्यापीठ, अल्कॉर्न स्टेट विद्यापीठ, अलाबामा स्टेट विद्यापीठ, क्लार्क अटलांटा विद्यापीठ, स्पेलमन कॉलेज, मेरीलँड ईस्टर्न शोअर विद्यापीठ, वूरहीस विद्यापीठ आणि फिलेंडर स्मिथ विद्यापीठ. या संस्थांपैकी अनेकांनी जाहीर केले की,स्कॉट यांचे दान त्यांच्या इतिहासातील सर्वात मोठ्या मदतनिधींपैकी एक आहे.

**- अपर्णा देवकर**

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)





**रविवार ता.३०.११.२०२५**,विक्रमसंवत २०८२, शिवशक ३५२, शालिवहन शके १९४७, विश्वावसुनाम संवत्सरे दक्षिणायणे, मार्गशीर्ष मासे,हेमंत ऋतो,शुक्ल पक्षे,दशमी तिथी, २९१.३० नंतर एकादशी तिथी, उत्तराभाद्रपदा नक्षत्र २५.११ नंतर रेवती नक्षत्र, मीन रास, वज्रयोग, ७.१३ नंतर, सिद्धीयोग २८.२२ पर्यंत, तैतिल करण, १०.२९ नंतर गरज करण २१.३० पर्यंत,दिनमान ११.०५, सुर्योदय ६.४९, सुर्यास्त १७.५४ (कोल्हापूरचे) राहूकाळ सायं ४.३० ते ६, मध्यम दिवस, वस्त्रधारण, खळे करणे, व्यापार, नविन दुकान घालण्यास, धान्य कापणी, घाणा मोट सुरू करणे, ओटी भरणेस, कुंपनलिका.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## * राशीभविष्य

**मेष-** मोकळ्या वेळेचा उपयोग करून कुटूंबातील सदस्यांना मदत करा. तुमच्या प्रेमाच्या वाटेला आज एक नवे सुंदर वळण मिळणार आहे.

**वृषभ-** आणखी आशावादी राहण्यासाठी स्वत:ला प्रवृत्त करा. नव्या आर्थिक करारांना अंतिम स्वरुप मिळाल्यामुळे ताजा अर्थपुरवठा होईल.

**मिथून-** स्वत:ला सिद्ध कराल. पूर्वार्धातील कामात यश मिळेल.उत्तरार्धात मन उदास बनेल.नोकरीत अडचणी राहतील. महत्वाकांक्षी व खर्चीक बनाल. जोडीदाराची काळजी घ्या.

**कर्क-** तुमची ऊर्जा पातळी खूप उच्च असेल. स्थावर जंगम मालमत्ता गुंतवणूक लाभदायी ठरेल. तुमचे जोडीदार/भागीदार तुम्हाला पाठिंबा देतील आणि मदतही करतील.

**सिंह-** आशा आकांक्षा सोडू नका, अपयश हे नैसर्गिक आहे, किंबहुना आयुष्याचे तेच खरे सौंदर्य आहे. आपला रिकामा वेळ आपल्या आईच्या सेवेमध्ये घालवण्याची इच्छा ठेवाल.

**कन्या-** नवीन संपर्क आणि व्यवसाय विस्तार होण्यासाठी केलेले प्रवास फलदायी ठरतील. अशा लोकांसोबत मेळ वाढवू नका ज्यांच्यासोबत तुमची वेळ खराब होऊ शकते.

**तुळ-** नवीन ग्राहकांशी वाटाघाटी करण्यासाठी उत्तम दिवस आहे. प्रवासासाठी आजचा दिवस फार काही चांगला नाही. पण तुमच्या वैवाहिक आयुष्यातील एक उत्तम दिवस आहे.

**वृश्चिक-** विचार न करता कुणाला ही आपला पैसा देऊ नका तुम्हाला येणाऱ्या काळात मोठी समस्या येऊ शकते. पूवर्जांच्या संपत्तीचे उत्तराधिकारी होण्याची बातमी कुटुंबाला आनंद देईल.

**धनु-** सामाजिक तसेच धार्मिक कार्यक्रमांसाठी उत्तम दिवस आहे. तुम्हाला येणाऱ्या काळात मोठी समस्या येऊ शकते. आपला काही वेळ इतरांना देण्यासाठी चांगला दिवस.

**मकर-** दूरवर राहणारे नातेवाईक आज तुमच्याशी संपर्क साधतील. अनपेक्षित स्रोतांकडून महत्वाची आमंत्रणे मिळतील. कामानिमित्त प्रवास घडेल.

**कुंभ-** आरोग्याच्या दृष्टीने अतिशय चांगला दिवस. तुमचे उल्हासित मन तुम्हाला योग्य ती ऊर्जा पुरवेल आणि आपणास आत्मविश्वास मिळवून देईल.

**मीन-** कुटुंबातील कुणी सदस्यांच्या आजारी पडण्यामुळे तुम्हाला आर्थिक चिंता येऊ शकते. तथापि, यावेळी तुम्हाला धनापेक्षा जास्त त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् अॅन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.* कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.



श्रीदत्त जयंती निमित्ताने श्रीदत्त देवस्थान मठ, श्रीक्षेत्र आडी येथे

# परमाब्धिविचार महोत्सव विशेष








## ।। जय परेश सर्वायण ।।




**श्रीदत्त क्षेत्र, आडी (ता. निपाणी, जि. बेळगांवी (कर्नाटक) येथील संजीवनगिरी डोंगरावरील श्री दत्त देवस्थान मठाचे सर्वेसर्वा परमाब्धिकार प. पू. परमात्मराज महाराज यांच्या प्रेरणेने बुधवार २६ नोव्हेंबर ते गुरुवार ४ डिसेंबर २०२५ अखेर परमाब्धिविचार महोत्सवाचे आयोजन केलेले आहे. हा दिव्य महोत्सव देशभरातील साधू, संत, सकल विविध क्षेत्रातील नामवंत व लाखो भाविक जणांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे. या निमित्त प. पू. परमात्मराज महाराज यांनी लिहिलेल्या वैश्विक धर्मग्रंथ परमाब्धिसह या तीर्थक्षेत्रामधील महत्त्वपूर्ण घटक विषयांचा थोडक्यात घेतलेला आढावा...**

हार्दायन, श्रीदत्त देवस्थान मठ, श्रीक्षेत्र आडी या पवित्र अशा दिव्य तीर्थक्षेत्री श्रीदत्त जयंती निमित्त, परमाब्धिविचार महोत्सव संपन्न होत आहे. या पर्वकाळात प्रवचन, श्री गुरुचरित्र व वैश्विक धर्मग्रंथ परमाब्धि पारायण, नामजप, भजन, महाप्रसाद इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन केलेले आहे. या दिव्य महोत्सवानुषंगाने प. पू. परमात्मराज महाराज यांचे परमाब्धिः या ग्रंथाविषयी परमज्ञानबोधात्मक विचार भाविकांना ऐकायला मिळतात. असंख्य भाविक जण ग्रंथमहत्ता समजून घेऊन, विशेषतः जाणून घेऊन मार्गदर्शन मिळवित असतात. सुसंस्कारांचा, विश्वजनकल्याण हेतूसाठी असलेल्या शाश्वत ज्ञानामृत महाप्रसादाचा लाभ घेतात.

परमाब्धि या वैश्विक धर्मग्रंथाविषयी किती व कसा गौरव करावा, किती प्रशंसा, महत्ता गावी तेवढी अपुरीच राहील. अशी या वैश्विक धर्मग्रंथाची सकल क्षेत्रीय परिपूर्ण ज्ञानव्यापकता आहे. या वैश्विक धर्मग्रंथामधील सर्व धर्मग्रंथसार समजून घ्यावे, सर्वसमावेशक, व्यापक व सुसमन्वयक, नित्यनूतन असलेले ज्ञानविचार जाणून घ्यावेत. सगळे तत्त्वसिद्धांत कळून घ्यावेत. हे परम एकत्वाने ओतप्रोत भरलेले विचार ग्रंथातील प्रत्येक महाश्लोकामध्ये पाहायला मिळतात. या ग्रंथामधील विचार, आचारांमुळे धर्मांध, पथांध, सांप्रदायिक वादविवादाचे निरसन होते, अनिष्ट, विघातक, हिंसक विचार मनोवृत्तींचे समूळ उच्चाटन होते. समस्त विश्वजनसमुदायासाठी हे हितावह आहे. हृदयामध्ये प्रेम, दया, शांती, सौहार्द इ. भावनांची बीजे स्थापित होऊन वृद्धिंगत होतात. यामुळे सकल जगतामध्ये कल्याणमय, मानवतावादाचे नंदनवन बहरलेले पाहायला मिळेल या ग्रंथाला आतापर्यंत देशभरातून मिळालेला प्रचंड प्रतिसाद, सर्वधर्मजातिपंथमान्य समुदायांकडून झालेला स्वीकार, सकल क्षेत्रीय स्तरातून झालेला गौरव, या ग्रंथप्रसारास प्रसार शुभेच्छुक अभिप्राय, लेख यावरून या ग्रंथाची महत्ता, विशेषता, काळाची गरज याची जाणीव होते.

प.पू.परमात्मराज महाराजांनी हा वैश्विक धर्मग्रंथ मूळ संस्कृत भाषेत लिहिलेला असून सकल भाविक जणांना समजण्यासाठी याचा मराठी व हिंदी भाषेमध्ये स्वतः अनुवाद केलेला आहे. या ग्रंथ मूळ उद्देशाविषयी विस्तृत बोध होण्यासाठी या ग्रंथाला पूरक असे सत्पोष, महोत्रय, वर्तेट, रस्याव, तन्वास, शिप्रोत, चेयान इत्यादी परमज्ञान साहित्यसंपदा समस्त मानव जातीच्या कल्याणहेतूसाठी प.पू.परमात्मराज महाराजांनी लिहिलेली आहे.




**प. पू. परमात्मराज महाराज लिखित ग्रंथसंपदा**

**भाविक भावना अंक : २००५ ते २०१५**

परमाब्धिः या वैश्विक धर्मग्रंथाविषयी अनेकानेक विविध क्षेत्रातील मान्यवरांचे साडे तीन हजाराहून अधिक गौरवपर, प्रशंसापर, ग्रंथ प्रसार शुभेच्छुक असे अभिप्राय आले आहेत. परमपूज्य परमात्मराज महाराज यांचा गौरव, अनेक भाविकांचे पारमार्थिक, व्यावहारिक अनुभव, भक्तिभावगीते इत्यादी या अंकांमध्ये पाहायला मिळतात. यावरूनच परमाब्धि या वैश्विक ग्रंथाचे शाश्वत, अलौकिक, परिपूर्ण परमज्ञान कळून येते. परमाब्धीतील सर्वोत्तम, सर्वव्यापक, परमसमन्वयक बोधाचे स्वरूप दर्शन घडते. या ग्रंथाद्वारे वैश्विक धर्मसंस्थापना झालेली पाहायला मिळते.

**राजकीय क्षेत्रातील मान्यवरांद्वारे झालेला गौरव**

माजी पंतप्रधान एच.डी.देवगौडा, माजी उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी, राष्ट्रीय काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे इत्यादी सर्वच राष्ट्रीय पक्षातील दिग्गज मान्यवरांनी या परमाब्धिः ग्रंथाचे आत्यंतिक माहात्म्य गायिले आहे. परमाब्धिः या वैश्विक धर्मग्रंथाविषयी व प. पू. परमात्मराज महाराज यांच्या विषयी विशेष गौरव या अंकांमध्ये पाहायला मिळतो.

**इतर क्षेत्रातील दिग्गज व अनेक मान्यवरांकडून झालेला गौरव**

भारतरत्न पंडित भीमसेन जोशी, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर व इतरही अनेक शास्त्रज्ञ, अनेकानेक जातिधर्मपंथांच्या मठांचे मठाधिपती, महंत, विविध विद्यापीठांचे कुलगुरू, अनेक साहित्य, क्रीडा क्षेत्रातील दिग्गजांच्याकडून परमाब्धिः या वैश्विक धर्म ग्रंथाची मुक्तकंठाने केलेली प्रशंसा, गौरव या अंकांमध्ये दिसून येतो.

भाविक भावना अंक २००५ ते २०१५ मधील विशेष अभिप्राय लेख, अनुभव,भक्तीभावगीते इत्यादी हे संमिश्रित होते. पण आता परमपूज्य परमात्मराज महाराजांच्या मार्गदर्शनाखाली हे सर्व वेगवेगळे 'सन्निश्चय' या नऊ संपुट ग्रंथ स्वरूपात आपणा सर्व भाविक जणांना पाहायला मिळणार आहेत.

परमपूज्य परमात्मराज महाराज यांच्या या ग्रंथ साहित्यसंपदांचा, महान कार्याचा अधिक गतिदायक प्रसार होण्यासाठी कालानुसुसंगत, अद्ययावत तंत्रज्ञान, सोशल मीडिया माध्यमांचाही वापर होत आहे. यामध्ये 'सद्भाव युट्यूब चॅनेल' अंतर्गत छोटे-मोठे मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत महत्त्वपूर्ण परमज्ञान बोधात्मक परमपूज्य परमात्मराज महाराजांचे व्हिडिओ पाहायला मिळतात. जवळपास एकोणीस हजार भाविकांचा सहभाग असलेल्या 'श्रीदत्त क्षेत्र आडी, नांवाच्या व्हाट्स ॲप ग्रुप्स' मध्ये अनेक भाविकभक्तांचे व्यावहारिक, पारमार्थिक फलप्राप्तीचे अनुभव तसेच परमपूज्य महाराजांच्या ग्रंथांविषयीचे अभिप्राय पहायला मिळतात. याचबरोबर आध्यात्मिक व या तीर्थक्षेत्रावरील कार्यक्रम सण, उत्सवपूरक संबंधीत विशेष ज्ञान, माहिती प्रसारित केली जात असते. यासोबतच श्रीदत्त देवस्थान मधील वेबसाईट पुढील प्रमाणे:

1. https://paramatmarajmaharaj.com
2. https://www.paramatmaraj.com
3. https://hardayan.com

या महत्त्वपूर्ण वेबसाईट्सवर आपणाला या श्री तीर्थक्षेत्राविषयी, परमपूज्य परमात्मराज महाराजांविषयी, महाराजांच्या परमज्ञान साहित्यसंपदेविषयी विशेष, महत्त्वपूर्ण, उपयुक्त ज्ञान, माहिती पाहायला मिळते.

**सार्वजनिक उपक्रम आणि प्रवचने**

डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या सांस्कृतिक भवनात दर पौर्णिमेला रात्री ७.३० वाजता प. पू. महाराजांचे प्रवचन होत असते. प्रवचनानंतर हजारोंच्या संख्येने आलेल्या भक्तांना महाप्रसादाचे वितरण केले जाते. तसेच दरवर्षी प. पू. परमात्मराज महाराज यांच्या २० मे या प्रकट दिनानिमित्त १८,१९, २० मे या तीन दिवसांमध्ये परमाब्धिः या वैश्विक धर्मग्रंथाचे पारायण, प्रवचन, नाम, जप, भजन, महाप्रसादाचे इ. आयोजन केले जात असते. तसेच मार्गशिर्ष महिन्यात श्रीदत्त जयंतीच्या निमित्ताने परमाब्धिविचार महोत्सवाचे आयोजन केले जाते. यामध्ये अनेक राज्यांमधील साधुसंत व भाविक भक्तजण लाखोंच्या संख्येने सहभागी होतात.



श्रीदत्तगुरुंचे चरण कमल, आडी.

**परमाब्धिकार प.पू.परमात्मराज महाराज यांचा गौरव**

भाविक भावना अंकांमधून अनेकानेक साधुसंतांनी परमपूज्य परमात्मराज महाराजांचा विश्वधर्मसंस्थापक, अध्यात्मविज्ञान भास्कर, अनंतविद्याविभूषित, वैश्विक सद्गुरू, श्रीदत्त अवतारी, मसीहा, परमतपोनिधी, ज्ञानावतारी विश्वात्मा, परमस्वरुप, विश्ववंदनीय, परमादर्श, जगद्‌गुरु, इत्यादी अनेकानेक उपाधींनी गौरव केलेला पाहायला मिळतो.

प. पू. परमात्मराज महाराजांचे जीवन हे सकल मानव जातीच्या कल्याणासाठी चंदनासारखे झिजून समस्त विश्वजनांना ज्ञानगंध, मोक्ष प्रदायक, परमज्ञानरवि अश्या दिव्य आपल्या साधना, महान जीवन कार्यातून, परमज्ञान साहित्यसंपदा रचनांमधून देत आलेले आहेत. दुर्लभ मानवी जन्माचे महान लक्ष्य स्वतःचे कल्याण करून घेणे हे असते. म्हणून आपण सर्व भाविक जण या परमज्ञान साहित्य संपदांचा शाश्वत आधार घेऊन हे लक्ष्य, हे साध्य... साध्य करूया....!

या ग्रंथ ज्ञानसाहित्यसंपदेचे आपल्या जीवनामध्ये अनुकरण करून याचा समस्त जगतामध्ये व्यापक, प्रभावी प्रसार होण्यासाठी आम्हाला सदोदित कृपादृष्टी बळ मिळावे ही श्रीदत्त जयंती २०२५, ''परमाब्धिविचार महोत्सव'' या निमित्ताने परमाब्धिकार परमपूज्य परमात्मराज महाराज यांच्या चरणी प्रार्थना..अर्चना...!

**संकलन : सुरेश कुंभार, इचलकरंजी**



**आडी येथील श्रीदत्त जयंती सोहळ्यातील एक क्षण. (संग्रहित)**

### सध्या चालू असलेला प्रकल्प : मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल निर्माण कार्य

प्रकल्पाची ओळख आणि बांधकाम प्रगती मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल निर्माण कार्य हार्दायन, श्रीदत्त देवस्थान मठ, श्रीक्षेत्र आडी मार्फत परमात्मराज अधिष्ठान, वंदूर (ता. कागल, जि. कोल्हापूर) या ट्रस्टच्या माध्यमातून वंदूर येथे शंभर बेडचे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल निर्माण कार्य हाती घेतले आहे. येथे भाविकांनी आपल्या परीने आर्थिक स्वरूपात, वस्तूरूपात, श्रमरूपात साहाय्य केले, करीत आहेत. अनेक भाविकांच्या सहयोगातून सुयोग्य वेगाने हे निर्माण कार्य चालू आहे. शंभर बेडकरिता दोन मजले बांधणे आवश्यक होते. ते आता पूर्णत्वास आले आहेत. विविध मशिनरी, इतर उपकरणे व अनेक आवश्यक बाबींसाठीचा खर्च वेगळा आहे. त्यासाठी भाविकांची साथ मिळत आहे. परमात्मराज महाराजांनी धरलेले प्रत्येक कार्य पूर्णत्वास जात असते, असा भाविकांचा विश्वास आहे. कारण, त्यांचे कार्य म्हणजे सर्वजनहितासाठीचे कार्य आहे. भगवान दत्तात्रेयांचा आशीर्वाद त्यांच्या प्रत्येक कार्याला असतो. एखादे कार्य महाराजांनी हाती घेतले की भाविकांच्या मध्ये नवचैतन्य निर्माण होत असते. हजारो हात त्यांच्या कार्यासाठी राबत असतात. कारण त्यांचे कार्य हे जनतेसाठीच आहे.

### पुढे उपलब्ध होणाऱ्या उपचार सुविधा...

इथे ॲलोपॅथीच्या विविध विभागांप्रमाणेच जुनाट आजारांच्या निवारणासाठी होमिओपॅथी व आयुर्वेदिक उपचार विभागही असणार आहेत. त्यामुळे या उपचारांचा लाभ कोल्हापूर, सांगली, बेळगांव, सिंधुदुर्ग आदी अनेक जिल्ह्यांसह इतर भागातील लोकांनाही घेता येऊ शकणार आहे.

येथे अगदी योग्य मोबदल्यात सुयोग्य उपचार समाजातील सर्वच गरजवंतांना मिळतील, हा जनतेचा विश्वास आहे. असेच सर्वांचे सहकार्य लाभून आदरणीय गुरुवर्य परमपूज्य परमात्मराज महाराजांचे हे समाजोपयोगी कार्य लवकरात लवकर पूर्णत्वास जाईल असा सर्व भाविक भक्तांचा पूर्ण विश्वास आहे.

Sadbhav YouTube Channel

श्रीदत्त देवस्थान, आडी

https://paramatmarajmaharaj.com

@SHRI_DATTA_DEVASTHAN_MATHA_ADI

8147871727 / 8197591727

श्रीदत्त जयंतीनिमित्ताने श्रीदत्त देवस्थान मठ, श्रीक्षेत्र आडी येथे सुरु असलेल्या परमाब्धिविचार महोत्सवास हार्दिक शुभेच्छा! व देशभरातून दाखल होणाऱ्या सर्व भाविकांचे सहर्ष स्वागत...!

।। गुरुवर्य ।।



श्री. सागर जगन्नाथ जाधव व जाधव परिवार, इचलकरंजी.

श्री. स्वरुपानंद रणजीत भोसले व भोसले परिवार, निपाणी

कु. हितेश राहूल कुंभार व कुंभार परिवार, इचलकरंजी.







सुल्तान अझलन शाह चषक

# कॅनडाचा पराभव करत भारताचा अंतिम फेरीत प्रवेश

इपोह (मलेशिया),ता.२९ –

**भारतीय पुरुष हॉकी संघाने आपल्या शेवटच्या राउंड–रॉबिन सामन्यात कॅनडाचा १४–३ ने धुव्वा उडवत सुल्तान अझलन शाह चषक २०२५ च्या अंतिम फेरीत दिमाखात प्रवेश केला आहे.**

भारताचा बचावपटू जुगराज सिंग या सामन्यात भारताकडून सर्वाधिक गोल करणारा हॉकीपटू ठरला. त्याने एकूण चार गोल केले. त्यापैकी तीन पेनल्टी कॉर्नरवर आणि एक पेनल्टी स्ट्रोकवर केला. अभिषेक, अमित रोहिदास आणि राजिंदर सिंग यांनीही प्रत्येकी दोन–दोन गोल केले. सेल्वम कार्ती, नीलकांत शर्मा, संजय आणि दिलप्रीत सिंग यांनी प्रत्येकी एक गोल केला.

या शानदार विजयासह भारताने दिवसाच्या उत्तरार्धात सामन्यांचे निकाल काहीही असले तरी पॉइंट्स टेबलमध्ये अव्वल दोनमध्ये स्थान निश्चित केले आहे.

क्रेग फुल्टन यांच्या प्रशिक्षकपदाखालील भारतीय संघाला अंतिम फेरीत बेल्जियमचा सामना करावा लागणार आहे. दरम्यान राउंड–रॉबिन टप्प्यात भारताला बेल्जियमकडूनच एकमेव पराभव स्वीकारावा लागला होता.

बेल्जियम सध्या १० गुणांसह मजबूत स्थानावर आहे आणि शनिवार नंतर सात गुणांसह न्यूझीलंडशी त्यांचा सामना होईल. न्यूझीलंडला अंतिम फेरीत पोहोचण्याची थोडीशी शक्यता आहे. पण त्यांना किमान सहा गोलच्या फरकाने विजय मिळवावा लागणार आहे.

# टीम इंडिया हिशोब चुकता करणार

रांची,ता.२९–

**दक्षिण आफ्रिकेने २५ वर्षांनंतर भारतात कसोटी मालिका जिंकली आणि २–० ने हरवून क्लीन स्वीपही केला. आता दोन्ही संघांमध्ये ३ एकदिवसीय सामन्यांची मालिका ३० नोव्हेंबरपासून रांचीमध्ये सुरू होईल. येथे दिग्गज रोहित शर्मा आणि विराट कोहली परत येतील, त्यांच्या आगमनाने संघ मजबूत होत आहे. भारताला कसोटीत मिळालेल्या लाजिरवाण्या पराभवाचा हिशोब चुकता करण्याची संधीही मिळेल.**

भारताने २०२४ च्या टी–२० विश्वचषक फायनलमध्ये दक्षिण आफ्रिकेलाच ७ धावांनी हरवून विजेतेपद पटकावले होते. टीम इंडियाने चौथ्यांदा मर्यादित षटकांचा विश्वचषक जिंकला, पण दक्षिण आफ्रिकेला पहिल्या विजेतेपदापासून दूर ठेवले. त्या सामन्यानंतर सुमारे दीड वर्षांनी दोन्ही संघ एकमेकांसमोर भिडले. दक्षिण आफ्रिकेने भारताला कसोटी मालिकेत हरवले आणि आपल्या पराभवाचा हिशोब चुकता केला.

दक्षिण आफ्रिकेला भारतात शेवटचा मालिका विजय २००० मध्ये मिळाला होता. त्यानंतर संघाने येथे ५ मालिका खेळल्या, ३ गमावल्या आणि २ अनिर्णित राखल्या. भारताच्या २५ वर्षांच्या या वर्चस्वाला प्रोटियाज संघाने संपवले. आता वनडे मालिकेतील ३ सामने ३० नोव्हेंबर, ३ डिसेंबर आणि ६ डिसेंबर रोजी खेळले जातील. भारत येथे ३–० ने जिंकून कसोटीतील पराभवाच्या जखमांना काही प्रमाणात कमी करू शकतो.





वनडे क्रिकेटमध्ये भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात ५८ सामने खेळले गेले. त्यापैकी २७ मध्ये भारताला आणि ३० मध्ये दक्षिण आफ्रिकेला विजय मिळाला. या काळात एक सामना अनिर्णित राहिला. भारत आता ३–० ने जिंकून हेड–टू–हेडमध्ये दक्षिण आफ्रिकेचे वर्चस्व संपुष्टात आणू शकतो. क्लीन स्वीपमुळे वनडेमध्ये दोन्ही संघांच्या विजया–पराभवाचा विक्रम बरोबरीत येईल. मालिकांच्या बाबतीत मात्र, टीम इंडियाचे पारडे जड आहे. दोन्ही संघांमध्ये आतापर्यंत १५ वनडे मालिका खेळल्या गेल्या. त्यापैकी ६ मध्ये दक्षिण आफ्रिकेला आणि ८ मध्ये भारताला विजय मिळाला. २००५ मध्ये एक मालिका ड्रॉ देखील झाली होती. दोन्ही संघांनी २०२३ मध्ये शेवटची वनडे मालिका खेळली होती, जी भारताने २–१ ने जिंकली होती.

भारतात दोन्ही संघांनी २४ एकदिवसीय सामने खेळले, ज्यात भारताने १४ आणि दक्षिण आफ्रिकेने १० सामने जिंकले. मात्र, मालिका विजयात टीम इंडिया खूप पुढे आहे. भारतात दोघांनी ७ मालिका खेळल्या, ज्यात भारताने ५ आणि दक्षिण आफ्रिकेने केवळ १ मालिका जिंकली. एक मालिका अनिर्णित राहिली. दक्षिण आफ्रिकेला एकमेव मालिका विजय २०१५ मध्ये मिळाला होता, तेव्हा एबी डिव्हिलियर्सच्या नेतृत्वाखाली संघाने ५ एकदिवसीय सामन्यांची मालिका ३–२ ने जिंकली होती.

वनडे मालिकेत टीम इंडिया नियमित कर्णधार शुभमन गिल, उपकर्णधार फलंदाज श्रेयस अय्यर आणि वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह यांच्याशिवाय मैदानात उतरणार आहे. मात्र, रोहित आणि कोहली संघात असल्याने संघ मजबूत दिसत आहे. यष्टीरक्षक केएल राहुल भारताचे कर्णधारपद भूषवणार आहे. हे तिन्ही खेळाडू भारतात खूप धावा करतात, तसेच ते सर्व आयसीसीच्या वनडे फलंदाजांच्या क्रमवारीत टॉप–२० मध्ये आहेत.

भारतात विराट कोहलीपेक्षा जास्त वनडे शतके कोणत्याही खेळाडूने केलेली नाहीत, त्याने २४ शतके ठोकून सचिन तेंडुलकरलाही मागे टाकले आहे. सचिनच्या नावावर २० शतके आहेत. या विक्रमात तिसऱ्या क्रमांकावर माजी कर्णधार रोहित शर्मा आहे, ज्याच्या नावावर १४ शतके आहेत. कोहली भारतात दुसरा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू देखील आहे, तो सचिनचा विक्रम मोडण्यापासून ६५२ धावा दूर आहे.

भारताने याच वर्षी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या वनडे मालिकेतून २०२७ मध्ये होणाऱ्या वर्ल्ड कपची तयारी सुरू केली. संघ तिथे मालिका २–१ ने हरला, पण कोहली आणि रोहितने आपला फॉर्म सिद्ध केला. कोहलीने फिफ्टी मारली, तर रोहित मालिकावीर ठरला.

दक्षिण आफ्रिका मालिका धरून वर्ल्ड कपपर्यंत भारताला २१ वनडे सामने खेळायचे आहेत. याच सामन्यांमधून संघाला आपले प्लेइंग कॉम्बिनेशनही निश्चित करायचे आहे. शुभमन, श्रेयस आणि बुमराह संघात नाहीत. अशा परिस्थितीत मालिकेतून संघाला आपले बॅकअप खेळाडू तयार करण्याची संधी आहे.

# भारतीय महिला संघ पुढील महिन्यात श्रीलंकेविरुद्ध टी–२० सामने खेळणार

नवी दिल्ली, ता.२९–

**महिला एकदिवसीय विश्वचषक जिंकून नुकताच इतिहास रचल्यानंतर, भारतीय महिला क्रिकेट संघ पुन्हा मैदानात उतरण्यास सज्ज झाला आहे. टीम इंडिया श्रीलंकेविरुद्ध पाच सामन्यांची टी–२० आंतरराष्ट्रीय मालिका खेळणार आहे. ही मालिका २१ डिसेंबरपासून विशाखापट्टणममध्ये सुरू होत आहे.**

भारत सुरुवातीला बांगलादेशविरुद्ध तीन एकदिवसीय आणि तीन टी–२० सामने खेळणार होता. पण दोन्ही देशांमधील वाढत्या राजकीय तणावामुळे हा दौरा अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आला. त्यानंतर, बीसीसीआयने श्रीलंकेविरुद्ध टी–२० मालिका जाहीर केली आहे.



ही मालिका भारतासाठी केवळ एक सामना नाही तर जूनमध्ये होणाऱ्या २०२६ च्या महिला टी–२० विश्वचषकाच्या तयारीसाठी एक पाऊल मानली जात आहे. एकदिवसीय विश्वचषक जिंकल्यानंतर, भारताचे पुढील ध्येय टी–२० विश्वचषक जिंकणे आहे. गेल्या टी–२० विश्वचषकात न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाकडून पराभव पत्करल्यानंतर भारत सुरुवातीच्या टप्प्यातच स्पर्धेतून बाहेर पडला होता. त्यानंतर संघाने वेस्ट इंडिजचा २–१ आणि इंग्लंडचा ३–२ असा पराभव करून पुनरागमन केले होते.

# इराण विश्वचषक फुटबॉल ड्रॉवर बहिष्कार टाकणार

नवी दिल्ली, ता.२९–

**इराणने वॉशिंग्टनमध्ये पुढील आठवड्यात होणाऱ्या २०२६ च्या विश्वचषक फुटबॉल ड्रॉवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.अमेरिकेने त्यांच्या प्रतिनिधी मंडळातील सदस्यांना व्हिसा देण्यास नकार दिल्यामुळे हा निर्णय इराणने घेतला असल्याची चर्चा फुटबॉल जगतामध्ये आहे.**

इराण फुटबॉल फेडरेशनचे प्रवक्ते अमीर महदी अलावी यांनी सांगितले की, अधिकाऱ्यांना क्रीडाविषयक चिंतांपेक्षा व्हिसा संबंधित समस्या अधिक येत आहेत.

दरम्यान, अमेरिकेने या सगळ्यावर त्वरित कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

अलावी म्हणाले की, फेडरेशनने फुटबॉलची प्रशासकीय संस्था फिफाशी संपर्क साधला आहे. आणि आशा आहे की ते या समस्येचे निराकरण करण्यास मदत करतील. फिफाने अद्याप प्रतिसाद दिलेला नाही. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने जूनमध्ये इराणसह १२ देशांच्या नागरिकांवर प्रवास बंदी जाहीर केली. या यादीत गेल्या आठवड्यात विश्वचषकासाठी पात्र ठरलेल्या हैतीचाही समावेश आहे.

पुढील वर्षी ११ जून ते १९ जुलै दरम्यान अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या विश्वचषकात विक्रमी ४८ संघ सहभागी होणार आहेत.

# विटा शहराचा विकास भाजपच करणार

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील

विटा,ता.२९( प्रतिनिधी)–

**नरेंद्र मोदी पंतप्रधान आहेत, राज्यात देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री आहेत. जिल्ह्यामध्ये मी पालकमंत्री आहे आणि विरोधी पॅनलचे नेते गल्लोगल्ली फिरून सांगतात तिजोरीच्या चाव्या आमच्याकडे आहेत, आम्ही विकास करू. परंतु तिजोरीच्या किल्ल्या जरी तुमच्याकडे असल्या तरी तिजोरी मात्र आमच्याकडेच आहे हे विसरू नका, असा टोला पालकमंत्री चंद्रकांत पाटील विरोधी पॅनेलच्या नेत्यांना लगावला.**

विटा नगरपालिकेच्या निवडणुकीच्या प्रचारार्थ गांधीनगर, आंबेडकरनगर व रेवानगर येथील जाहीर सभेत केले. पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले ,आगामी काळातील विकास कामे १० लाखाचा रस्ता २० लाखाचा रस्ता अशी नाहीत. २०० कोटी ३०० कोटीची आहेत. सांडपाणी वाढत चालले. कचऱ्याची निर्गत करणारा प्रकल्प २०० कोटी लागतील कोरड्या कचऱ्याची निर्गत, ओल्या कचऱ्याची निर्गत, सांडपाणी १०० लिटर वापरतो त्यापैकी ८० टक्के फिल्टर करून वापरता येते.



**विटा : येथील प्रचार सभेत बोलताना पालकमंत्री चंद्रकांत पाटील. यावेळी आ. गोपीचंद पडळकर, वैभव पाटील उपस्थित होते.**

मंत्री पाटील म्हणाले, राज्यातील नगरपरिषदा, नगरपालिकासाठी २ डिसेंबरला विट्या सहित मतदान होत आहे. सर्वांनी विटा मध्ये भाजपच्या पाठीशी ताकद लावा. सर्व भाजपच्या उमेदवारांना विक्रमी मतांनी निवडून आणा, असे आवाहन मंत्री पाटील यांनी केले.

माजी नगराध्यक्ष वैभव पाटील म्हणाले की, विट्यात शहराचे नावलौकिक वाढवण्यासाठी भाजपचे नेतृत्वातील पॅनलला विजयी करा असे आवाहन पाटील यांनी केले.

या कार्यक्रमाला आम. गोपीचंद पडळकर,शेखर इनामदार, संग्राम माने, ॲड. विजय जाधव, अजित गायकवाड, सुमित गायकवाड, प्रकाश गायकवाड, भागवत जाधव, संताजी पवार ,विलास जाधव,लक्ष्मण पवार विशाल साठे, भरत कांबळे कांतीलाल कांबळे , नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. प्रतिभा चोथे, नगरसेवक पदाचे उमेदवार अरुण गायकवाड, अविनाश चोथे, तानाजी जावीर, लक्ष्मण पवार, पोपटराव जाधव, दत्ताभाऊ साठे आदी मान्यवर कार्यकर्ते महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या.




**बिंब प्रतिबिंबाचा खेळ निसर्ग खेळतो कसा.. सांग बरं त्याने कोठून आणला आरसा.. निसर्ग नेहमीच स्वतः चे अद्वैत रूप दाखवून मानवी मनास आश्चर्यचकित करतो. त्याच्या या देखणेपणात मन हरवून जाते. असेच हे सुंदर मनमोहक दृश्य टिपले आहे राजू उरणे यांनी.**

# श्रीकांत, त्रिसा-गायत्री अंतिम फेरीत

लखनौ,ता.२९–

**माजी विजेता किदाम्बी श्रीकांतने आणि गतविजेत्या महिला दुहेरीच्या जोडीतील त्रिसा जॉली–गायत्री गोपीचंद यांनी येथे सुरू असलेल्या सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरी आणि महिला दुहेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला.**

२०१६ मध्ये विजेतेपद पटकावलेल्या ३२ वर्षीय श्रीकांतने २०२३ चा राष्ट्रीय विजेता व आपलाच राष्ट्रीय सहकारी मिथुन मंजुनाथचे कडवे आव्हान २१–१५, १९–२१, २१–१३ असे मोडीत काढत थरारक उपांत्य सामना जिंकला. या मोसमात मलेशिया मास्टर्सच्या अंतिम फेरीत पोहोचलेला आणि २०२१ विश्व अजिंक्यपद स्पर्धेचा रौप्यपदक विजेता श्रीकांत आता अंतिम फेरीत हाँगकाँगच्या जेसन गुनावान व जपानच्या मिनोरू कोगा यांच्यातील जेत्याशी भिडणार आहे.





तत्पूर्वी, जागतिक क्रमवारीत १४ व्या स्थानी असलेल्या त्रिसा–गायत्रीने उत्कृष्ट खेळ साकारत महिला दुहेरीच्या उपांत्य फेरीत मलेशियाच्या ओंग शिन यी आणि कारमेन टिंग यांचा २१–११, २१–१५ असा सहज पराभव केला. आता रविवारी होणाऱ्या अंतिम सामन्यात त्यांच्यासमोर जपानच्या आठव्या मानांकित काहो ओसावा आणि माई तनाबे यांचे आव्हान असेल.

दरम्यान, भारताचे महिला एकेरीतील आव्हान उपांत्य फेरीत संपुष्टात आले. उन्मेश हुडा आणि तन्वी शर्मा या दोघींना सरळ गेममध्ये पराभवाचा सामना करावा लागला. उन्मेशला तुर्कीच्या नेस्लिहान अरिनकडून १५–२१, १०–२१ ने तर माजी विश्वविजेती नोझोमी ओकुहारा हिला धक्का देणाऱ्या तन्वीला जपानच्या हिना अकेचीकडून १७–२१, १६–२१ असा पराभव पत्करावा लागला.

यापूर्वी, हरिहरन आमसाकरुणन आणि त्रेसाच्या मिश्र दुहेरीच्या जोडीला इंडोनेशियाच्या देजान फर्दिनस्याह आणि बर्नाडाईन अनिंद्या वरदाना यांच्याकडून १७–२१, १९–२१ अशा पराभवासह स्पर्धेबाहेर पडावे लागले. मंजुनाथने यापूर्वी दोनदा आंतरराष्ट्रीय स्तरावर माजी जागतिक क्रमवारीत पहिल्या स्थानावर असलेल्या श्रीकांतला पराभूत केले होते. येथे मात्र श्रीकांतने आक्रमक आणि शिस्तबद्ध खेळाच्या बळावर विजय खेचून आणला.

# विटा नगरपालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकवा

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

विटा, ता.२९(प्रतिनिधी)–

**विटा शहर आजपासून मी दत्तक घेतले आहे. शहराच्या विकासाची सगळी जबाबदारी माझी आहे. विटा नगरपालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकवा, त्याची जाण ठेवून या विटा नगरपालिकेमध्ये लागणारा निधी कमी पडू देणार नाही, हा माझा शब्द आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.**

विटा नगरपालिकेच्या निवडणुकीत शिवसेनेच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. काजल म्हेत्रे आणि २६ उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी आमदार सुहास बाबर, आमदार राजेश क्षीरसागर, जिल्हा बँकेचे संचालक अमोल बाबर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संजय विभुते, डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील, गौरव नायकवडी, राष्ट्रवादीचे जिल्हा कार्याध्यक्ष ॲड. बाबासाहेब मुळीक यांची प्रमुख उपस्थिती होती.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले,मी मुख्यमंत्री असताना लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. लाडक्या बहिणींनी विधानसभेला शिवसेनेला भक्कम साथ दिली, आताही अशीच साथ द्यावी.

ते पुढे म्हणाले की, आमदार सुहास बाबर यांच्या माध्यमातून अनेक कामे झाली आहेत. विटा शहराने आपल्या शिवसेनेला संधी दिली तर पिण्याचे पाणी देऊ, चांगले रस्ते देऊ, चांगली क्रीडांगणे देऊ. नळ पाणीपुरवठा योजनेला आपण ७८ कोटी दिले आहेत.



**विटा : येथील शिवसेना उमेदवारांच्या प्रचार सभेत बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे. यावेळी आमदार सुहास बाबर, अमोल बाबर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.**

तसेच ज्या कामांना निधी दिला आहे, ती पूर्ण करूच पण जी कामे अजून करायची आहेत ती देखील नगरविकास विभागाच्या माध्यमातून निधी देऊन नक्कीच पूर्ण करू, माझ्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात विटयाला तब्बल २०० कोटींचा निधी दिला आहे.

ते पुढे म्हणाले, विटा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी शिवसेनेला एकवेळ संधी द्यावी, शिवसेनेच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. काजल म्हेत्रे आणि २६ उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन केले.

यावेळी विनोद गुळवणी, रणजीत पाटील, दत्तात्रय गायकवाड, तात्या कोरे,ॲड. विनोद गोसावी, संजय विभुते यांची भाषणे झाली. यावेळी गजानन दिवटे, विलासराव कदम, उत्तम चोथे, रमेश शितोळे, पै. सत्यजित पाटील, शिवाजी हारुगुडे, राजू मुल्ला, सुशांत देवकर, विनय भंडारे, श्रीधर जाधव, गजानन सुतार, शेखर भिंगारदेवे, गोरख लाटणे,

ॲड. इकराम बागवान, प्रवीण साठे, संजय तारळेकर, निलेश दिवटे, विनायक कचरे, ॲड. सुहेल तांबोळी, ॲड. जमीर मुजावर, यांच्यासह पदाधिकारी, शिवसैनिक, महिला आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.